श्री
# साईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



रहात्यासी बाबा जेव्हां जात । झेंडू जाई जुई आणीत ।
निजहस्तें उखरीं खुपसीत । पाणीही घालीत नेमानें ।।

तीन वर्षे हाचि उद्योग । उघडया जागीं उठविला बाग ।
तेचि स्थानीं आज हा सुयोग । वाडयाचा उपभोग जन घेती ।।

(श्री साईसच्चरित अध्याय ५ वा ओवी ४६ व ५१)

जगा लावावे सत्पथीं । हाच साईलीलेचा कृता ।।

श्रीसाईलीला

सप्टेंबर १९८५

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. व. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

प्रा. सौ. इंदिरा खेर
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)


---


**वर्ष ६४ वे) किंमत १ रुपया ( अंक ६ वा**

**दूरध्वनी ८८२२५६१**

---

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्री साईवाक्सुधा

माझिया भक्तांचे धामीं ।
अन्नवस्त्रास नाहीं कमी ।
ये अर्थी श्रीसाई दे हमी ।
भक्तांसी नेहमीं अवगत ।। ३३।।
मज भजती जे अनन्यपणें ।
सेविती नित्याभियुक्तमनें ।
तयांचा योगक्षेम चालविणें ।
ब्रीद हें जाणें मी माझें।। ३४।
हेंचि भगवग्दीतावचन ।
साई म्हणती माना प्रमाण ।
नाहीं अन्नवस्त्राची वाण ।
तदर्थ प्राण वेंचूं नका ।। ३५।।
देवद्वारीं मान व्हावा ।
देवापुढेंचि पदर पसरावा ।
तयाचाच प्रसाद जोडावा ।
मान सोडावा लौकिकी ।। ३६।।
काय लोकीं मान डोलविली ।
तितुक्यानें का भरसी भुली ।
आराध्यमूर्ति चित्तीं द्रवली ।
धर्मे डबडबली पाहिजे ।। ३७।।
— श्री साईसच्चरित् अध्याय ६ वा.

## सुविचार



वन्दनं श्री गणेशाय ।
भक्तांनां दु:ख नाशिने ।
यस्य स्मरण मात्रेण ।
मुक्तो भवति मानव: ।।
ज्याच्या नुसत्या आठवणीने
मानवाला मुक्ती मिळते, आणि जो
भक्तांची दु:खे नाहिशी करतो
त्या श्री गणेशाला, गणपतीला
माझा नमस्कार असो

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांच्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका - सप्टेंबर १९८५


| अनु. क्र. | लेखाचे/कवितेचे नाव | लेखक | पृष्ठ क्रं |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय : जीवनाकडे अशावादी दृष्टीने पहा | | ४ |
| २) | श्री साई आवडे जीवीचा जिव्हाळा... | — डॉ. के.भ. गव्हाणकर | ६ |
| ३) | मंत्रालयाचे राघवेंद्र स्वामी | — श्री. राघवेंद्र कुलकर्णी | १२ |
| ४) | गजाकृति श्रीसाई | — श्री. जयसिंग वागरे | १४ |
| ५) | माझा फ्लॅट विकला गेला | — सौ. तारा मानकामे | १७ |
| ६) | भक्तासाठी साई सत्वर धावून येई | — श्री. आर.एन. पाटील | १८ |
| ७) | द्वारकामाई काय बोलत आहे | — सौ. उषा मुळे | २१ |
| ८) | श्री साईनाथांचा शरणार्थी ६ | — श्री. विश्वास खेर | २२ |
| ९) | शिरडी दैनंदिनी | — साईनंद | २६ |
| १०) | माझे दैवत साईबाबा | — श्री. उत्तमराव पाखरे | ३३ |
| ११) | छोटया साई भक्तांसाठी | — | ३७ |
| १२) | बाबांनी संकटातून तारले | — सौ. निर्मला राजे | ३९ |
| १३) | श्री. साई समर्थ | — कु. मुग्धा कुलकर्णी | ४० |
| १४) | काशीराम शिंपी साईबाबांचा खरा भक्त | — श्री. लक्ष्मणराव रापतवार | ४१ |
| १५) | आधी केले मग सांगितले | — श्री. अनिल रसाळ | ४३ |
| १६) | आंतरयामी बाबा | — सौ. मालती वैवुडे | ४५ |
| १७) | साईबाबांची शिकवण व कार्य | — श्री. नन्दू पाटील | ४७ |
| १८) | साईदर्शन | — निर्मल | ४९ |
| १९) | लागू दे गोडी | — श्री. रामदास पगारे | ५० |
| २०) | साईबाबा व दासगणू महाराज | — श्री. सत्यवान गायकवाड | ५१ |
| २१) | श्री. साईंची शिकवण | — श्री. विजय सहामते | ५५ |
| २२) | श्री सगुणोपासनेची जन्मकथा | — | ५७ |
| २३) | माझी माऊली साई आई | — श्रीमती पुष्पाबाई जायकर | ६० |
| २४) | साईबाबा म्हणजे मूर्तिमंत ममता | — श्री. सु.भा. गोसावी | ६१ |
| २५) | मला नातू झाला | — सौ. उषाताई कुलकर्णी | ६२ |
| २६) | बाबा तुमच्या दर्शनाने | — कु. शिला नाडकर्णी | ६४ |
| २७) | माझे श्री साई | — सौ. मनीषा उनकुले | ६४ |

# जीवनाकडे आशावादी दृष्टीने पहा




दोन मित्र होते. बऱ्याच वर्षानी ते एकमेकांना भेटले. एकमेकानी एकमेकाना आपापल्या घरी येण्याची निमंत्रणे दिली. त्याप्रमाणे एक मित्र आपल्या मित्राच्या घरी गेला. बऱ्याच वर्षानी भेटल्यामुळे अनेक गोष्टींवर गप्पा सप्पा झाल्या. आलेल्या मित्रा-पुढे चांगल्या थंड पेयाचा अर्धाग्लास ठेवण्यात आला. मित्राला पेय घेण्याचा आग्रह करण्यात आला.

मित्र म्हणाला, "हा अर्धा पेला भरलेला आहे." त्यावर दुसरा मित्र म्हणाला, "हा पेला अर्धा रिकामा आहे" पुढयातील पेला या एकाच विषयाकडे दोघानी अशी आपापली मते व्यक्त केली खरी परंतु ज्या मित्राने पेला अर्धा भरलेला आहे हे मत व्यक्त केले तो आशावादी म्हणायला हवा व अर्धा पेला रिकामा आहे तो नक्कीच निराशावादी समजायला हवा. एकाच प्रश्नाकडे आशावादी आणि निराशावादी माणसे कशा दृष्टीने पहातात याचे हे एक चांगले उदाहरण साई भक्तांनो, आपल्या समोर ठेवले आहे.

जगात, समाजात, जीवनात, संसारात इतकेच नव्हे तर तुम्ही ज्या ज्या क्षेत्रात वावरत असाल तिथे तिथे थोडया फार प्रमाणात चांगले वाईट हे आहेच आहे. दोन्हीही भाग आहेत. सर्वत्र केवळ चांगले असे कधीच नव्हते आणि सर्वत्र केवळ वाईट असे कधी होणार नाही.

महाभारताच्या कालात गीता सांगताना भगवान श्री कृष्णाने आपण या पृथ्वीतलावर अवतार का घेतला किंवा तो का घेतो आहे याची मिमांसा करताना असे सांगितले,

**परित्राणाय साधुनाम विनाशायच दुष्कृताम ।**

आणि अशारितीने


**धर्मसंस्थापनार्थाय संभवामी युगे युगे ।**

अशा या परमेश्वराच्या अवतारासंबंधीचा निर्वाळा दिला आहे.

जगात अंधार जेवढा आहे तितक्याच प्रमाणात प्रकाश, उजेड पण आहे ; कृतघ्न, दुसऱ्याचे वाईट इच्छिणारी, करणारी माणसे जशी पुष्कळ आहेत त्याचबरोबर कृतज्ञ, दुसऱ्याचे हीत करणारी माणसेही काही कमी नाहीत. लाच लुचपत करणारे, देणारे, घेणारे पुष्कळ आहेत पण अशा मोहाला बळी न पडणारेही खूप आहेत. महाभारत काळातही दुष्ट लोक होते तसेच त्या काळी सुष्ट, साधु, सज्जन, भलेही होते.

थोडक्यात जग आणि जीवन हे अनादी कालापासून विविध विरोधी गोष्टींनी, घटनांनी विणले गेलेले आहे. वस्त्र, कापड जर घेतले तर त्या वस्त्राला उभे - आडवे धागे असतात. त्याप्रमाणे संसाराचे आहे. त्यात सुख आणि दु:ख ; यश आणि अपयश, मान आणि अपमान ; प्रेम नि द्वेष ; मित्र व शत्रू ; संपत्ती व आपत्ती अशी अनेक द्वंद्वे आहेत. विचारी माणूस या दोन्हीकडे एकदम पाहातो आणि समाधानी राहातो. अज्ञानी माणूस एका वेळी एकाच गोष्टीकडे पाहातो त्यामुळे तो कधी सुखाच्या शिखरावर बसतो तर कधी दु:खाच्या खोल दरीत कोसळतो. स्तुती झाली की त्याला हर्षवायू होतो निंदा - नालस्ती झाली की तो रडवेला होतो, दु:खी होतो. म्हणून साईप्रेमींनो, जीवना कडे साकल्याने पहा, एकांगी दृष्टीने पाहू नकात, एकमार्गी दृष्टी ठेवू नकात. थोडक्यात निराशावादाकडे जाऊ नकात नेहमी मन आशावादी ठेवा.

जगात साधू सज्जनांचा नीतीने वागणाऱ्यांचा जय व्हावा अशी इच्छा मनात प्रत्येकाने बाळगायला हवी. सत्याला आणि सत्कृत्याला सतत उत्तेजन प्रत्येकाने दिले पाहिजे. जगातील सत्याचरणी माणसात निदान एका माणसाची भर आपण सहज घालू शकू पण कुणाची ? प्रथम अगदी स्वत:चीच हं ! आमचे हे म्हणणे म्हणजेच पर्यायाने संत चूडामणी भगवान श्री साईबाबाचे आर्शीवचन प्रत्येकाने आज पासूनच पाळावयाचे, करावयाचे ठरविले तर समाजात सज्जनांचे, साधूवृत्तीच्या मंडळीचे प्रमाण आपोआपच नक्कीच वाढेल यात तीळ मात्रही शंका नाही.



# श्रीसाई आवडे जीवीचा जिव्हाळा, हृदयाचा कळवळा

**साईलीन डॉ. के. भ. गव्हाणकर**
लालबहादुर शास्त्री मार्ग इंदिरा निवास
कुर्ला मुंबई - ७०

[ साईलीन डॉ. गव्हाणकर यांनी हा लेख आमचेकडे पाठविला खरा परंतु त्याच्या प्रसिद्धीस काहीसा विलंब लागला. आता हा लेख आम्ही प्रसिद्ध करीत असून अण्णासाहेबांना आम्ही अखेरची आदरांजली वाहात आहोत. का. सं. ]

वस्तूंनी मोजण्यासारखी संपत्ती जीव मिळवितात तेव्हां ती दुसऱ्यांच्या चटकन् डोळ्यांत भरते. राहण्याला बंगला बांधला आहे, मोटारीतून हिंडत आहे, अंगावर मोलाची वस्त्रे आहेत, मुलांच्या व स्त्रियांच्या अंगावर दागिने झळकत आहेत, हे जेव्हां इतर लोकांना दिसते तेव्हां ते एखाद्याला श्रीमंत म्हणतात आणि त्यांनी श्रीमंत मानल्यानी तो खुषी राहतो. प्रत्येक गोष्टीत चार लोकांच्या बऱ्यावाईट म्हणण्याने माणसाची चालरीत पाहू लागल्याने, परमार्थातहि कोणी शिरला की जनाच्या मताने आपणांत बदल झाला की नाही हे पाहू लागतो त्याचप्रमाणे चार लोक ज्याला श्रेष्ठ म्हणतील, साधू म्हणतील त्याला हा पण साधू संत समजू लागतो.

वास्तविक जीवाच्या सुखाचा प्रश्न जेथे आहे तेथे चार लोकांच्या मनापेक्षा स्वतःच्या अनुभवाला अधिक महत्त्व आहे. म्हणून संसारातला उत्कर्ष हा वरकरणी वस्तूत दिसतो त्याच रीतीने परमार्थातला म्हणजे सुखजीवनातला बदल बाह्यवस्तूत हुडकून सापडणार नाही.

पुष्कळांची अशी समजूत असते की, परमार्थांत जीव शिरला की तो इतर लोकांहून भिन्न दिसू लागतो, अद्भूत शक्ति त्याच्यातून प्रकट होऊ लागतात, तो चमत्कार करु लागतो. थोडक्यात दिसावयाला व असावयाला तो माणसासारखा मुळीच असत नाही.

अशा समजुतीमुळे कोणी चमत्कार करु लागला किंवा चमत्कारिक (तऱ्हेवाईक) वर्तन करु लागला की तो साधू तर नाही ना ! अशी शंका लोक घेऊ लागलेच. उलट सामान्य लोकांप्रमाणेच साधे आचरण राहून जीवितात रसिकतेनें, प्रेमाने सुखाचे उच्च जीवनाचे कल्लोळच कल्लोळ उमटत असलेल्या महापुरुषाला जग ढोंगी म्हणेल आणि प्रसंगी त्याचा लोक छळ करण्यासही कमी करणार नाहीत.

सिद्धी प्राप्त होत नाहीत अगर चमत्कार घडत नाहीत असे नव्हे. पण अशा सिद्धी व चमत्कार प्रकट आहेत म्हणून परमसुखाचे जीवन तेथे आहे असा अर्थ नाही. संसारात कोणी श्रीमंत असतो, कोणी इतरांहून अचाट शक्तिने बलवान असतो त्यामुळे तो श्रेष्ठ जीवनाचा असतोच असे ज्याप्रमाणे ठरत नाही त्याच रीतीने सिद्धीचे जीवन परमार्थाच्या उच्च जीवनाचे नव्हे. शक्ति द्रव्य कमवून लाभतात ; त्याप्रमाणे सिद्धी या कमवून प्राप्त होणाऱ्या वेगळ्या तऱ्हेच्या शक्ति आहेत. व्यावहारिक सत्तेने इतर जीवांना जसे चकित करता येते, त्यांना आपल्या अधिकाराखाली वागविण्याची स्थिती प्राप्त होते त्याप्रमाणेच या सिद्धी चमत्कारादी शक्तिचा उपयोग होतो पण तो साच परमार्थ नव्हे, त्यालाही संसारच म्हटले पाहिजे. जादू टोणा करून महत्व मिळविणारे संत नव्हेत. म्हणजे असे पुरुष उच्च सुखाचे दर्शक नव्हेत. त्यांना परमसुख ठाऊक नाही. तेच त्या सुखाला पारखे असतात. मग जगाला त्यांच्यापासून ते लाभेल ही आशा व्यर्थ आहे. व श्री निळोबारायांनी तर "सिद्धी रोधिती वाटा" असे चक्क म्हटले आहे.

तेव्हां परमार्थातल्या अनुभवाची - प्रगतीची मोजणी बाह्य स्थितीवरुन करावयाची नसते. परमार्थ हा वस्तुत: संसाराहून वेगळा मानणे हीच प्रथम चूक आहे. संसारातच प्रभूरुपाची (प्रेमरुपाची) दृष्टी उमलून सर्व स्थितींत अपार सुख त्या बोधाने भोगावयाचे हा परमार्थ होय.

वै. बिडकर महाराजांची सर्व किमया (सिद्धी) दक्षणारुपाने, अक्कलकोट महाराजांनी घेतली त्यानंतर ते एक सिद्ध पुरुष होऊन गेले.

प्रत्यक्ष श्रीकृष्णपरमात्मा या सिद्धींच्या विरूद्ध होते. संसारात जी जी कर्मे करावी, डोळ्यांनी जेथे दृष्टी फेकावी, कानांनी जो नाद ऐकावा, त्या इंद्रियांच्या सर्व कर्मांत प्रभु श्रीकृष्ण आपल्या प्रियतेने खुणावित, मोहवित आहे अशी त्या राधिकेची स्थिती होती. जीविताच्या मूळाशी असलेला प्रभु गोपालकृष्ण एकाच इंद्रियाने नव्हे तर सर्वांगी मनबुद्धी चित्तात सतत जडून रहावा ही तिची प्रार्थना होती.

प्रभूची प्रियवचने हीच मुरली ऐकताना राधिकेला वाटले हा विश्वमोहन सखा आपल्या जीवात अखंड प्रियकुंजन करीत केव्हा राहील ? कोण उपायांनी, कोण पुण्याईने त्याचे जीवावरील अखंड प्रेम आपणात सतत जागे राहिल याची तिला

मोठी खंत असे. संताच्या कृपेने, दर्शनाने आपणाला प्रभू असा सतत वश राहिल हे ही त्या प्रभूच्या मुखातून ऐकले होते. प्रभुच्या संगतीने अनन्य जीवित व प्रियत्वाचा भाव (आवड) तिच्यामध्ये आणि तिच्या संगतीने इतर गोपीमध्ये जागी होती. संतांचे दर्शन घडावे, त्यांच्या आशीर्वादाने आपला प्रभू सतत प्रेमाने वश व्हावा यासाठी त्यांचे हृदय तहानेले उत्सुक होते.

त्याचवेळी यमुनेच्या पैलतीराला दुर्वास ऋषिंची स्वारी आली आहे असे गोपींनी राधेला वर्तमान सांगितले. दुर्वासाच्या पूर्व चरित्राचा भाग माहीत नसल्याने त्या संतपिपासू हृदयाला दुर्वासदर्शनात प्रभू वश होण्याचा वर लाभेल असे वाटले. लगेच ती सखींना म्हणाली, "प्रभूला प्रिय असे महान भक्त दुर्वास पलीकडे आले आहेत. आपण साऱ्याजणी त्यांच्या दर्शनाला जाऊ या ग ! त्यांचे प्रभूप्रेम त्यांच्या दर्शनात आपणाला लाभेल. याल ना ! सर्वांच्या मनाचीच आवड राधेने व्यक्त केल्याने मोठया भक्तिभावाने जे तिला सुंदर फळ, पुष्प व पक्वान्न वाटेल ते तिने घेऊन साऱ्याजणी लगबगीने राधेजवळ जमल्या. यमुना नदी तुडुंब भरलेली होती म्हणून राधिका प्रभूला पलीकडे जाण्याला उपाय विचारण्यास आली. प्रभूंनी तिला मंत्र सांगितला, "सोळा सहस्त्र गोपींच्या भोगांतही प्रभू ब्रह्मचारी असेल तर यमुनामाये, मला वाट दे." हा मंत्र ऐकताच राधा चकीत झाली ; व प्रभू चेष्टा करीत नाही ना ! असेही क्षणभर तिला वाटले. चेष्टा वाटेल तर सांगितलेल्या वचनावर श्रद्धा न राहून कार्य होणार नाही, म्हणून प्रभूंनी जरा दटावून म्हटले, "मी म्हणतो त्यावर तुझा विश्वास नाही ? जा, मी सांगितले तसेच म्हण. तुझे काम होईल." प्रभूंच्या निर्धार वचनाने तिलाही त्याचा विश्वास वाटला. मात्र प्रभू थोडतरी आपल्यावर रागावला असावा असे तिला वाटले ; म्हणून राधिका वळून पाहते तो प्रभू खुदकन् हंसल्याचे तिला दर्शन होऊन ती मोठया उल्हासाने तेथून निघाली.

प्रभूंचा मंत्र राधिकेने उच्चारताच यमुनेने दुभंग होऊन सर्व गोपिकांना वाट दिली. ते पाहून प्रभू काय करणार नाही असे राधिकेला फारफार गोड वाटले. प्रभूंसाठीच संतदर्शन म्हणून दुर्वासांच्या चरणावर सर्वांनी पत्रपुष्पफल ठेवले आणि आणलेला नैवेद्य भक्तिभावाने त्यांना समर्पण केला. गोपींना प्रभूवचनाने व प्रभूप्रेमाच्या आषकतेने दुर्वास महान संत वाटला. प्रभूच्या संगतिमुळे त्यांच्या हृदयाची आवड किंवा भाव अनन्यरूपाने संत झाल्याने त्यांना दुर्वास संत दिसला. वास्तविक तो योगादि साधने करून ईश्वराची कर्तुमकर्तुम् शक्ति मिळविण्याच्या मार्गातला होता. त्याला प्रभूप्रेमाची नड नसून प्रभूसत्ता मिळवायची होती त्याप्रमाणे त्याने काहीं सिद्धी मिळविल्या होत्या.

गोपी दुर्वास दर्शनाने सुखी झाल्या. त्यांना संत भेटल्याचा आनंद लाभला. उलट दुर्वासाला वाटले, आपल्या सिद्धीचा हा प्रभाव बरं ! गोपींनी आणलेले सर्व अन्न त्याने खाल्ले, पण गोपींचे प्रभूप्रेम त्याच्या मुळींच ध्यानी आले नाही. जाताना

सर्व गोपींनी दर्शन करुन "गोपाळकृष्ण जीवाचा सखा व्हावा व अखंड जीवीं जडावा" ही प्रार्थना केली. त्याला दुर्वास मनात हंसून "गवळयांच्या बायका भोळया खऱ्या" असे म्हणाले.

परत जाताना प्रभूप्रमाणेच राधिकेनें नदीपार होण्याचा उपाय विचारला. विचारल्याबरोबर स्वयंभू कळकळीने अगर विचाराने त्याला उपाय सांगता आला नाही. "येताना तुम्ही कशा आल्यात" असे विचारताच राधिकेने प्रभूचा मंत्र सांगितला. प्रभूचा मंत्र ऐकल्यावर प्रभूसत्तेशी स्पर्धा करणारे दुर्वास ऋषि आपल्या तपोबलाच्या अभिमानाने म्हणाले, "हो, कृष्णाप्रमाणे मी पण तुम्हाला सांगतो, तुम्ही यमुनेला सांगा, "सोळा सहस्त्र खंडया अन्न खाऊन दुर्वास निराहारी असेल तर यमुनामाई मला वाट दे. पहा, कृष्णाप्रमाणेच यमुना माझे वचन ऐकते की नाही ते."

सर्व गोपींसह राधिका दुर्वासाच्या मंत्राने यमुना पार झाली. त्याबरोबरच पापही उभे राहिले. प्रभूच्या वचनाइतकेच दुर्वासाला श्रेष्ठत्व आहे. प्रभूइतकीच दुर्वासाच्या अंगी शक्ति दिसते. आपण मात्र प्रभूच्या मागे इतके लागूनही आपणांत अशी कोणतीच शक्ति नाही. प्रभू जेवढा दुर्वासाला प्रसन्न झाला तेवढा आपणाला नाही. आपण अबला, भोळया म्हणून केवळ गोड शब्दांनी भुलवून त्याने केवळ इंद्रिय भोगातच आपणाला ठेवले. खेळ म्हणून त्याने आपला उपयोग करुन घेतला आणि आपले जे सामर्थ्य जे प्रभूरुप ते यत्किंचितही आम्हांला दिले नाही अशा विचारांनी तिला सारख्या वेदना होऊ लागल्या. आपण संसार गमावला. विश्वाची निंदा सोसली त्या साऱ्यांचे फळ प्रभूही आपणाला विलगच राहिला. आपला जन्म व्यर्थ गेला. प्रभूने आपणाला जाणून असे कां फसविले ? बोलतांना आपणाइतके दुसरे कोणी प्रिय नाही असे म्हणून कृतीत मात्र आपणाला तसेच अबला राखिले. प्रभूलाच याचा जाब विचारु ! त्यानेच हा घात केला असे म्हणून नेत्रातून अश्रूंच्या सारख्या धारा वाहात व क्रोधाने सर्वांग कांपत आणि मुख लाल झालेले अशा स्थितीत राधिका तडक प्रभूच्या मंदिरात गेली तेथे बलरामजी व कृष्णप्रभू काही राजकारण बोलत होते. राधिकेची ती डोळे लाल झालेली मूर्ति पहाताच दुर्वासाचे भूत तिला लागले असावे, असा प्रभूंनी कयास केला. बलरामजीही तिचा शोक, तिचे रुदन पाहून मुकाटयाने तेथून निघून गेले. प्रभूचा त्यांचेवर वचकच तसा होता.

बलरामजी बाहेर जाण्याची राधिका वांट पहात होती. जाताक्षणी ती प्रभूच्या अंगावर जाऊन पडली आणि कृष्णा ! चांडाळा, केसांनी कीं रे तू आमचा गळा कापलास. कुळ, गोत, मासर बुडवून तू सर्वस्वी आम्हाला नागविलेस देवा ! अशी फसवेगिरीच करावयाची होती त्यापेक्षा आम्हांला वधून टाकले असते तर फार बरे झाले असते. एवढे म्हणून दुःखाने शब्द फुटेना. तेव्हां मोठयाने कळवळून रडू

लागली. प्रभूला चावावे, त्याचा गळा दाबावा आणि आपणही त्याच्यापुढे जीव द्यावा एवढाच विचार आता तिच्या मनात होता.

राधेचे अपार दु:ख पाहून प्रभू घायाळ झाले. ते तिचे डोळे पुसून तिला समजावण्याचा प्रयत्न करु लागले. "राधे ! सांग माझा अपराध तरी काय झाला तो. एवढा मी दुष्ट तुझ्या दृष्टीत ठरलो तरी कसा ?" देवा, आम्हांला तू जीवाच्या पलीकडे प्रिय आहांत असे म्हणतोस आणि दुर्वासाला मात्र स्वत:चे सामर्थ्य देऊन तुझा तोच खरा प्रिय आहे असे दाखवितोस. आम्हांकडे केवळ शब्दाची भुली व प्रत्यक्ष अधिकार त्या दुर्वासाकडे ! खरा तोच तुझा जिवलग — आम्हाला मात्र व्यर्थ इंद्रियांच्याच भोगात दीन करून ठेवलेस. दु:खाचा बांधारा केवळ प्रभूच्याच प्रियवचनाचीच वाट पहात असल्याने तो वरील शब्दांनी उचंबळून बाहेर आला. राधेचा क्रोध व्यक्त झालेला पाहून प्रभूला संतोष वाटला." दुर्वास, तुझ्याहून मला प्रिय आहे हे अद्याप तुला खरं वाटते ?" देवा, शब्दांनी तू माझी समजूत काढू पहातोस, आम्ही अजाण, अजूनही तुझ्या वचनाला भुलून जाऊ. नकोच अशी समजूत करावयाला. एकदा तुझ्या चरणांवर हा जीव समर्पण होऊ दे. हे तुझ्याबद्दलचे संशयाचे व दीनतेचे जिणे संपले म्हणजेच तुझी व आमची दोघांचीही सोडवणूक होईल."

राधे ! दुर्वासाची व माझी कर्तुमकर्तुम शक्ति तुला पाहिजे का ? एवढेच काय पण तुला प्रत्यक्ष माझी सर्व सत्ता प्रभूरुपच देऊ कां ? राधे ! साऱ्या विश्वात सत्तेची उलाढाल करताना मी शिणून गेलो आहे. हे राधे ! तुमच्या दारात तुमच्या गोड वचनासाठी धावून येतो. तुला कृष्णरुप पाहिजे कां ! ते आता देतो, मला तुझे प्रिय भक्तहृदय अति आवडते. राधे ! तू कृष्ण हो ; मला राधिका होणे अति आवडते. कृष्णरुप होऊन राक्षसांशी झुंज द्यावी, गोवर्धनासारख्या कर्माचा डोंगर उचलावा, कुठे कालयवनासाठी भीतिने लपावे, तर कंसासाठी क्रोधाचा अवतार धारण करून त्याचा कंठ फोडावा. राधे ! तुला ही सत्ता पाहिजे कां तुझ्या वचनासाठीं, तुझ्या दर्शनासाठी तुझ्या सासूच्या भीतिने गोठ्यात लपणारा प्रभू तुला पाहिजे ? स्वकर्तव्याने साधने करणाऱ्या योगी मुनी जपी लोकांना असा घायाळ प्रभू उमगत नाही. तो तुम्हां गोपींसाठी सदा व्याकूळ व चिमूटभर लोणी व वाटीभर ताकासाठी दारोदार हिंडत असतो. राधे ! या प्रियभक्तीतच मला अपार सुख वाटते. मी दुर्वासाला सत्तादान, सिद्धी दिल्या पण त्याने तो सुखी आहे कां ? त्याच्या मागे अंबरीष भक्त पालनाचे चक्र लागले. तेव्हा त्याची कोण त्रेधा ? राधे ! त्याला सिद्धी पाहिजेत, प्रभू नको म्हणून तो इथून जवळ असता माझ्या दर्शनाला यावे अशी त्याला बुद्धी झाली नाही. प्रेमभक्तीचे सुख त्याला न लाभता सत्तेचे, विकाराचे भार व दु:ख त्याला सोसावे लागते. माझ्या भक्तांना सत्तेचा शीण नसावा, प्रेमाचे सुखच लाभावे म्हणून गर्भातल्या बालाप्रमाणे मी त्यांना कर्मापासून जपतो. सांग, तुला

घरात राबणाऱ्या तशा जनावरांची. जाणत्या माणसांची शक्ती, कर्मकर्तेपणा पाहिजे की बाळाला सर्वांगी सर्वांनी प्रेमाने पहावे, जपावे अशी भक्तस्थिती पाहिजे. राधे ! तुझी विनवणी करणारा व तुझा दास असलेला असा गोपालकृष्ण पाहिजे ना ! राधे ! मला जर भक्तहृदयाचे दर्शन, सेवा घडली नाही तर हे जिणें अत्यंत यातनेचे होईल. राधे ! तू भक्त व मी भक्तांचा दास असे जीवन मला जन्म जन्म तू दान कर. तुमच्या प्रिय वचनांचा मी सदाच भुकेलेला आहे. इतर सर्व पूजा मला अगदी निंदेसारख्या वाटतात. आईबापांनी मुलांची सारी कामे करावी, त्याला फुलाप्रमाणे जपण्यास आईबापांनाही पालनाचे सुख लाभावे हे बरे की तान्हया बाळांनी स्वकष्टाने आपले अन्न मिळवावे हे चांगले ? राधे ! मुखात मुख घासून पंखही न फुटलेल्या बाळाप्रमाणे आईच्या सर्व रुपाचा भोग घ्यावा की सातासमुद्रापलीकडील चारा आणावा हे बरे ? राधे ! एकवार तुझ्याच तोंडून निवाडा होऊ दे. भक्त मागतील ते मी देईनच. पण त्यांना कर्मसत्तेचा शीण होऊ नये एवढयासाठी मी त्यांना प्रियत्वात केवळ जपतो. तेव्हा आपल्या हातात सत्ता घेण्यापेक्षा सत्ता आपल्या इच्छेप्रमाणे नमवण्याची प्रियत्वाची सत्ता उत्तम नाही का ? सत्तेपेक्षा प्रियत्व गोड आहे. प्रियत्व हा सुखाचा गाभा, फलाचा रस आहे. सत्ता व कर्म ही बाह्य त्वचा, खोड किंवा फांद्या आहे. ते मजकडेच राहू दे. तुम्ही केवळ आईचे दूधच पीत आईच्या प्रियनेत्रांचे अलंकार घालून नाचत खेळत रहावे व तुमचा, सर्व संसार करीत सेवा करीत रहावे हे दान मला द्या."

प्रभूच्या एकेक वचनासरशी राधेचा प्रिय जीव फुलून येत होता. मूळात त्या जीवाला सत्तेची जरुर नव्हतीच ! दुर्वासदर्शनाची तिला केवळ दृष्ट झाली होती व कृष्णप्रभूच्या हळूवार हातांनी सांत्वन करीत तिला आलिंगीत गोड वचनांनी, बोधाने ती दृष्ट निघणे जरुर होते. प्रभूचे अंतःकरण आपणाला पुरे, प्रभूचे दास लाडके व हट्ट करणारे बाळच आपण रहावे हा निश्चय प्रभूच्या वचनांनी होऊन आपण प्रभूला किती दुर्वाक्ये बोललो याचे तिला फार वाईट वाटले. ती प्रभूच्या हृदयावर मस्तक ठेवून व अधिकच बिलगून आक्रोश करु लागली. 'देवा ! तुझे रुप, तुझे पालन, तुझी कळकळ न जाणता तुला कठोर वचने बोलले, देवा ! आईहूनही कृपाळू होऊन ती वचने तू सोसलीस, देवा ! आमची सारी शहाणी व पापाची, तुजहून वेगळे होण्याची, दुर्बुद्धी ठरते, देवा ! तुझ्या सत्तेचे बरे वाटणे, सत्ता हवी वाटणे हे तुजहून दूर होण्याचे पाप आहे. त्या पापाने मी माझ्या प्रितीने, जीवलगला नाही ती वचने बोलले. देवा ! तूच म्हणून ती पोटात घेऊन उलट प्रितिने कृपादान केलेस. आम्हांला तू कृतघ्न न म्हणता जीवापलिकडे जतन केलेस. देवा तुझ्याखेरीज आमचे कोणतेच कर्म घडू नये. (घडत नाहीच पण) घडल्याचे दिसू अगर वाटू नये देवा ! तूच मायबाप, सखासोयरा, वल्लभ, कांत, जीवदाता, प्राणनाथ व सुखाचा सागर आहेस. देवा ! तुझ्या भक्तांना यापुढे आमच्यासारखी सत्ता मिळवावयाची दृष्ट लागू नये, देवसत्ता मिळवून ज्यांना मोक्षसुख


मिळवावयाचे असेल देवरूप सोहंभावी व्हावयाचे असेल अशांचे दर्शन त्यांना ऐकावयाला मिळू नये. देवा ! भक्तांना जपावयाचे तर प्रथम हे दान त्यांना द्यावे. प्रभूप्रेमाचा गाभा असाच केवळ तू आम्हांला भेटावास हे एकच दान या प्रिय भेटीत लाभावे अशी प्रार्थना आहे." असे म्हणून राधिकेने प्रभूच्या चरणांना मिठी मारली. ती आपण सर्व प्रेमोपासक जीवलगासाठी संतबोधाने भेटत आहे. साईभक्तांनो, देव मानण्यात एक श्रद्धा आहे; ती नसावी हा अतिरेक. ती अंध असू नये हा विवेक ; आणि अंधश्रद्धाच माणसाला आत्मिक सामर्थ्य देते, हा अनुभव ! या श्रद्धेच्या जोरावरच माणसाची इच्छाशक्ति प्रबल होते. या इच्छाशक्तिचाच यशात फार मोठा वाटा असतो.

# मंत्रालयाचे श्री राघवेंद्र स्वामी व शिरडीचें साईबाबा हे एकच

**श्री. राघवेंद्र कुलकर्णी**
टाऊन शिप कॉलनी
नांदेड

मंत्रालयाचे श्री राघवेंद्र स्वामी हे देखील श्री साईबाबा प्रमाणे थोर अवतारी पुरुष होऊन गेले आहेत. श्री राघवेंद्र स्वामी हे वृंदावनाधीस्थ (समाधीस्थ) होऊन आज जवळ जवळ तिनशें वर्ष होत आहेत. तरी देखील त्यांचे महत्व टिकून आहे. आज देखील साईबांबा प्रमाणे भक्ताच्या संकट समयी स्वामी धावून जावून भक्तांना संकट मुक्त करतात भक्तांना वाचवतात. श्री राघवेंद्र स्वामी मुळे आंध्र प्रदेशातील मंत्रालयाची भूमी पावन झाली. आजही शिर्डी प्रमाणे मंत्रालयास लाखो लोक जातात. दिवसे दिवस भक्त गणाची संख्या येथे देखील वाढत चालली आहे. नुसते आंध्रातीलच लोक येथे जात नसून कर्नाटक व त्याच बरोबर महाराष्ट्रातील भक्त जण जातात.

स्वामी समाधीस्थ झाल्यानंतर १०० वर्षानी घडलेली घटना येथे देत आहे खि. स. १८०० मध्ये मन्रो हा बल्लारी जिल्हयाचा कलेक्टर होता. मद्रास कंपनीच्या प्रेसिडेंटच्या आज्ञे प्रमाणे देवस्थानचे सर्व उत्पन्न जमा करावे म्हणून तो मंत्रालयास आला. येथे स्वामीच्या दर्शनास सहस्त्रावधी लोक सेवेला येतात हे मन्रोला पटले



नाही. 'मी स्वतः या स्वामीचे महत्व काय आहे ते परीक्षा करून पहातो. असे म्हणून नियमा प्रमाणे पायातील बुट काढून सोबत सरदारास घेवून वृंदावनासमोर गेला तेथे जावून तो हात जोडून उभा राहतो तोच त्याला स्वामींचे दिव्य दर्शन झाले. तो स्वामीं सोबत मठा विषयी बोलला त्या वेळी स्वामी बोललेले कोणास ऐकु येईना पण मन्रो जे बोलत आहे हे इतरांना ऐकु येवू लागले, व हयाच वेळेस मन्रोनी त्याच्या बाजुस उभ्या असलेल्या सरदारास विचारले 'हेच काय ते स्वामी' पुण त्या सरदारास फक्त वृंदावनच तेवढे दिसत होते म्हणून तो म्हणाला, मला फक्त हे वृंदावन एवढेच दिसत आहे हे ऐकुन मन्रोस विलक्षण आश्चर्य वाटले. व त्यांनी स्वामीस नमस्कार करून तीर्थप्रसाद घेवून मठाचे उत्पादन मठालाच लिहून दिले.

## दुसरी एक घटना अशी

एकदा एका ब्राम्हणाने पैसे मिळवण्यासाठी मंत्रालयास येऊन सेवेला सुरवात केली. काही दिवसानी स्वप्नात त्याला "उद्या दरवाजा उघडताच काय दिसेल ते घे" असे स्वामींनी सांगितले. त्या प्रमाणे त्याला दरवाजात मोठा सर्प दिसला. तो धरण्यास भीती वाटली. शेवटी धैर्याने त्याची शेपटी धरली तीही हात रुमालाने धरली. त्याला शेपटीचा थोडा तुकडा मिळाला. तो रुमाल उघडून पहातो त्यांत सोन्याचा तुकडा होता. आपल्या नशीबात एवढेच मानून तो परत गावी गेला. अशा प्रकारे श्री राघवेंद्र स्वामींच्या अनेक चमत्कारीक गोष्टी आहेत. सांगाव्या तेवढया कमीच वाटतात.

अशाच प्रकारे श्री साईबाबांनी घडवून आणलेली चमत्कारीक गोष्ट पुढे नमुद करत आहे.

एकदा श्री बाबा व त्यांची भक्त मंडळी अन्न शिजवत होते. शाकाहारी अन्न वेगळे व मांसाहारी अन्न वेगळे शिजवले जात होते इतक्यात एक ब्राम्हण तेथून चालला होता. इतक्यात बाबांनी एका भक्तास हाक मारली व सांगीतले कि एक दोन चार मांसाचे तुकडे नेवून त्यांच्या झोळीत टाक असे म्हटल्यावर तो भक्त घाबरला त्याला वाटू लागले की मांस त्या ब्राम्हणाच्या झोळीत टाकणे म्हणजे महा पाप पण बाबांच्या आग्रहा पुढे कोणाचे चालेना. अखेर त्या भक्ताने पटकन मांसाचे तुकडे त्याच्या झोळीत टाकले. ब्राम्हणास राग आला तो घाई घाईने नदीवर जावून ती झोळी न बघता झटकून टाकली व ती स्वच्छ धुतली पण एके ठिकाणी बारीक मांसाचा तुकडा लागुन राहीला होता त्याचे सोने झाले. तो चमकत असलेला सोन्याचा तुकडा पाहुन ब्राम्हणास वाटले की हे मांस नसून सोने होते पण त्याच्या नशीबात तेवढेच होते हे पाहुन तो ब्राम्हण गप्प बसला. अशा प्रकारे श्री राघवेंद्र स्वामी व श्री साईबाबा या दोघाही अवतारी पुरुषांचे कार्य एकच होते हे स्पष्ट दिसुन येते. या दोघाही दिव्य अवतारी विभूतींना कोटी-कोटी प्रणाम.

---

# गजाकृति श्रीसाई

**श्री. जयसिंग वागरे**
६६ पटेलवाडी परेल व्हिलेज
मुंबई नं. १२

श्रीगणेशाला वंदन करून ग्रंथ कर्ते कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर यांनी "साईसच्चरित"या ग्रंथात श्री साईलाच गणेश मानलेले आहे. लेखकाने प्रथम ग्रंथनिर्विघ्नपूर्णतेसाठी श्रीगणेश स्वरूप साईची मंगलाचरणाने स्तुती आरंभलेली

आहे. कार्यारंभ व समाप्ती विघ्नरहित व्हावी व त्यामध्ये येणाऱ्या विघ्नांचे निवारण होण्यासाठी मंगलाचरण दिले आहे. श्रीसाईचे स्तवन करताना कवि म्हणतो की साईच गजानन, गणपति आहे. श्रीसाईने भक्तांना अभय वर देऊन त्यांच्यावर येणाऱ्या विघ्नांचे निवारण करण्यासाठी हातात परशु धरला आहे. कवि अंतर्मुख होऊन साईलाच भालचंद्र, गजानन, एकदंत, गजकर्ण, विकट या नामाने अभिवंदन करतोय. या नामांवरुन असे वाटते की कवीने संकटनाशक गणेशद्वादश नामाचे स्मरण केले आहे. सर्व मांगल्याची मंगलमूर्ति असणाऱ्या लंबोदरा, गणराया श्री साईदेवा आम्हांवरील सकल संकट हरण करून निजधामाला घेऊन जा अशी आर्ततेने व अंतर्मनाने गजाकृति श्रीसाईला विनम्रतेने विनंती करतो आहे.

गणेशरुपी श्रीसाईची स्तुती करताना ग्रंथकर्ता सांगतोय की वक्रतुंडा चतुर्दश विद्याधिपति गणराया तुला मी वंदन करतो. विघ्नराजेंद्रा, गजवदना, तत्क्षण विघ्नशमन करणाऱ्या विघ्नेश्वरा तुझी अनन्य भावाने ग्रंथ कार्य सिद्धिविषयक स्तुती करतो. विघ्ने ज्याच्या पायाशी लोळण घेतात व ज्या मंगलमूर्तिने सन्मुख कृपादृष्टीने क्षणभरही पाहिले असता त्वरीत दुःख नाशते. गजमुखा ब्रम्हणस्पति ज्ञानज्योतिर्मय भालचंद्रा, सिद्धिविनायका माझ्याकडे ऋद्धि-सिद्धियुक्त आनंदाने पहा. अशी गणपतिरुपी श्रीसाईची आळवणी कवी करतोय.

ज्यावेळी साधक अंतर्मुख होऊन शुद्ध व शांत मन असता परेतून उत्स्फूर्तपणे बाहेर येणारे परमेश्वर विषयक बोल म्हणजेच खरी ईशस्तुती होय. कवी जेव्हा इष्टदैवताशी तादात्म्य पावून त्याला जेव्हा अद्वैत प्रचिती आली तेव्हा कवीला साईरुप दिसू लागले. एकतत्वनाम मनात दृढ झाले. सकल ब्रम्हाण्डात, चराचर विश्वातल्या अणूरेणूतही साई तत्व दिसले. कवी साई नामात मंत्रमुग्ध झाला. कवीला साईचरणांचा ध्यास लागलेला आहे, व साईकृपेची ग्रंथकार्यारंभासाठी आस आहे. म्हणून साईला अनन्य शरण जाऊन आत्मसमर्पण केले आहे. जळी-स्थळी काष्ठी-पाषाणी कवीला साईरुप दिसू लागले. अष्टांगे श्रीसाईचरणी लीन झाली. कवी कायावाचामनाने श्रीसाईनामात शुद्ध अंतःकरणाने तल्लीन झाला आहे. अशा उन्मनी अवस्थेत कवीला गणेशही साईरुपच दिसू लागला तर नवल ते कसले ?

गणेश विघ्नकर्ता तसाच विघ्नहर्ताही आहे. प्रथमारंभी गणेशाने स्तवन म्हणजे कार्यसिद्धि व प्रारंभी गणेश विस्मरण म्हणजे संकट होय. काही भक्तांनी श्रीसाईला नवविधा भक्तिने प्रसन्न केले तर बाबांचा शब्द अव्हेरुन दुःखही प्राप्त झाले व अनेक अडचणी आल्या. अशा गजानन रुपी साईची कवीने अनेक उदाहरणे दिली आहेत.

गणेशभक्त मुद्गल मुनिंनी गणेशकृपे "मुद्गल पुराण" लिहीले तसेच कवीने

गजाकृति साईचे स्मरण करून "श्री साईसच्चरित" व दासगणूंनी भक्ति लीलामृत व संत लीलामृत ग्रंथ लिहिले.

त्रिबकजी डेंगळेच्या घरी बाबासाहेब डेंगळेंचे लहान बंधु नानासाहेब दोन पत्नी करूनही पोटी संतान नव्हते परंतु बाबांना अनन्य शरण जाताच संतान झाले.

बाबांनी एका भक्ताच्या डोळ्यात बिब्बे ठेचून गोळे घातले. लोक घाबरले परंतु दुसरे दिवशी नेत्र सूज कमी येऊन डोळे बरे झाले. शुद्ध भक्तिने विष सुद्धा अमृत होते.

बाबांनी अनेक भक्तांकरीता वेळोवेळी चमत्कार दार्खविले तसेच त्यांच्या शब्द अव्हरलेल्यांची दुर्दशा झाली. साईरहित कामात विघ्ने आली. तात्या कोते बाबांचा शब्द अव्हेरून शामाशिवाय बाजारात जाऊ लागले. पुढे जाताना चपळतेने जाणारे घोडे कंबरेत लटके पडले.

तात्या कोल्हार साईभेट न घेता पुढे जाताच घोडे उधळले परंतु संकटात निष्ठेने व शुद्ध भावाने साई गजर करताच अरिष्ट टळले व बाभळीवर आदळले. एका परदेशी गृहस्थाची अशीच अवस्था झाली व रस्त्यात अपघात होऊन हॉस्पिटलमध्ये गेला. साईभक्त व नाशिकचे वकील भाऊसाहेब धुमाळ यांचेही बाबांनी कोर्टाचे काम केले.

बाबांनी गणेशासम भक्तांना यशापयश दिले म्हणून कवीचा गजाकृतिसाई योग्य व स्तुत्यही आहे.

# ऑल इंडिया साई समाज

# आगामी अधिवेशन - बंगलोर येथे

ऑल इंडिया साई समाज मद्रास (संस्थापक प. पू. श्री. नरसिंह स्वामीजी) व श्री साई स्पिरीच्युअल सेंटर बंगलोर (संस्थापक प. पू. श्री साई पादानंद उर्फ राधाकृष्ण स्वामीजी) या दोन ज्येष्ठ संस्थांच्या वतीने यंदाचे अखिल भारतीय श्री साई भक्तांचे अधिवेशन शनिवार दिनांक २३ व रविवार दिनांक २४ नव्हेंबर १९८५ रोजी बंगलोर येथे श्री साई स्पिरिच्युअल सेंटरच्या भव्य विस्तारीत वास्तूत भरविण्यात येत आहे.

बंगलोर येथे भरणाऱ्या येत्या अधिवेशन प्रसंगी विविध भरगच्च कार्यक्रमांची योजना करण्यात आली असून या प्रसंगी एक सुंदर संग्राह्य स्मरणिकाही प्रकाशित करण्यात येणार आहे. या अधिवेशनाच्या संपूर्ण कार्यक्रमाची माहिती पुढील अंकात देण्यात येईल.

# माझा फ्लॅट विकला गेला - ही साईंचीच कृपा

२८२ - सौ. तारा मानकामे
१८५ वेस्ट हेंडॉन
ब्रॉडवे
हेंडॉन, एन. डब्लू ९
लंडन

अनंतकोटी, ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज श्री सद्गुरु साईबाबांना माझे शतशः कोटी प्रणाम. हा अनुभव लिहिण्याचे मी ठरविले आहे कारण, मी बाबांना त्याप्रमाणे सांगितले होते. माझे पती जून १९८४ मध्ये लंडनला परत आले. त्या अगोदर म्हणजे १९६६ साली माझे लग्न झाल्यावर आम्ही ८ वर्षे लंडनमध्ये होतो. दोन मुलांच्या जन्मा नंतर ५, ६ वर्षांनी माझ्या पतीची चांगली नोकरी गेली. त्यामुळे ते लंडनला कंटाळले व परत १९७४ साली जानेवारीत आम्ही पुन्हा भारतात आलो. परंतु तेथेही १० वर्षाच्या आमच्या वास्तव्यात आम्ही खाऊन पिवून सुखी होतो. परंतु माझ्या पतीना नोकरीसाठी खूप खटपट करावी लागली व तरीही त्यांचे काही मनासारखे जमले नाही. व १९८४ च्या जून मध्ये ते पुन्हा लंडनला आले. व म्हणाले की, माझे नोकरीचे वगैरे जमले की मी पुन्हा तुम्हा सर्वांना तिथे बोलावून घेईन. त्याप्रमाणे ३ महिन्यानंतर त्यांनी श्री बाबांच्या कृपेने नोकरी व जागा मिळाल्यावर माझ्या दोन मुलांना तिकडे बोलावून घेतले. नंतर मी एकटी भारतात होते व त्यांनी मला सांगितले की फ्लॅट वगैरे विकून तू सुद्धा तिकडे ये.

आणि माझ्या दुःखाला सुरवात झाली. माझ्या घरमालकानी जो फ्लॅटचा मालक होता त्याने मला अत्यंत त्रास देण्यास सुरवात केली. मी श्री साईबाबांची सारखी करुणा भाकत होते. मालक माझे कांहीच म्हणणे ऐकून घेण्यास तयार होईना. मी त्या घरमालकाला पुष्कळ चांगल्या तऱ्हेने, भाऊ, बहीणीच्या नात्याने सांगून पाहिले की, एकतर फ्लॅट तुम्ही घ्या, मला विकून तरी द्या नाहीतर 'पॉवर ऑफ अॅटर्नी' देऊन मी तो कोणाला तरी देवून टाकेन. परंतु त्याचा काय हेतु होता कळत नाही. कारण त्यानंतर भाडे दिलेले सुद्धां तो घेईनासा झाला. मी 'पॉवर ऑफ अॅटर्नी' देऊन जाते असे समजल्यावर त्याने कोर्टाचा बेलीफ आणला व माझ्यावर नोटीस लावली. त्याचप्रमाणे त्याला सर्व चांगल्या तऱ्हेने सांगून समजावूनही तो ऐकेना व त्यामुळे मला लंडनला येण्यास उशीर होऊ लागला. माझी मुले व माझे पतीनी माझी खूप वाट पाहिली शेवटी माझ्या पतीनी मला कळविले की, तू घर बंद करून ये. परंतु अगदी शेवटपर्यंत मी ठरविले की फ्लॅट पूर्ण काढून टाकूनच जायचे मी सारखी श्री साईबाबांची करुणा भाकू लागले व शेवटी तर त्या घरवाल्याने सांगितले की मी अगदी साफ खोटे बोलत आहे. मी पोलीसांत त्याच्याविरूद्ध तक्रार

केली आहे. मी सांगितले की मला कोणतीही पोलीस चौकी, व माझे तक्रारी पत्र तिकडे घेऊन चला दाखवा पण तो प्रत्येक वेळेस अत्यंत खोटे बोलत आला होता व हे सुद्धा साफ खोटेच होते. परंतु श्री साईबाबा म्हणत होते माझ्याकडून वेळ होईल पण त्याचे फळ तुम्हाला चांगलेच मिळेल. त्याप्रमाणे बरोबर १ वर्ष मी अत्यंत कठीण अवस्थेत काढले व बाबांच्या कृपेने शेवटी तो फ्लॅट घरवाला विकून देण्यास तयार झाला व श्री साईबाबांच्या कृपेने मी ता. १८ जुलै १९८५ मध्ये विमानात बसून सुखरुप माझ्या पतीच्या व मुलांच्याकडे येऊन पोहोचले श्री साईबाबांची कृपा अगाध आहे. त्यांना माझे शतशः प्रणाम. माझे पतीही बाबांचे भक्त आहेत. अशीच आमच्यावर बाबांची कृपा राहो अशी त्यांच्या चरणाशी मी प्रार्थना करते.

।। श्री साईनाथाय नमः ।।

○

# 'भक्तासाठी साई सत्वर धावून येई'

**श्री. आर. एन. पाटील,**
माजी न्यायाधिश, सहकारी न्यायालय
१२ प्रोफेसर कॉलनी, पो. देवपूर
धुळे.

साईबाबांची अनेक वैशिष्टये आहेत. त्यांनी आपल्या आध्यात्मिक सामर्थ्याचा मानवजातीचे कल्याणासाठीच वापर केला यातच त्यांच्या महान कार्याचे महत्व जाणवते. अनेक धर्म, पंथ आणि विचारांचे स्त्री, पुरुष त्यांनी एकत्र आणून एक कुटुंब स्थापन केले. 'वसुधैव कुटुम्बकम'ही वृत्ती वाढीस लावली. मानव जातीत प्रेम, बंधुत्व आणि शांतीचा प्रसार केला. सर्व महान साधु संतांनी हे कार्य केले आणि करीत आहेत. त्यांच्या कार्याची महती हीच की त्यांनी समाधी घेतल्या नंतरही त्यांचा संप्रदाय फार मोठया प्रमाणावर वाढत आहे जणू काही त्यांचा आत्मा अमर असून तो भक्त जनास सदैव स्फूर्ती देत आहे.

बाबांचे भक्तावरील प्रेम असामान्य असे होते नव्हे आहे. असा अनुभव पूर्वी लोकांना आला आणि आजही येत आहे. म्हणून कवींनी अनेक शब्दात बाबांच्या भक्तावरील प्रेमाचे वर्णन केलेले आहे.

**कां भोगशी रे अवस्था विपन्न । जा शरण तू साईबाबा प्रसन्न ।**

हे शब्द आमचे अनुभवास आले.

मी सन १९५२ पर्यंत साईबाबांचे नाव देखील ऐकलेले नव्हते. तसे म्हटले तर आमच्या वडिलांचे एक स्नेही श्री. गणपुले हे प्रत्यक्ष बाबांजवळ शिरडींत राहून

आलेले होते आमचे कुटुंबाशी त्यांचा घनिष्ट संबंध असे. त्यांना बाबांचे आशिर्वादाने वैद्यकीचे ज्ञान प्राप्त झाले होते आणि पुढे रजिस्ट्रेशन मिळवून ते खेडोपाडी गोरगरीबांची सेवा करीत असत. पैशाचा फारसा लोभ त्यांना नसे. औषधाला कोणाजवळ पैसा नसला तरी त्याला तुळशीचा काढा, आल्याचा रस, कोरफडीचे सालाचा अर्क इत्यादि साध्या उपायांनी ते खेडोपाडी धावत जावून लोकांना जीवदान देत असत. कधी आयुर्वेदाचा तर कधी निसर्गोपचार पद्धतीचा ते वापर करीत असत. मधून मधून ते साईबाबांचे नावाचा उल्लेख करीत. आमचे वडीलांना देखील कै. गणपुले यांनी त्यांची विद्या कांही प्रमाणात दिलेली होती. त्यामुळे तेही त्या तंत्राचा वापर करून खेडोपाडी लोकांना साध्या इलाजाने दुःख मुक्त करीत होते. फारच मोठे दुखणे असले तर कै. गणपुले यांना बोलावणे पाठवीत आणि तेही तांतडीने व आनंदाने येत असत. त्यांचे आगमनाने खेडयांतील लोकांना फार आनंद होई आणि ते सर्व एकत्र जमून त्यांचे स्वागत करीत. कारण त्यांचे जवळ बसून औषधपाण्याची तर व्यवस्था होईच परंतु त्यांच्या गप्पांतून लोकांना खूप माहिती मिळत असे. ते सारखे बोलत असत सर्वांची ओळख ठेवून विचारपूस करीत असत. कै. बाबांचाच तो सांप्रदाय होता असे मानावे लागेल. आम्हा लहान मुलांना देखील ते येणार या बातमीने आनंद होत असे. ते हयात असे पर्यंत मी मुंबई, अहमदाबाद येथे शिक्षण घेत होतो. तरीही औषधपाण्यासाठी कै. गणपुले नानांचा सल्ला घेत असू त्यांचे औषध आम्हाला ताबडतोब लागू पडत असे. सन १९६८ साली मी मुंबईतच वकील झालो तोवर कै. नाना गणपुले जीवंत होते.

माझे तोवर लग्न झालेले होते. परंतु चार वर्षे होवूनही आम्हाला मूळ बाळ नव्हते. याची खंत माझ्या पेक्षा माझी पत्नी सौ. शांताबाई हिलाच फार वाटत होती. तिने कै. नाना गणपुले यांचाच उपचार घेतला. सुदैवाने आम्हाला १५ ऑगस्ट १९५३ रोजी पहिला मुलगा डॉ. बेडेकरांचे ठाणे येथील हॉस्पीटलात झाला. बाळंतपणात फार यातना झाल्या. परन्तु आमचे एका वकील मित्रांचे पत्नीने बाळंतीणीला धीर दिला. साईबाबांची ओळख तिनेच आम्हाला दिली. आम्ही बाबांचा धावा केला. डॉ. बेडेकर फार चांगले गृहस्थ होते. आमचा स्नेह होताच त्यांनी मुंबईहून तज्ञ डॉ. मंगेशीकरांना बोलावून फॉरसेप्स लावून मूल बाहेर काढले. मूल पुढे सुखरूप मोठे झाले तदनंतर आम्हाला चार मुलगेच झाले.

पहिला मुलगा सहा महिन्यांचा झाल्यावर मला तर बाबांचा विसरच पडला होता. तसा मुंबईत 'साईसमाज', साईबाबांचे मंदीर वगैरे बाबी दिसत होत्या. ऐकावयास येत होत्या. परंतु त्याकडे फारसे लक्ष जाईना. एके दिवशी माझ्या पतीने शिरडीला जाण्याची इच्छा प्रकट केली आणि आपल्याला मुलगा बाबांचे कृपेनेच झाला आहे असे ठासून सांगितले. मीही संमति दिली. आणि आम्ही शिरडीस जावून थडकलो. तेथील वातावरण त्यावेळी फारच शांत होते. एकच निवास स्थान होते.

मोजकी मंडळी येत असे. आता परिस्थिती फारच बदलली आहे.

तदनंतर आम्ही बाबांचा फोटो घरी लावला कै. गणपुले नानांना शिरडीला जावून आल्याचे सांगितले. त्यांना फार आनंद वाटला. त्यांनी आम्हाला बाबांच्या अनेक आठवणी सांगून त्यांची महती वर्णन केली. आमची श्रद्धा दुणावली. पुढे माझा परिचय मुंबईतील साई सांप्रदायी लोकांशी वाढला. श्री साईसंस्थान ट्रस्ट रजिस्टर करतांना घटना तयार करणारे कै. एम्. एस्. पाटील, सेवा निवृत्त जिल्हा न्यायाधिश आणि त्यांचा मुलगा कै. निजु पाटील, माननीय श्री. बाळासाहेब सावंत वगैरे अनेकांचा परिचय झाला. मुंबईचे कॉंग्रेस हाऊस जवळच श्री साई मंदिर स्थापन झाले तेथेही जावू लागलो. एकदा कै. निजू पाटील आणि मी शिरडीला जायचा विचार केला आणि कै. एम्. एस्. पाटील यांचा बेळगांव कडील जुना वयस्कर पक्षकार येवून तो त्यांना भेटला. त्याचे जमिनीचे कामात हरल्यामुळे त्याला तांतडीने मनाई हुकुमाची आवश्यकता होती. कै. श्री. एम्. एस्. पाटील म्हणाले तुम्ही अगोदर या म्हाताऱ्या माणसाचे काम करा आणि मगच शिरडीला जा. या माणसाचे रुपाने प्रत्यक्ष बाबाच तुमची परीक्षा घ्यावयास आले आहेत. आम्ही गुपचुप त्याचे कामाला लागलो आणि ताबडतोब मनाई हुकुम मिळविला व त्याला त्याच दिवशी गावी रवाना केले.

पुढे मी साई संस्थानचा आजीव सदस्य झालो. परंतु शिरडीला जाणे फारसे जमेचना. मग योगायोगाने कोपरगांव कोर्टात मुंबईच्या एक माणसावर केस दाखल झाली त्याने मला आग्रह केल्यावरून मी ती केस घेतली. दर पंधरवडयाला कोपरगांवी केसला हजर राहून शिरडीला दर शनिवारी मुक्काम होवू लागला, कोपरगाव, सिन्नर व नगर येथे अनेक वकील मित्रांच्या भेटी होत असत. पुढे पुन्हा खंड पडला. दरवेळी उत्सवानंतर उदी आणि प्रसाद मात्र टपालाने येतो. सध्या धुळयालाच असल्यामुळे जवळ असूनही शिरडीला जाणे जमत नाही. सध्याच बाबांनी, एका अतिशय गरीब बाईचा नवरा वारला त्याची ग्रॅच्युइटी, पगार, फंड वगैरेची बाकी मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे जावे लागत आहे. त्यानिमित्ताने शिरडीला मुक्काम होत असतो. अशा रितीने भक्ताची आठवण ठेवून त्याची काळजी बाबा करीत असतात याचा अनुभव सतत येत असतो.



# द्वारका माई काय बोलत आहे

२८५

**सौ. उषा प्रभाकर मुळे**
पेटकर वाडा, नारायण पेठ,
पुणे ३०

साई भक्तांनो माझ्या पवित्र पायऱ्या चढून जेंव्हा वर याल तेव्हा, विचार करून शांत मनाने या द्वारका माईत काय पहाल, आणि विचार करा, आजचा माणूस पशू का झाला ! याचा विचार करा. माझ्या प्रत्येक वस्तुला स्पर्श करा काय सांगत आहेत त्या वस्तु ऐका सांगते –

श्री साईबाबा दृष्टे होते म्हणूनच मसजिद व द्वारकामाई भेद नाही, या छोटया जागेत समतेचा संदेश देणारे दृश्य समोरच दिसते की तेथे मुस्लीम भाई आपला माथा ठेवून नमाज पढतात. प्रेमाने श्री साईंना आळवितात, ही एकता, समता हा बंधुभाव हे विश्वप्रेम कुठेच दिसत नाही. धुनीमाई काय बोलत आहे पार्शी बांधवांचे ते पवित्र स्थान तेथेही पूजा चंदनाच्या पवित्र धूपाने केली जाते, हिन्दुला जाणीव होते एक दिवस क्षण भंगूर होणार सावध व्हा, जीवन नश्वर आहे, का भांडता, भाई भाई समजा द्वेष सोडा सर्व धर्म समान आहेत. तो कोळंबा बघा त्यात टाकलेले अन्न सर्व धर्माचे लोक प्रसाद म्हणून खात आहेत. डेऱ्यातील पाणी तीर्थ म्हणून पीत आहेत. काय समजावे यातून, थोडे सरकवून प्रतिमेकडे चला ते बघा जाते (चक्की) धान्य दळा. स्वत: कष्ट करा, फुकटचे खाऊ नका, याचना करू नकात.ते बघा गव्हाचे पोते काचेच्या कपाटात भरलेले आहे. साठा करून ठेवा. खाली ठेवू नका. हात रिकामे करू नका, हा प्रचार श्री साईबाबांनी कोठे सभा घेऊन किंवा किर्तन करून केला नाही. आपल्या गूढ संदेशातूनच प्रत्येक बोध ते देत. परंतु जे भक्त येत ते स्वार्थी, लोभी येत होते. त्यांचीही 'चल हट' म्हणून निर्भत्सना केली जात होती. सर्व काही स्पष्ट कुठेही भीड भाड नाही.

चला, त्या दिव्य, भव्य प्रतिमेला हात लावा दर्शन घ्या. त्या वेळी तरी मनात पवित्र भावना ठेवा. त्या वेळी आपल्या मनाची, विचारांची स्थिती कशी होते हे ध्यान पूर्वक लक्षात घ्या. काही तरी अदृश्य शक्तीचा भास होतो. क्षणभर स्वगुरु ठयीच विश्वास बसो । हाचि उपदेशो येथिला, मनी ठसावा गुह्यार्थहा ।

एक डॉक्टर, जातीने ब्राम्हण. रामोपासक, स्नान संध्या, नेम, धर्माची आवड असलेले दर्शनाला आले. परंतु शंका श्री साईबाबा मुसलमान. आपण नमस्कार करणार नाही असे म्हणाले. मित्र म्हणाले, आपल्याला कोणीही "पाया पडा" असा आग्रह करणार नाहीत. मशिदीत गेले आणि आरंभी त्यांनीच श्री साईबाबांना लोटांगण घातले. ते राम रूप त्यांना साक्षात् दिसले. त्यांना मुसलमान कसे म्हणावे

जातीचा विचार येथे नव्हता. बंधुभाव, ममता हेच दर्शन होत होते. दिपोत्सव, पालखी, रथ यांचा दिव्य भव्य सोहळा येथूनच सुरू होतो. तेव्हा भक्तांनो माझ्या पायऱ्या चढताना या गोष्टी लक्षात ठेवा जास्त काय सांगू.

**गुरुर्ब्रम्हा गुरू र्विष्णु गुरूर्देवो महेश्वर ।।**
**गुरू:साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम : ।।**

●

# श्री साईनाथांचा शरणार्थी

**लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद**
अनुवादक श्री. वि. बा. खेर

[ १९१३ साली मे महिन्यात कोर्टाला सुटी पडल्यावर पूर्वाश्रमीचे वामन प्राण गोविंद पटेल शिरडीला गेले तेथे त्यांना अकरा महिने साईबाबांनी ठेवून घेतले. त्या काळात जे काही पारमार्थिक अनुभव त्यांना आले ते या लेखापासून क्रमशः पुढे दिले जातील ]

वासुदेव नावाचा पुण्याचा ब्राम्हण शिरडीत खानावळ चालवे. त्याच्याकडे सगुणराव राहात. हल्ली ज्या जागी सगुणराव राहतात त्याच जागेच्या आतल्या भागात वासुदेव राही. बाहेर ओटा होता. आता त्या जागी सगुणरावांचे दुकान आहे. त्या ओटयावर बसून सर्व गिऱ्हाईके चहा पाणी, नास्ता वगैरे करत. माझ्या जेवण्याची सोय मी वासुकाकाबरोबर रुपये २० ला नक्की केली. द्वादशीच्या दिवशी कधी कधी वासुकाका शिरा आणत. जर बाबांच्या सकाळच्या न्याहरीच्या अगोदर शिरा आला तर तो सरळ बाबांकडेच पोचविण्यात येई. परंतु एके दिवशी तो उशीरा आला व मी तो खाल्ला. त्याच दिवशी बाबांनी मला काडेपेटया आणायला पाठविले. बाबा नेहमी दोन पैशांच्या तीन काडेपेटया मागवत परंतु मी चौकशी केल्याशिवाय एका पैशाची एक काडेपेटी आणली. तेव्हा बाबा मला म्हणाले, ''काय दारुबिरु पियालास तर नाही ?'' त्या दिवसा पासून उपवासाच्या दुसऱ्या दिवशी पारण्याला जेव्हा शिरा असतो तो खाताना मी थबकतो.

एके दिवशी स्वप्नात 'तुला शंकराचा आशिर्वाद आहे' असे सांगून बाबांनी माझ्या माथ्यावर आपला वरद हस्त ठेवला. या नंतर काही दिवसांनी स्वप्नात जसा वरद हस्त ठेवला त्याप्रमाणे माझ्या शिरावर जवळ जवळ पाच मिनिटं बाबांनी हात ठेवला. त्या योगे माझ्या शरीरात शक्तिसंचार होऊन स्वप्नात जाणीव दिलेले कार्य तुझ्या हातून व्हावयाचे आहे असे सुचविले.

भर दरबारात बाबा एके वेळी माझ्या संबंधी म्हणाले, "हा लहान उंदरा एवढा होता त्या वेळेपासून मी ह्याला ओळखतो. बाबांनी काढलेले हे उद्गार माझ्या आईला सांगितले तेव्हा तिने मला जी हकीकत सांगितली ती अशी : बाल्यावस्थेत मी फारच अशक्त होतो व वारंवार आजारी असे. मी सुमारे पाच वर्षांचा असताना माझे वडील धारासणाला मीठाच्या आगरावर नोकरीला होते. आम्ही त्या वेळी तंबूत राहत असू. काही महिन्यांपासून मला संग्रहणी, अतिसार व उलटीचा विकार होता आणि माझ्या जीविताची आशा सर्वांनी सोडली होती. अशा वेळी एका दुपारनंतर माझी आई मला घेऊन अंगणात उसासे टाकीत बसली असता, एकाएकी एक फकीर तेथे आला आणि तिला म्हणाला, "हा तुझा मुलगा फार भाग्यशाली ! ह्याला एकसारखे जुलाब होतात आणि आम्हाला वाटतं की हा चार दिवसांचा सोबती आहे." फकीराने उत्तर दिले, "नाही नाही, असं बोलू नको, हा तर फार भाग्यशाली आहे. ह्याच्या उजव्या कुशीत चामखीळ व उजव्या बाजूला एक जन्मखूण आहे." माझ्या अंगावरची गोदडी सारून व झबले उंच करून माझ्या आईने पाहिले तर फकीराने सांगितलेल्या खुणा खरोखरीच त्या जागी होत्या. हे पाहून माझी आई म्हणाली, "तुम्ही सांगितलेल्या जन्मखूणा आहेत खऱ्या पण ह्याच्या आजाराचं आणि तब्येतीचं काय ?" फकीर म्हणाला, "हे भस्म घे. ते त्याच्या तोंडात घाल आणि सर्व ठाकठीक होईल." यानंतर माझी तब्येत काही दुसरे उपचार केल्याशिवाय सुधारायला लागली व सर्व चिंतामुक्त झाले. या हकीकतीवरून माझी खात्री झाली की बाबा माझे लहानपणापासून संभाळ व रक्षण करत आहेत.

एकदा सकाळच्या साठे आठ वाजताच्या किंवा दुपारच्या बैठकीत मी व बालकराम मानकर बसलो असताना बाबा म्हणाले, "हा आणि बालकराम एके काळी समोरासमोरच्या गुहेत राहून तप करीत होते." त्याच किंवा दुसऱ्या रात्री मी स्वप्नात पाहिले की मी एका गुहेत तप करीत आहे व रात्री एक स्त्री येऊन माझे पतन झाले. या वरून मी बोध घेतला की आपण दुसऱ्याचे गुणदोष जाणत असून सुद्धा लोकांना त्याच्याकडून चांगलं घेण्यासारखं असेल तेवढेच त्याच्यासंबंधी बोलावं.

एके रात्री बाबा म्हणाले, "हा घे रुपया व रुपयाची मोड आण." बऱ्याच जणांना विचारले पण सुटे पैसे मिळाले नाहीत. नंतर एकजण म्हणाला की, बयाजीकडे जा त्याच्याकडे मिळेल. त्याचे घर शोधत गेलो व त्याने मोड दिली ती घेऊन बाबांना दिली. याचं रहस्य अस की बाबांनी मला ऐक्याचा, तादात्म्याचा रुपया दिला पण मी त्यांना काय अर्पण करायचे ? 'मोड'. तोडून तोडून एक एक भाग पृथक करीत करीत मायेचा मांडलेला हा खेळ संपवून, त्याचे रहस्य जाणून ते त्यांचे चरणी अर्पण करायचे. 'अहं ब्रम्हास्मि' म्हणत आसन घालून स्वस्थ न बसता

मायेतील पृथक तत्वांचे अवलोकन करून त्यामागे असलेल्या एका तत्वाला पारखून ते बाबांना अर्पण करायचे. 'मोड' म्हणजे काय ? मायेचे चूर्ण करून टाकते ते कूटस्थ साक्षीभूत. परमात्म्याबरोबरच्या तादात्म्याची चालती बोलती स्थिती.

एकदा माझ्या मनात विचार आला की भाषा तरी किती शिकाव्या ? इंग्लिश, संस्कृत, मराठी, गुजराती तर आहेतच पण संस्कृत व मराठीचे ज्ञान कच्चे आहे. त्यासाठी आता माथेफोड कशाला करावी ? हा विचार येताच बाबा म्हणाले, "अरे चार छबी घ्याव्या. यात माथेफोडीचा प्रश्न कुठे येतो ?" आता कळते की त्याचा असा पण अर्थ होतो की चतुर्विध वाणी, परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी! परमेश्वराची, ईश्वराची, हिरण्यगर्भाची व मानवाची अशा चार वाणींतील तारतम्य जाणून कार्यप्रवृत्त व्हावयास शिकावे. श्रृति, स्मृति, पुराण व संतवाणी या चार प्रकारच्या वाणीच होत. त्यांना प्रमाण मानून कार्याकार्याचा विचार करावा. शिवाय 'विष्णुसहस्त्र'मध्ये सुद्धा 'चतुरात्मा, चतुर्व्यूह, चतुर्दृष्टि व चतुर्भुज' यांच्या उल्लेखाने चारची महत्ता आहे. तसेच चारचे महत्व खालील श्लोकात आहे :

**चतुर्मूर्ति श्चतुर्बाहश्चतु र्व्यूहश्चतुर्गति :**
**चतुरात्मा चतुर्भावश्चतुर्वेद विवेकपात्**

याचा विचार चालू असता आवाज ऐकला - चतुमूर्ति म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश तू व मी हा सगळा माझाच कारभार तेव्हा हे चौघे ब्रह्मा, विष्णु, महेश व तूं माझेच आहात असे समज.

बाबांच्या जवळ डाव्या हाताला कठडयाच्या बाहेर एकदा खाली बसलो असताना विचार आला : अरेरे ह्या नश्वर शरीरासाठी आणखी आता सॉलिसिटरच्या कठीण परीक्षेच्या निमित्ताने खूप मेहनत करायची आणि परीक्षा पास होऊन कमवायची खटपट ही कोणासाठी ? बाकीच्यांशिवाय माझे पोट थोडी मेहनत करून भरेल, माझा निर्वाह सहज होऊ शकेल. हा विचार येताच बाबा ताबडतोब म्हणाले, "आपल्याला तर काही लागत नाही. परंतु जे हे सगळे करायचे ते सर्व इतरां करिताच करायचे असते.

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।।**

**अ. ३, श्लो. २२**

बाबा भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचे सार ठरविण्यासाठी वरील वचन बोलले. आणखी आता असे पण वाटते की माझ्या स्वार्थी भावापेक्षा अर्जुनाचा भाव किती उच्च होता की गीतेच्या पहिल्या अध्यायातच तो भगवंताला म्हणाला, 'हे राज्य, भोग व सुखे मला काय करायची ? ज्यांच्यासाठी ह्या सर्वांची आकांक्षा असावयाची

ते सर्व आचार्य, चुलते, पुत्र, आजे, मामा, सासरे, नातु आपले प्राण व धन यांची आशा सोडून युद्धास माझ्यासमोर उभे आहेत (श्लो. ३३-३४). अर्जुनाची केवढी उच्च भूमिका की जे सर्व मिळवायचे ते स्वतःच्या सुखासाठी नाही तर दुसऱ्यांच्या सुखासाठी ! राज्य सोडून भिक्षान्नावर निर्वाह करण्याची ज्याने तयारी दर्शविली त्या अर्जुनाचे काय वैराग्य व दुसऱ्याचे हित साधण्याची अभिलाषा ! या मुळेच भगवंत त्याला अनेक बिरुदांनी नावाजतो – भक्तोऽसि मे सखाचेति, मे प्रियोऽसि.

एक दिवशी दुपारनंतर विचार आला की इतर सर्व बाबांची रोज पूजा करतात, परंतु मी तर काही शुभ पर्वाचे दिवशीच पूजा करतो. मग मी पण पूजा का करू नये म्हणून पूजा साहित्य घेऊन बाबांकडे गेलो. त्यांना चंदन लावत असता नंतर विचार आला की आज मी पूजा करत आहे ते बरे आहे. कारण बाबा जेव्हा नसतील तेव्हा पूजा न केल्याबद्दल पश्चात्ताप तरी होणार नाही. हा विचार येताच बाबा हसले – असं सुचवून की 'अरे मी काय हे शरीर आहे ? मी तर सदैव आहेच. मी नसेन अशी चिंता का करतोस ?

बाबा प्रसंगोपात माझे खूप लाड करत. एकदा मी जराक अंतरावर बसलोअसताना माझ्या टोपीवर विडा टाकला. कधी कधी प्रेमाने भेटत तर कधी गालगुच्चे घेत व अत्यंत प्रेमाने प्रसाद देत. त्यामुळे भक्तांचा सुद्धा माझ्यावर सद्भाव जडला. सुरुवातीस बाबा सकाळी लेंडीवरून आल्यावर मी कठड्या बाहेर कट्ट्यावर किंवा खाली बसे त्या वेळच्या एक प्रसंगाची आठवण ताजी आहे. एक चौदा पंधरा वर्षांची मुलगी विविध रंगांच्या फुलांचा तुरा बनवून बाबांना देई तो हुंगून बाबा लगेच मला देत. मी तुरा मुक्कामावर घेऊन जाई तेथे एक सात आठ वर्षाची मुलगी तो मागे व तो मी तिला देई. असं सात आठ दिवस चाललं. नंतर मला एकदा विचार आला की बाबांनी दिलेल्या वस्तूंची मी कदर करत नाही आणि त्या कोणी मागितल्यास देऊन टाकतो ही चूक आहे. बाबांच्या हातच्या वस्तू थोड्याच नेहमी मिळणार आहेत ! या विचाराने दुसऱ्या दिवशी बाबांनी हुंगलेला तुरा त्या मुलीला न देता एका डब्यात ठेवला. परंतु बाबांना हा संग्रह पसंत पडला नसावा कारण दुसऱ्या दिवसा पासून मला तुरा देण्याचे त्यांनी बंद केले. हा तुरा तसेच बाबांच्या मोडक्या चिलिमेचा तुकडा (जिचे 'माझी नवरंगी चिलिम' असे बाबांनी वर्णन केले) पुष्कळ दिवस त्या डब्यात आठवण म्हणून ठेवला होता. या वरून मी असे शिकलो की बाबांकडून जी काही सुंदर वस्तु मिळते तिचा संग्रह न करता जे प्रेमाने ती मागतात त्यांना आढेवेढे घेतल्याशिवाय देऊन टाकावी. म्हणून बाबांची पूजा करत असता माझ्या अंगावरील उपरण्याला बाबांच्या पायाचे खूप चंदन लागले होते ते मी प्रसाद समजून प्रेमपूर्वक जपून ठेवण्याचे योजले असता मुक्कामावर गेल्यावर राधा कृष्णा आईची त्यावर नजर पडताच तिने त्याची मागणी केली असता देऊन टाकले.

[ क्रमशः ]

# श्री. खापर्डे यांची – शिरडी दैनंदिनी

**अनुवादक - साईनंद**



गुरूवार दिनांक ८-१२-१९१०

आम्ही सकाळी उठलो. नित्यकर्मे आटोपली. प्रार्थनेनंतर आम्ही वाडयातील सर्वांनी साई महाराजांना ते नित्या प्रमाणे बाहेर जाताना पाहिले. नंतर दुपारी आम्ही महाराजांचे दर्शनास गेलो खरे परंतु आम्हाला माघारी यावे लागले. का ? तर महाराज आपले चरण धूत बसले होते.

आज वाडयात श्री. बाबासाहेब, श्री. सहस्त्रबुद्धे, मी, माझा मुलगा चि. बाबा एव्हढीच काय ती मंडळी होतो. परंतु सकाळीच एक सज्जन आमच्या या चौघांबरोबर रहाण्यासाठी म्हणून वाडयात उतरले. तेव्हा आम्ही सर्वांनी मिळून श्री बाबांच्या दर्शनास जाण्याचे पुन्हा ठरविले नि गेलो पण. पण काय ?... आम्हास पुन्हा दर्शन न होता माघारी यावे लागले. तात्यासाहेब नूलकर मात्र यावेळी आमचे बरोबर आले नव्हते.

आम्ही नंतर पुन्हा एकदा सर्व मिळून बाबांच्या दर्शनास गेलो खरं पण त्यांनी

दर्शन देऊन आम्हास लौकरच तेथून परत जाण्यास सांगितले. म्हणून आम्ही सर्वजण परतलो. आज बाबा काहीसे विचारमग्न दिसत होते.

आज रात्री साई शहीद चावडीत निद्राधीन होणार होते आणि म्हणून द्वारकामाईतून चावडीकडे जाणारी त्यांची मिरवणूक पहाण्यासाठी म्हणून आम्ही सर्वजण गेलो. मिरवणूक फारच छान निघाली होती.

आमच्या वाडयात वर निर्देश केलेला आज सकाळीच आलेला सज्जन एक पोलीस अधिकारी आहे मला वाटते तो 'हेड कॉनस्टेबल' असावा. पैसे उपटण्याच्या आरोपावरून त्यास अटक करण्यात येऊन सेशन कोर्टात उभे करण्यात आलेले होते. आपली जर आपल्यावर आलेल्या आरोपातून निर्दोष मुक्तता झाली तर आपण श्री साई महाराजांच्या दर्शनास येऊ असा त्याने नवस केला होता. सुदैवाने त्याची मुक्तता झाली व बोलल्या प्रमाणे आपला नवस फेडण्यासाठी म्हणून तो मुद्दाम शिरडीस आला होता. साई महाराजांनी त्याचेकडे पाहून वरकरणी म्हटले, "अरे तू जिथे होतास ना ! तिथेच आणखीन काही दिवस कां बरे राहिला नाहीस ? त्या तिथल्या गरीब बिचाऱ्यांची चांगलीच निराशा झाली असेल नाही !!" साई महाराज हे दोनदा बोलले. पण त्या बिचाऱ्याकडून त्याचे काहीच उत्तर आले नाही. त्या भल्या माणसाच्यां एका मित्राने त्याला तिथेच रहाण्याचा भलताच आग्रह केला होता खरा परंतु त्या सज्जनाने त्याच्या त्या आग्रहाला बळी न पडता आपला नवस पूर्ण करण्यासाठी म्हणून ते तेथे त्वरेने आले होते हे आम्हाला नंतर समजले. त्यांनी साई महाराजांना यापूर्वी कधीच पाहिले नव्हते आणि महाराजांनी पण त्या सज्जनास यापूर्वी कधीच बघितले नव्हते. असे सारे असताना महाराजांनी या गृहस्थाच्या बाबतीतील साऱ्या काही गोष्टी कशा काय कळल्या याचेच आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटते.

शुक्रवार दिनांक ९-१२-१९१०

आज मी आणि मुलगा बाबा शिरडीहून निघण्याचा विचार केला. सकाळी प्रार्थने नंतर आम्ही दोघ बाबांच्या दर्शनास गेलो होतो. माझ्या मुलाकडे पाहून श्री बाबा म्हणाले, "आज तुमचा येथून निघण्याचा विचार आहे वाटतं तुम्हाला जर जावेसे वाटले तर जा." आम्हाला वाटते बाबांनी परवानगी दिली; आणि म्हणून आम्ही जाण्याचा विचार पक्का केला. माझ्या मुलाने सगळी आवरा आवर नि बांधाबांध केली आणि आम्हाला नेण्यासाठी म्हणून छकडा पण ठरलिला.

दुपार झाली आणि प्रत्यक्ष निघण्यापूर्वी साई महाराजांचे पुन्हा एकदा दर्शन घेऊन त्यांना सांगून सवरून येण्यासाठी म्हणून आम्ही पुन्हा द्वारकामाईत बाबांच्या दर्शनास गेलो. मला पहाताच साईजी म्हणाले, "तुम्ही नक्कीच जात आहांत काय "होय बाबा जाण्याची तर इच्छा आहे पण तुम्ही परवानगी दिलीत तर" मी

उत्तरलो. "तर मग असं करा, तुम्ही उद्या किंवा परवा जा." हे येथे आपलेच घर आहे. हा वाडा आपलाच आहे आणि मी इथं असताना तुम्हाला आणखीन कुणाची गरज आणि भिती तरी कशाला वाटावी बरं ! हे तुमचंच घर आहे आणि आपले स्वत:चेच घर या नात्याने तुम्ही हे सारे पहावे" मी तिथे रहाण्याचे कबूल केले आणि शिरडी सोडून जाण्याचे पूर्वीचे सारे विचार उधळून लावले. आम्ही शिरडीहून निघण्याचा बेत साफ रद्द केला साई महाराज आज खूपच चांगल्या मन:स्थितीत होते म्हणून आम्ही तिथेच गप्पा मारीत बसलो. गप्पा मारता मारता साईनी कितीतरी रंजक गोष्टी सांगितल्या खऱ्या परंतु मला भिती वाटते की त्यापैकी फारच कमी मला उमगल्या.

शनिवार ता. १०-१२-१९१०

सकाळी आम्ही सर्व नेहमी प्रमाणे उठलो. प्रात:कर्मे, स्नाना नंतर प्रार्थना केली आणि माझा मुलगा बाबास म्हणालो, "आपण येथून कधी निघणार याबद्दल साई महाराजांना कधीच काही बोलू विचारू नकोस. बाबांना सारे काही समजते आणि आपल्याला येथून कधी पाठवायचे हे पण त्यांना चांगले माहित आहे. ते जेव्हा परवानगी देऊन पाठवतील तेव्हाच येथून निघू या हं." नेहमी प्रमाणे आम्ही महाराजांना बाहेर पडताना पाहिले. त्यांचे दर्शन घेतले ते चावडीतून द्वारकामाईत गेले. नंतर आम्ही पण तिथे गेलो.

साईमहाराज आज मोठ्या खुषीत होते. त्यांनी आज एका तरुण मुलीच्या पूर्वायुष्याची कहाणी सांगितली. ती मुलगी एकावेळी त्यांचे बरोबर येथे खेळत असे. बाबा पुढे म्हणाले, ती एक कलाकार होती पण ती अकाली वारली. तिचे एका ठिकाणी दफन केले गेले. आपण स्वत: त्या तिच्या थडग्याच्या वाटेने गेलो असता एक रात्र तिच्या थडग्याजवळ राहून काढली. ती नंतर सूक्ष्मदेहाने मजबरोबर आली. मी तिला जवळच्याच बाभळीच्या झाडावर टांगून ठेवले; आणि मग तिथून निघून ती पुन्हा इथं आली. आपण पूर्वीचे कबीर आहोत आणि मी कापड विणीत असे." असे हे बाबांचे चालू असलेले संभाषण खूपच चांगले होते. पण मला त्यातून खूपच कमी अर्थबोध होत असे.

वाडयात आज दुपारी वर्ध्याचे श्री. श्रीधरपंत परांजपे आले. त्यांचे बरोबर पंडित नावाचे एक सज्जन, एक डॉक्टर आणि तिसरे कुणी सज्जन होते. अहमद नगरचे श्री. पटवर्धन (ज्युनियर) हे पण या सर्वांचे बरोबर होते. माझा मुलगा बाबा व ते कॉलेजातील जुने मित्र. ही सारी मंडळी साई महाराजांचे दर्शनास गेली आणि आम्ही पण त्या सर्वांच्या मागोमाग बाबांच्या दर्शनास गेलो.

आपल्या दर्शनास आलेल्या इतर भक्तांना बाबा जशी वागणूक देत तशीच

वागणूक बाबांनी या मंडळीना पण दिली. या मंडळींच्या अगोदर आलेली तेली, मारवाडी मंडळी यांचे बरोबर बाबा बोलले. नंतर तिथे चालू असलेल्या इमारती बांधकामा बद्दल ते बोलू लागले व शेवटी म्हणाले, ''हे जग किती वेडे होत चालले पहा. प्रत्येक माणसाकडे काही ना काहीतरी वेडया, खूळया, भाबडया कल्पना विचार आहेत. काही मंडळी इथे येऊन जे काही बोलतात ते मी नीट धडपणे ऐकून सुद्धा घेत नाही. नाही, नाही, मी त्यांच्या म्हणण्याला उत्तर पण देत नाही.''

साईबाबांनी या नंतर प्रसादा दाखल सर्वांना उदी स्वहस्ते दिली आणि आम्हाला वाडयात परत जाण्यास सांगितले. महाराजांनी फक्त धाकटया पटवर्धनला थांबवून घेऊन आपल्या पाठीमागे रहाण्यासाठी सांगितले. नेहमी प्रमाणे ''उद्या निघा हं'' म्हणून त्यांनी मला सांगितले. मी व श्री. बाबासाहेब सहस्त्र बुद्धे वाडयात बरोबरच परतलो. परांजपे आणि त्यांच्या बरोबरची मंडळी राधा-कृष्णा आईकडे गेली असावीत. बापूसाहेब जोगांच्या पत्नीला बरे वाटत नव्हते. साई महाराज जे जे काही बोलत असत त्यामुळे त्या बिचारीला त्यांच्या बोलण्याचा फायदाच होत होता. त्यांनी तिला कोणतेच औषध म्हणून दिले नाही. पण गेले काही दिवसापासून आजारी असलेल्या या बाईला बरे वाटत नव्हते व आज तर तिची तब्येत खूपच खालावल्यामुळे तिला शिरडीहून निघावेसे वाटत होते. बापूसाहेबही या प्रसंगी आता अगदी हवालदिल झाल्याने त्यांनीही पत्नीच्या म्हणण्याला होकार दिला होता. साई महाराजांनी तिच्या प्रकृतीची विचारपूस सारखी चालवली होती कधी निघणार म्हणून ते चौकशी करीत होतेच. सायंकाळी बापूसाहेबानी आपण उभयता निघत आहोत तेंव्हा परवानगी द्यावी म्हणून महाराजांचे जवळ जाऊन विचारणा करण्याचे ठरविले मात्र तो काय आश्चर्य! इतके दिवस आजारी असलेली बापूसाहेबांची पत्नी म्हणाली छे ! छे मला येथून आता निघावेसेच वाटत नाही. येथून निघण्याची आपली इच्छा नाही. हे ऐकून आम्हाला आश्चर्य वाटले.

रविवार दिनांक ११-१२-१९१०

मी सकाळी नित्याप्रमाणे लौकर उठलो. प्रार्थना आटोपली, स्नान कर्मे पण आटोपली. आज सकाळीच वाडयात मुंबईहून श्री. हरीभाऊ दिक्षित आले, त्यांचे बरोबर कै. आत्माराम पांडुरंग तर्खड यांचे चिरंजीव व अकोल्याच्या अण्णासाहेब महाजनींचे चुलते श्री. महाजनी हे पण होते. आम्ही सर्वजण साईबाबांच्या दर्शनास गेलो. बाबांचे आजचे संभाषण तिथे घडलेल्या दोन महत्वाच्या घटनानी खूपच महत्वाचे वाटले. मला तर त्यांच्या त्या बोलण्याचा अर्थच काही उमगला नाही म्हणा !

साई महाराज म्हणाले, ''आपण एका काळी इथे एका कोपऱ्यात बसत असू.

आपल्याला एकदा इच्छा झाली की आपल्या शरीराचा खालील अर्धा भाग पोपटाचा व्हावा व माझा तो अर्धा भाग पोपटाच्या शरीरास मिळावा ही अदला बदल व्हावी अशी माझी खूप खूप इच्छा होती व त्याप्रमाणे लौकरच झाले, घडून आले. यामुळे काय झाले तर वर्षभर आपण कोण आहेत हे कुणासच कळून आले नाही. यामुळे आपले एक लाख रुपयांचे नुकसान झाले. नंतर आपण येथे जवळच एका खांबावर ठाण मांडले. तिथे मी बसू लागलो. पण तिथे एक भला मोठा साप त्वेषाने मजवर चाल करून आला त्याने मजवर उडी घालण्याच्या प्रयत्नात तो वरून खाली आदळला."

यानंतर साईमहाराजांनी झटकन विषय बदलला व ते म्हणाले, मी तेथून एका ठिकाणी गेलो खरा, पण तेथल्या पाटलाने मला आपल्या शेतातली लावणी झाल्याशिवाय आणि खडीचा रस्ता पूर्ण केल्या शिवाय जाऊच देणार नाही म्हणून सांगितले. मी म्हणालो, मी तुझ्या त्या दोन्ही गोष्टी पूर्ण केलेल्या आहेत बरं!

एवढयात बाबांच्या दर्शनाला आणखीन काही मंडळी आली. त्यापैकी एकाकडे पाहून ते म्हणाले, माझ्याशिवाय तुझी काळजी घेणारा आता कुणीच नाही. तुझ्या नात्यात एका बाईने रोहिल्या बरोबर विवाह केला होता, आणि त्या रोहिल्याने तुझी अक्षरशः लुटमार केली." बाबा पुढे म्हणाले, ही दुनिया अगदी वाईट झाली आहे. एका काळी दुनियेत जसे लोक होते तसे आता मुळीच नाहीत. साराच काही बदल झाला आहे. जुन्या काळचे लोक धार्मिक, श्रद्धाळू वृत्तीचे व मोठे विश्वासू होते. आता तर लोकांवर मुळीच विश्वास ठेऊ नये असे वाटते." आणखीनही पुढे ते काही तरी बडबडले खरे पण त्यांच्या बोलण्याचा अर्थच मला काही उमगला नाही, ते काय बोलले ते मी ग्रहण सुद्धा करू शकलो नाही. आपल्या वडीलासंबंधी, आजोबा संबंधी आणि आपल्या उलट सुलट जीवनासंबंधी ते काही बडबडले असावेत असे वाटते.

इतक्यात दिक्षितांनी आपल्या बरोबर आणलेली काही फळे महाराजांचे समोर ठेवली. बाबांनी त्यातील काही खाल्ली व काही इतराना वाटली. एवढयात कोपरगाव तालुक्याचे तत्कालीन मामलेदार श्री. बाळासाहेब तिथे आले आणि म्हणाले, साईमहाराज एकाच प्रकारची तऱ्हेची फळे भक्तांना देतात, वाटतात हं!" माझा मुलगा बाबा आपल्या जवळच्याच पटवर्धन मित्राला म्हणाला, "साईमहाराज भक्ताकडे आपल्या बद्दल जेवढी भक्ती असेल त्या प्रमाणात त्याने आणलेली फळे स्वीकारतात किंवा अव्हेरतात." माझ्या मुलाने हे मला सांगितले व पटवर्धनची पण अशीच इच्छा असल्याचे सांगितले. हे सांगता सांगता काहीशी कुजबूज झाली खरी ती साईंच्या नजरेतून सुटली नाही. लगेच त्यावर साईनी मजकडे एका डोळ्याने पाहिले. त्यांच्या त्या चकाकणाऱ्या नेत्रातून किंचितशी रागाची छटा मला दिसून आली. मी काय म्हणालो हे महाराजांनी मला विचारले. मी उत्तरलो, मी या दोघा

मुलांच्या बोलण्याला काहीच उत्तर दिलेले नाही. ती दोघं आपापसातच बोलत होती. महाराजांनी नंतर माझ्या मुलाकडे व पटवर्धनाकडे दृष्टी क्षेप केला आणि आपली चर्या साफ बदलली.

दुपारी उठता उठता बाळासाहेब मिरीकर म्हणाले, आज सकाळपासून बाबा हरीभाऊ दिक्षितांचे बद्दलच सर्व काही बोलत होते.

दुपारी आम्ही जेव्हा जेवायला गेलो तेव्हा वाडयात मिरीकरांचे वडील आले. ते इनामदार होते. त्याशिवाय ते अहमदनगर जिल्हयाचे खास न्यायाधिश होते. ते जुन्या जमान्यातले एक प्रतिष्ठीत गृहस्थ म्हणून ओळखले जात. मला त्यांचे बोलणे फार आवडे. सायंकाळी आम्ही सर्वांनी साई महाराजांना बाहेर जाताना पाहिले. सर्वांनी त्यांचे दर्शन घेतले. रात्री आम्ही सर्वजण वाडयात गप्पा मारीत बसलो. श्री. नूलकरांचा मुलगा विश्वनाथ याने नित्याप्रमाणे रात्री भजन केले.

सोमवार दिनांक १२-१२-१९१०

आम्ही सकाळी उठलो. नित्यकर्मे आटोपली. प्रार्थनेनंतर मी साईमहाराजांना ते नित्याप्रमाणे बाहेर जाताना पाहिले. आम्ही सर्व नित्याप्रमाणे वाडयात गप्पा गोष्टी करीत बसलो. श्री दिक्षितांनी आज अगदी वेगळ्याच विषयावर गप्पा मारण्यास सुरवात केली होती. त्यांनी आज आपल्या प्रार्थनेला पण बराच वेळ लावला. श्री दिक्षितांचा स्वभाव एरवी अगदीच शांत, सौम्य होता. ते फारसे कुणावरही कधी रागावत पण नसत. पण त्यांच्या त्या सौम्य शांत स्वभावात चित्त शुद्धी झाल्यामुळेच की काय आणखीनच भर पडली आणि आज तर ते खूपच गोड दिसत होते. रावबहादूर राजाराम पंत दिक्षित पुलगाव वरून थोडयाच वेळापूर्वी वाडयात आले होते. जेव्हा त्यांनी नागपूर सोडले. तेव्हा आपण शिरडीला जाऊ असा विचारही त्यांच्या मनात नव्हता परंतु पुलगावला आल्यावर त्यांना काय वाटले कुणास ठाऊक एकदम त्यांच्या मनाने अगदी अखेरच्या क्षणी शिरडीस जाण्याचा निर्णय घेतला आणि ते शिरडीच्या प्रवासास निघून आले होते. त्यांना पाहून मला खूप आनंद झाला. त्यानंतर आम्ही सर्वजण श्री साईमहाराजांच्या भेटीस गेलो. मला जाण्यास किंचितसा उशिरच झाला म्हणाना त्यामुळे बाबांनी सांगितलेली रंजक गोष्ट मला ऐकायलाच मिळाली नाही. साईबाबा नेहमी बोध कथा सांगून त्यातून उपदेश करीत असत.

ती कथा होती एका माणसाची आणि त्याच्या जवळ असलेल्या एका छानदार घोडयाची. तो घोडा काय वाटेल ते काम करी पण तो जोडीने बांधला की तो काहीच करीत नसे. त्याला सगळीकडे हिंडवले - फिरवले. नाही नाही ते शिक्षण दिले परंतु काहीच उपयोग झाला नव्हता. शेवटी एका विद्वानाने सुचविले, या घोडयाला जिथे

खरेदीले तिथे त्याला परत नेऊन आणावे किंवा न्यावे. हे पण करण्यात आले आणि मग तो घोडा सरळ मार्गावर आला. ठीक झाला. मी या सारकथेचा काही भागच फक्त ऐकला.

ही कथा सांगून झाल्यावर बाबांनी आमच्या जाण्याची विचारपूस केली. तुम्ही जेव्हा परवानगी द्याल तेव्हाच आम्ही येथून निघू. तुमच्या परवानगी शिवाय काही नाही असे मी उत्तरलो. बाबा त्यावर म्हणाले, ''तर मग तुम्ही आजच भोजन झाल्यावर निघण्याचे करा.'' दुपारी भोजनाचे वेळी त्यांनी माधवराव देशपांडे यांचे बरोबर मला प्रसादा दाखल दही पाठवून दिले. मी भोजना बरोबर ते घेतले; आणि भोजनानंतर तडक महाराजांना भेटावयास गेलो. तिथे गेल्यावर त्यांनी जाण्याची मला पूर्ण संमती दिली. बाबांनी लगेच आपल्याला जाण्याची परवानगी दिली हे माझ्या मुलाला सांगूनही खरेच वाटेना. शेवटी मी त्याला बाबांनी खरोखरीच जाण्याची परवानगी नक्की दिली असे स्वच्छ शब्दात सांगितले. साई महाराजांनी आज सर्वांजवळ दक्षणा मागितली परंतु मजकडे किंवा माझ्या मुलाकडे त्यांनी याबद्दल चकार शब्दही काढला नाही. मज जवळ या खेपेस पुरेसे पैसे नव्हते हे त्यांना माहित झालेले असावे हेच खरे.

शेवटी आम्ही श्री. नूलकर, श्री. दिक्षित, श्री. बापूसाहेब जोग, बाबासाहेब सहस्त्रबुद्धे, माधवराव देशपांडे, बाळासाहेब भाटे, वासुदेवराव आणि इतर मंडळी यांना सांगून त्यांचा निरोप घेतला आणि पटवर्धन, प्रधान, काका महाजन, श्री. तखंड व श्री. भिडे यांचे बरोबर शिरडीहून निघालो. आम्हाला कोपरगाव येथे सायंकाळी सुमारे ६-३० ची आगगाडी मिळाली. कोपरगावहून आम्ही मनमाडला आलो. श्री. भिडे हे येवला येथे उतरणार होते. मी आणि माझा मुलगा मनमाडला पंजाब मेल पकडून आमच्या घरी जाऊ.

[ क्रमशः ]

## श्री साईलीला विषयी थोडेसे

''चातक पक्षास पावसाची प्रतिक्षा, भुकेलेल्यास अन्नाची प्रतिक्षा
तदवतच अम्हा साई भक्तांना श्री साईलीलेची प्रतिक्षा''

सूकाणू विरहीत तारू समुद्राच्या लाटांचे व झंझावाती वादळाचे तडाखे व मार खात इतस्त: फिरत असते त्यास स्थिरता अशी लाभतच नाही व स्थिरता लाभते ती सुकाणू मुळेच. तसेच आजच्या कलियुगांत आणि फॅशनरुपी लाटांच्या भोवऱ्यांत आमच्या मनाचे तारू गरगर, गरगर फिरतेय. आमच्या भारतीय संस्कृतीची लक्तरे, लक्तरे होताहेत परंतु मन:शांती मिळत नाही — हो शांती लाभेल परंतु ती श्री साईलीला मासिका द्वारेच हे माझे ठाम मत आहे.

— श्री. विजय सहामते, चिंचणी

# माझे दैवत साईबाबा

२९०

**श्री उत्तमराव गोपाळराव पाखरे**
घर नं. १७३५,
तेली आळी
रत्नागिरी ४१५६१२

आपला ह्या भारत देश फारफार पुरातन काळा पासून पवित्र हिंदुधर्माचे मूळ वसती स्थान आहे.

जे काही महान संत महात्मे, योगी, संन्याशी, अवतारी पुरुष अवतरले असतील ते हया पूज्य भारत भूमीचे पुत्ररत्न होत. श्री समर्थ रामदास स्वामी, यांनी श्री रामचंद्राचेच नामाचा प्रसार करून आपले मराठी राज्याचे श्री शिवबारायाला अनुग्रहीत करून तत्कालीन यवनांचे अत्याचारा पासून हिंदू धर्माचे संरक्षण केले.

श्री तुकोबा रायांनी अनेक अज्ञानी जनतेला ईश्वरी नामसंकीर्तनाचा लळा लावून अनेक भक्तांचा उद्धार केला. श्री स्वामी दत्तात्रयांनी हयाच आपल्या महाराष्ट्रात जन्मास येऊन अनेक पापी, दरिद्री, अडाणी लोकांना तसेच, अनेक रोगग्रस्त जनतेला उपकृत केले. साठ वर्षे निपुत्रिक अबलेला तिचे म्हातारपणी पुत्रवती केले. श्री गुरुचरीत्राचे वाचन केल्याने आपणास कळून येईल की, हया महात्म्यांनी तत्कालीन धर्मरक्षणाचे कार्यातच आपले आयुष्य कसाला लावून त्यांचे अवतार कार्य संपविले.

जेव्हा जेव्हा यवनांचा हैदोस कळसाला पोहोचला व त्यामुळे इतर धर्मीयांना त्या पासून त्रास सोसावा लागला. अशाच गंभीर परिस्थितीत, ना हिंदु, ना खिश्चन, ना यवन अशा स्वरुपात श्री शिरडी क्षेत्री अगदी तेज:पुंज, कोमल, श्री दत्तात्रेय अवतारी, वयाने अगदीच बालवेषधारी १६ वर्षे वयीन मूर्ती, अंगात फक्त कफनी, डोक्याला टोपी, अंगावर एक धोतर असा वेषधारी "ब्रम्ह स्वरुपी" अवतारी बालक, एका निंब वृक्षा खाली बसलेली अशी मूर्ती दृगोच्चर झाली.

निंब वृक्षापासून काही अंतरावरच श्री खंडोबारायाचे एक पुरातन मंदिर आहे तेथले पुजारी श्री म्हाळसापतींनी या तेज:पुंज मुलाला 'आवो साई' असे पुकारले व तेव्हापासून या मुलाला साईबाबा हे जे नाव पडले ते कायमचेच.

**।। घार फिरे आकाशी। परि तिचे लक्ष पिलापाशी ।।**

हयाच प्रवृत्तीचे श्री साईबाबा हे अंतर्यामी असून सर्वस्वी लक्ष आपले भक्तांचे कल्याण करण्यात गुंतलेले असे. हयाचा एक दृष्टांत हया वेळी दर्शवावा लागतो तो म्हणजे श्री दासगणु एक साधे पोलीस शिपाई होते त्यांना बाबांनी अनेक वेळा

बोधामृत पाजून त्या व्यवसायातून परावृत्त करण्याचा मार्ग दर्शविला; कारण बाबांना अंर्तयामी कळून चुकले होते की, हा गणू हा वेगळाच ईशभक्त आहे. म्हणून शेवटी एका समयी "स्वतः वेणूमाधव रुपात" त्यांना दर्शन देऊन स्वतःचे अंगुष्टा मधून गंगा, यमुना प्रकटवून त्यांना संतुष्ट केले. त्यामुळे त्यांना पश्चाताप होऊन श्री बाबांचे प्रेरणेनुसार संत चरित्राचे किर्तनद्वारे चरित्र वर्णन करण्यास प्रवृत्त केले. यावरून भक्तांना स्पष्ट आढळून येते की, बाबा खरोखरच मुसलमान नव्हते – आणि बाबांचे भक्त जरी सात समुद्राचे पलीकडे असले तरी त्यांना आपलेकडे अन्य **उपायांनी, दृष्टांतद्वारे वरील संतांचे उक्ती प्रमाणे त्यांचेवर ते** लक्ष ठेवीत असत: आणि गुरूत्वाकर्षणाप्रमाणे ओढून आणीत असत.

**श्री बाबांचा नित्यक्रम गावात माधुकरी मागून आपला योगक्षेम ते भागवीत असत. तसेच रात्रंदिन त्यांचे मशीदमायीत धुनी प्रज्वलीत ठेवीत असत. जणू दुष्टांचा या धूनी द्वारे होमच होत असे ; व ती उदी एवढी प्रभावी असे की, तिचे सेवनाने अनेकांची संकटे व रोग इत्यादी समूळ नाश पावत असत.**

सरकारचे दरबारी उच्च दर्जाचे चांदोरकर जामनेरला मामलेदार त्यावेळी लोकप्रिय होते. त्यांची दुहीता प्रसूती व्यथेने अत्यंत कासावीस पडली होती. चांदोरकर पती व पत्नीनी या प्रसंगी बाबांना हाक मारली.

**हाके सरसी उडी घालोनिया पान्हाफोडी ।**
**असे कृपावंत कोण माझे साई माऊली वाचून ।।**

हे संताचे वाक्य तंतोतंत येथे देत आहो. कारण त्यावेळी शिरडी मुक्कामी श्री बाबांना त्यांचे हाकेला 'ओ' द्यावा लागला. याचवेळी, एक भक्त बापूगीर स्वगांवी खानदेशाला जायला निघाला व श्री बाबांची आज्ञा नेहमीचे रिवाजाप्रमाणे घ्यावयास गेला. त्यावेळी बाबा त्याला म्हणाले जातोस तर जा पण जाता जाता वाटेत माझे थोडे काम करून मग पुढे स्वगावी जा. एक आरतीचा कागद आणी विभूतीची पूडी तू जामनेरला चांदोरकर साहेबाकडे पोहचवून पुढे जा.त्यावर तो गोसावी नम्रपणे म्हणाला मजजवळ भक्त दोनच रुपये आहेत; व ते अग्नीरथाचे माझे भाडेच होय. तर हे आपले काम मला कसे शक्य आहे. बाबा त्यावर म्हणाले फक्त तू हो म्हण "**अल्ला मालीक रास्ते में सब पुरा कर देगा.**"

खरोखरच हे संत महात्मे अवतारी पुरुष किती भक्तांचे अंतःकरण जाणणारे असतात; व त्याचे वाक्य ब्रम्ह लिखीत असते गोसाव्याने होकार दिला व रेल्वेचे भाडे देऊन जळगाव स्टेशनला उतरला, आणि चिंतेने व्यथित होत्साता, विचार मग्न, फ्लॅटफार्मवर विचार करीतच उभा असताना, एक दाढी मिशी असलेला टांगेवाला "बापूगीर बापूगीर" म्हणत तेथे फिरत होता त्याला गोसावी म्हणाला, मीच तो

बापूगीर. त्यावर तो टांगेवाला म्हणाला "जल्द चलो" साहबने आपके लिये टांगा भेजा है" गोसावी मनोमन खुष झाला व टांग्यात आनंदी वृत्तीने बसताच टांगा भरधाव सुटला; आणि अगदी थोडयाच वेळात जामनेरचे बाहेरील ओढयावर आला. तेथे त्या टांगेवाल्याने गोसाव्याला घोडयांना पाणी पाजून, आपण फराळ करून मग गावात जाऊ. बिचारा गोसावी विचारातच पडला कीं, हा मुसलमान आहे याचा फराळ कसा करावा. अशा अडचणीत गोसावी काहींच बोलला नाही. चपराशाने घोड्याना पाणी पाजून जवळच्या हिरवळीवर जरा चरावयास सोडून डबा उघडून गोसाव्याला फराळास बोलाविले व अत्यंत भाविक भावनेने म्हणाला "अहो गोसावी बुवा" कसला विचार करीत आहांत मी मुसलमान नव्हे व डबा पण माझा नाही साहेबांनी मुद्दाम तुमचे साठी तयार करून तो पाठविला आहे. झाले दोघांनी फराळ केला व लघवीला जातो असे म्हणून बाजूस गेला तो आश्चर्य असे की, घोडा, चपराशी एकदम गायब? पुढे बापूगीराने चांदोरकरांचे घर जवळच होते ते शोधून काढले. बाबांचा आरतीचा कागद, आणि उदी ही साहेबांना दिली तोच आतून बाई साहेबांनी आरोळी ठोकली व म्हणाल्या, "अहो उशीर कां करता, कसला विचार करीत आहात आणा ती उदी" व चमत्कार असा की बाळंतीणीचे मुखात उदी पडताच ती बाळंत झाली.

सारांश भक्तांनो फारच विचार पूर्वक अर्थ करा कीं, घोडा कोण, टांगेवाला कोण, डबा फराळाचा पाठविणार कोण ? सर्वच गूढ आहे पण हे अवतारी कृष्ण स्वरूपी श्री बाबांनाचं भक्तांचे संकट टाळण्यासाठी एवढे नाटक करावे लागले. असे हे श्री साई समर्थ जो पावेतो चंद्र सूर्य आहेत तो पावेतो अमर शिरडी क्षेत्रीच आजही जागृत असून भक्तांचे मनोरथ जाणून त्यांना उपकृत करतात. या बाबत मला जो श्री बाबांचा अनुभव नुकताच या जून १९८५ मध्ये आला तो भक्तांचे साठी देतो. १-६-१९८५ पासून माझी पेन्शन केस अकौंटन्ट जनरल मुंबई यांचे कचेरीत कचऱ्याचे पेटीत पडून होती. मी खूपदा तारा केल्या.रजीस्टर्स केले, वकीलांचा सल्ला घेतला. ऑफीसचे कारकून लोकांना मुंबईस माहितीस आणण्यास्तव खटपटी केल्या पण अकौन्टन्ट जनरलचे ऑफीसात कागदाचा पत्ताच लागेना, कोणी स्वत: मुंबईला जा, किंवा वकीला मार्फत हायकोर्टात केस टाका अनेकांच्या अनेक कल्पना मी ऐकून घेतल्या व स्वत:शीच ठाम विचार केला की, माझे साईबाबांना काय करावयाचे असेल ते घडवून आणतील. फक्त त्यांचे दृष्टांताचा मी भूकेला आहे.

झाले श्री साईबाबांनी एका सुशिक्षीत विद्वानाचे अंतर्यामी प्रकट होऊन त्याला मला मार्ग दर्शन करण्यास प्रवृत्त केले व त्याने माननीय वित्तमंत्री श्री. सुशील कुमार शिंदे साहेबांना अर्ज करावयास सांगितले. खरोखर बाबाला किती किती नाटकी प्रकार करावे लागले ते भक्तांचे सहजा सहजी लक्षात येईलच ? झाले

मत्रीमहाशयांनी हुकूम सोडला व अकौन्टन्ट जनरलचे कचेरीत एकदम गोंधळ उडाला आणि तात्पर्य असे की नुकत्याच गुरु पोर्णिमेचे दिवशी मला आदेश मिळाला की, ३०-६-८४ ते १-७-८५ पावतो आपले निवृत्ती वेतन मंजूर झाले व हिशेब लवकरच मिळेल.

सज्जनांनो विचार करा की, वरील उदाहरण आपणांस स्पष्ट दाखविते कीं, श्री साईबाबा आजचे मितीला श्री शिरडी क्षेत्री प्रत्यक्ष वास करीत आहेत मात्र –

**तेथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काम नाहीं ।।**

मानवाने अंतर्यामी, उठता, बसता, झोपेत असता, भोजनाचे वेळी मनोमन श्री बाबांचे नामस्मरण करत असावे व ते निस्सीम, निर्मोही व त्याचे पासून आपले काम व्हावे हया भावनेने स्मरण न करता सर्वा ठायी श्री बाबांचीच वसती आहे असे समजून अनन्य भावे श्री बाबांचे चरणी लीन व्हावे. श्री बाबा आपले मनोगत जाणण्यास समर्थच आहेत व ते आपली मनोकामना पूर्ण पणे जाणून आहेत! असे असताना श्री बाबा मला या कामी मदत करा अशी भावना ठेवूच नये. फक्त तद् नामसंकिर्तनी देह झिजवून आपले प्रपंचाचे कार्य करीत असावे.

**देह जावो अथवा राहो । साई चरणी दृढ भावो ।।**

श्री बाबांचे चरणीच लीन व्हावे अशी श्री साईबाबांचे सद्भक्ताना मी प्रार्थना करीत आहे.

श्री तुकोबारायांनी जनता जनार्दनाला प्रार्थना केली की,

**श्री विठ्ठल चरणी मी देवा, तुझाच तुक्या आहे ।**

श्री तुकोबा म्हणतात,

**वेडे वाकूडे गाईन । परी तुझाची म्हणवीन ।।**

अशी ही संताची वाणी या ठिकाणी लिहाविशी वाटली व ती सर्व भक्तांचे चरणी अर्पण करून एकवेळ श्री बाबांचे नामाचा जय जयकार करून ती सद्भक्तांचे सेवार्थ अर्पण करीत आहे.

छोटया साई भक्तांसाठी

# श्री गणपतीलाच मोठा मान का दिला जातो ?

292



धर्मनिष्ठ हिंदु कोणत्याहि कार्यारंभी गणेशपूजन करून 'कार्य सिद्धीस जावो' अशी त्याची प्रार्थना करतात. यावरूनच अमुक अमुक कार्याचा 'श्रीगणेशा' अशी म्हण प्रचारात आली.

कार्यारंभीं गणेशपूज कां केलें जातें, यासंबंधी एक मनोरंजक कथा उपलब्ध आहे : असे म्हणतात कीं, एकदा सर्व देवतांची सभा भरली होती. सभेपुढे मुद्दा असा होता कीं जो सर्वांत आधी पूजा कोणत्या देवाची करावी ? आणि मग असे ठरलें, कीं जो सर्वांत आधी पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करून येईल, त्याची पृथ्वीवर सर्वांत आधीं पूजा केली जावी. सर्वजण आपापल्या वाहनांवर आरूढ झाले. भगवान् विष्णु आपल्या वेगवान् गरुडावर आरूढ होऊन निघून गेले. श्रीशंकराचा नंदी वेगाने धावत निघाला. ब्रम्हदेवाच्या हंसाची गति तशीच विलक्षण होती. अशा तऱ्हेने सर्व देव आपापल्या वाहनांवरून पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास निघाले. गम्मत ही कीं, सर्वांनाच ही शर्यत जिकण्याची जबरदस्त आशा होती. बिचारा स्थूलोदर गणपति

# मशिदीत शयन

मशिदीत उर्फ द्वारकामाईत रात्री कोणासही प्रवेश नव्हता.

परि भगत म्हाळसापती। दादा लक्ष्मी ह्यांची भक्ति।
पाहूनि तयास रात्रीच्याही वक्ती। मनाई नव्हती बाबांची॥
(सा.स.च.अ.४२ — ९३)

तात्याबा व म्हाळसापती हे दोघे श्रीबाबांच्या समवेत नित्य मशिदीत शयन करीत असत. पूर्व, पश्चिम व उत्तर दिशांना डोई करून त्यांच्या पथाऱ्या टाकल्या जात पण झोपतेवेळी त्यांचे पाय एकमेकांच्या पायांना भिडत. अशा रितीने सर्वत्र निजानिज झाल्यानंतरही त्या तिघांच्या रात्रभर गोष्टी चालत असत. त्यापैकी एकास डुलकी येते आहे असे वाटल्यास दुसरे दोघेजण उठत व त्याला हलवून जागे करीत. असा झोपण्याचा क्रम एकदोन नव्हे तर चांगला चौदा वर्षे अव्याहत चालू होता.

तात्या महाभाग्यवान। म्हाळसापतींचेही पुण्य गहन।
बाबांचा समागमाचा मान। समसमान भोगीत॥
(सा.स.च.अ.८-११६)

# श्रीबाबांची पूजा

म्हाळसापती श्रीबाबांची दररोज पुजा करीत असत. पुजा करताना श्रीबाबा कपाळाला गंध लावू देत नसत.

कोणी कसाही येवो भक्त। कपाळी गंध लावू न देत।
मात्र म्हाळसापती गळ्यास फांसीत। इतर ते लावीत पायांते॥
(सा.स.च.अ.११ — ५४)

एकदा श्रीबाबांनी म्हाळसापतींस दृष्टांत दिला. कपाळाला गंध व हाताला उटणे लावले आहे, अशा स्वरूपात त्यांना श्रीबाबा त्या दृष्टांतात दिसले. दुसऱ्या दिवशी म्हाळसापतींनी पुजा केली तेव्हा श्रीबाबांनी कपाळाला गंध, भंडारा व हाताला उटणे लावून घेतले. तेव्हापासून ती प्रथा चालू झाली.

# काझीचा अडथळा

पुढे गंध लावण्याचे प्रकरण बरेच वाढले. मुसलमानांना ही गोष्ट पसंद नव्हती. त्यांनी संगमनेरच्या काझीसाहेबांना बोलावून आणले. "बाबा कपाळास गंध लावून घेऊ नका" असे ते म्हणत. पुजा करील त्याला आम्ही मार देऊ, अशा धमक्या ते देत असत. त्यामुळे म्हाळसापती श्रीबाबांची पुजा न करता दूर दूर राहू लागले. तेव्हा एकदा श्रीबाबा एकदम ओरडले, "म्हाळसापती, इधर आव, लगाव दे संदल! यहां लगाव, यहां लगाव, भंडार और चंदनको कौन नाम रखेगा." श्रीबाबांनी म्हाळसापतींकडून पुजा करवून घेतली. काझीसाहेबांचे श्रीबाबांपुढे काही चालले नाही. त्यांनी त्याच दिवशी मुकाट्याने पलायन केले. म्हाळसापतींची पुजा रोज अशाप्रमाणे अखेरपर्यंत चालू होती.




*श्री साईबाबा शिरडीत आले ते प्रथम येथेच.*

## म्हाळसापतींची निष्ठा

म्हाळसापतींसारखा निष्ठावन भक्त सहसा आढळत नाही. श्रीबाबांनी त्यांच्या अनेक प्रकारे कसोट्या घेतल्या, पण म्हाळसापती त्यांतून यशस्वीरित्या बाहेर पडले. श्रीबाबांच्या निर्याणाअगोदर बत्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. एकदा म्हाळसापतीस उद्देशून श्रीबाबा म्हणाले, ''आम्ही आजपासून तीन दिवस ब्रम्हांडी प्राण चढविणार आहोत. आमचा नीट सांभाळ करा.'' एकाएकी भोवळ यावी तशी श्रीबाबांची काया श्वासविरहीत व निष्प्राण भासू लागली. एकदोन दिवस लोटल्यावर इतरांनी श्रीबाबांच्या जीविताची आशाच सोडून दिली. पण म्हाळसापती मात्र अहोरात्र श्रीबाबांचे शिर आपल्या मांडीवर घेऊन बसले होते. मुल्ला, मौलवी वगैरे लोक पुढील तजवीजिला लागले. पण काही केल्या म्हाळसापती आपली मांडी सोडायला तयार होईनात. अखेर अगोदर सांगितल्याप्रमाणे तीन दिवस झाल्यावर श्रीबाबांचा श्वासोश्वास पूर्ववत् सुरू झाला व त्यांनी आपल्या शरिराला आळोखेपिळोखे दिले. अवेळी आलेले विघ्न टळलेले पाहून सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

पाहूनि मौलवीची दुराग्रहता। भगत आज्ञापालनी चुकता।
यत्किंचितही निश्चय ढळता। वेळ तो येता कठीण तैं॥

(सा.स.च.अ.४४ — ८९)

केवढी म्हाळसापतींची निष्ठा व आज्ञाधारकपणा!

## परम वैराग्य

श्रीबाबांच्या निकटवर्तियांपैकी अत्यंत निःस्वार्थी व वैराग्यवृत्तीने जीवन कंठणाऱ्यांमध्ये म्हाळसापतींचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा.

सांपत्तिक स्थिती निकृष्ट। परी वैराग्य अति उत्कृष्ट।
वेठी गरिबीचेही कष्ट। अल्पसंतुष्ट सर्वदा॥
(सा.स.च.अ.३६ — ६४)

म्हाळसापतींचे व्यवहाराकडे दुर्लक्ष असल्याकारणाने त्यांचा संसार नेहमी ओढगस्तीचा असे. श्रीबाबांवर संपूर्णपणे भार टाकून ते परमार्थांत मग्न असत. खुद्द श्रीबाबा रोज शेकडो रुपये वाटीत असत. पण त्यांतली एक कपर्दिकही म्हाळसापतींना देत नसत.

तोही मोठा बाणेदार। जरी साई ऐसा उदार।
कधी न तेणे पसरिला कर। याचना तत्पर होऊनी॥
(सा.स.च.अ.३६ — ६३)

ह्या संबंधात घडलेली एक गोष्ट बोधप्रद आहे. एकदा हंसराज नावाच्या व्यापाऱ्याने म्हाळसापतींना काही पैसे चरितार्थाकरिता मदत म्हणून देऊ केले. म्हाळसापतींनी ते पैसे श्रीबाबांची आज्ञा झाल्याशिवाय घेण्याचे नाकारले व श्रीबाबांनीही आपल्या लाडक्या भक्ताला ते घेऊ दिले नाहीत.

भक्त नव्हता हा पैशाचा। मोठा भुकेला परमार्थाचा।
पदी विनटला कायावाचा। प्रेमळ मनाचा निःस्वार्थी॥
(सा.स.च.अ.३६ — ७०)

## श्रीबाबांची कृपादृष्टी

म्हाळसापती ह्यांची पत्नी एकदा माहेरी होती. त्यांच्या गळ्यास एक गोळा आला होता. एके दिवशी श्रीबाबा म्हाळसापतीला म्हणाले, "अरे भगत, तुझ्या बायकोच्या गळ्यास गोळा आला आहे. तो गोळा मीच बरा करीन."

पुढे म्हाळसापतींना सासुरवाडीहून पत्र आले. त्यात श्रीबाबांनी सांगितलेला मजकूर होता. दुःख बरे झाले असाही मजकूर होता. श्रीबाबांची आपणांवर पूर्ण कृपा आहे ह्याची म्हाळसापतींना परत प्रचीति आली.

## शिरडीवरचे विघ्न टळले

एके दिवशी श्रीबाबा एकाएकी मशीद सोडून चालत चालत गावाबाहेर निघाले. म्हाळसापती त्यावेळी भिक्षेच्या फेरीला गेले होते. भिक्षेवरून परत आल्यानंतर त्यांच्या आईने त्यांना ही बातमी सांगितली. म्हाळसापतींनी ताबडतोब भिक्षेची झोळी खाली ठेवली व श्रीबाबांच्या पाठोपाठ ते निघाले. "बाबा परत आले तरच मी येईन, नाही तर नाही" असा निरोप घरी ठेऊन त्यांनी पाऊल बाहेर टाकले. श्रीबाबांच्या पावलांचा मागोवा घेत घेत म्हाळसापती गावापासून एक कोसावर असलेल्या रुईगाव येथील श्रीहनुमान मंदिरात पोहोचले. तेथे सरतेशेवटी त्यांचे आराध्य दैवत पाहिले. त्यावेळी श्रीबाबा खाली बसून पायातील काटा काढत होते. म्हाळसापतींनी त्यांची मनधरणी केल्यावर श्रीबाबा परत यावयास निघाले. "अरे भगत, तू आलास त्यामुळे मला येणे भाग आहे" असे श्रीबाबा म्हणाले.

# म्हाळसापतींचे निर्वाण

श्रीबाबांचे एकनिष्ठ सेवक म्हाळसापती भाद्रपद शके १८४४ मंगळवार दि. १२ सप्टेंबर १९२२ रोजी श्रीसाईचरणी विलीन झाले. आदल्या दिवशी सोमवारी त्यांच्या वडिलांची पुण्यतिथी होती. त्यानिमित्त घरात नित्याचे कार्य सुरू होते. अचानक ते मार्तंडला — आपल्या मुलाला म्हणाले, "मला आज जायचंय. सर्व लवकर आटोपले पाहिजे." लगेच मंत्रविधी करीत असलेल्या भटजींना त्यांनी थोडक्यात आटोपण्याविषयी सूचना दिल्या. नंतर जमलेल्या मंडळींना वाढण्यास सांगितले. त्यांच्या इच्छेप्रमाणे पंक्ती जेवावयास बसल्या. ते स्वतः मात्र जेवायला बसले नाहीत. वाढलेले ताट उचलून त्यांनी फक्त नाकाला लावले व वास घेऊन खाली ठेवले. नंतर एक कोरा कपडा घेऊन तो फाडला व थोडा स्वतःच्या कंबरेभोवती गुंडाळून उरलेला लंगोटीसारखा नेसला. "मी दिक्षा घेतली" असे ते म्हणाले.

दरम्यान काकासाहेब दिक्षीत, अण्णासाहेब दाभोळकर, बाबासाहेब पुरंदरे ह्यांना तारेने वरील बातमी त्वरित कळविण्यात आली. तशा प्रकारच्या त्यांनी पूर्वीच सूचना दिल्या होत्या. लोकांनी श्रीसाईरामांचे जोरात भजन सुरू केले. बोलता बोलता म्हाळसापतींची समाधी लागली. जमलेल्या लोकांनी आरडाओरड केली. "अहो, एवढ्यात कुठे जाता? काकासाहेब दिक्षीत खांडव्याला गेले आहेत, ते परत येऊ शकत नाहीत." काही मिनिटांतच म्हाळसापती परत भानावर आले व म्हणाले, "ठीक आहे! एक दिवस मुक्काम वाढवू, उद्या जाऊ."

रात्री सर्वत्र निजानीज झाली. मंगळवारी पहाटे चार वाजता म्हाळसापती झोपेतून जागे झाले व त्यांनी किती वाजले त्याची चौकशी केली. त्यांना त्यावेळी भूक लागली होती व काहीतरी खावेसे वाटत होते. त्यांनी त्यांची धाकटी मुलगी विठा हिला उठविण्यास सांगितले. पण ती नेमकी त्याच दिवशी मासिक पाळीमुळे काही करू शकत नव्हती. मार्तंडांनी "आईला सांगू का?" असे विचारले असता म्हाळसापतींनी आदल्या दिवशी घेतलेल्या दीक्षेची आठवण करून दिली व म्हटले, "आता मी तिच्याकडून काही करून घेऊ शकत नाही. ठीक आहे, देवाची इच्छा आहे की मी खाऊ नये."

सकाळी म्हाळसापती "मल्हारी महात्म्या"चे पारायण बाळा गुरवाकडून करून घेतले. २१ अध्याय वाचल्यानंतर उरलेला बावीसावा अध्याय दुसऱ्या दिवशी बुधवारी वाचून त्याची समाप्ती करण्याचे ठरले. मार्तंडांनी शंका उपस्थित केली की "तुम्ही आज गेल्यावर समाप्ती कशी करावयाची?" त्यावर म्हाळसापती उत्तरले, "ते तुम्हाला नाही कळावयाचे."

दुपारी चार वाजण्याच्या सुमारापासून परत भजनास सुरुवात झाली. भजनाचा व नामस्मरणाचा एकच गजर चाललेला असताना म्हाळसापतींच्या आत्म्याची ज्योत हळुहळू अनंतात विलीन झाली.

## समाधी

म्हाळसापतींची समाधी शिरडी येथे त्यांच्या चिरंजिवांच्या मार्तंडांच्या राहत्या घरात आहे. मार्तंडांचे वय आज ९६ वर्षांचे आहे. त्यांच्या घरी श्रीबाबांची कफनी, जोडे,

सटका, रुपये व उदी आहे. म्हाळसापतींच्या समाधीचे व श्रीबाबांच्या वरील वस्तूंचे दर्शन घेण्यासाठी देशाच्या दुरदूरच्या भागांतून भक्तमंडळी नित्य येत असतात. मार्तंडांना तीन मुलगे असून एक मोटर मेकॅनिक व दुसरे शिरडी येथे माध्यमिक शाळेत शिक्षक आहेत, तिसरा मुलगा कॉलेज शिक्षण घेत आहे. तीन मुलींपैकी दोन हयात आहेत. म्हाळसापतींच्या निर्याणानंतर मार्तंडांनी पुजाअर्चा व खंडेरायाची सेवा पुढे चालू ठेवली. श्रीसाईबाबांप्रमाणेच, मार्तंड ठाण्याचे सत्पुरुष प.पु. श्रीगजानन महाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर ह्यांनाही गुरुस्थानी मानतात.

## साई तुला नजर लागते

माझ्या साईची दृष्ट काढते
भक्तगण सांगतात, रे धावा रे धावा
साईला कुणाची नजर लागली ॥
रामनवमीचा हा दिन आला भाग्याचा
साई नामे अवघी दुमदुमली शिरडी
पाहुनी हा सोहळा, हास्य ते सुंदर वदनी
पहा साईला लागेल नजर कुणाची ॥माझ्या ॥
शेला हा भरजरी साईंचा
अतिसुंदर कुणी करा हो सारखा
दिसते हे त्यात रूप मनोहर
लागेल नजर कुणाची ॥माझ्या ॥
पाहुनी तुझे तेजोमय मुखकमल
उधळती गुलाल, पुष्प सुगंधी
काय हे दिसते रूप सुंदर
वाटते कुणाची लागेल नजर ॥माझ्या ॥
सुवर्ण मुकुट शोभतो गुरुराया
कंठी पाचू हिऱ्यांच्या माला
सुंदरता काय तुझी ही प्रभुराया
वाटते नजर लागेल कुणाची ॥माझ्या ॥

**— सौ. चंद्रप्रभा स्वामी**
१०, प्रकाश कॉलनी, प्रिया निकेतन,
न्यू इंडिया इंडस्ट्रीयल रोड,
बडोदा - ३९० ००५.

## ग्रंथ परिचय

# भेटी लागी जीवा

श्री मोरेश्वर पटवर्धन लिखित 'भेटी लागी जीवा' ही भक्त पुंडलिकाच्या जीवनावरील पहिलीच मराठी कादंबरी असून, तिची द्वितीयावृत्ती एप्रिल १९८६ मध्ये प्रसिद्ध झाली आहे. प्रथम दुर्वर्तनी, नास्तिक असलेला पुंडलिक; कुक्कुट ऋषींच्या आश्रमात गेल्यावर, परमेश्वराचे प्रत्यंतर घडल्यावर त्याच्यात परिवर्तन घडते. तो सात्विक, श्रद्धाळू, दयाळू व कनवाळू होतो. हा जरी कादंबरीचा आशय असला तरी पात्रांच्या संवादातून समाजाला हितोपदेश करणारे सूत्र लेखकाने सबंध पुस्तकभर खेळविले आहे.

परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होईपर्यंत परमेश्वर आहे, हे कशावरून अशा प्रश्नात गुंतलेल्या मानवी वृत्तीला लेखकाने हळूच चिमटा घेतला आहे. कादंबरीचा अखेर, पुंडलिकाने अनुभवलेले अभंग, श्री ज्ञानेश्वर महाराजांची आरती, श्री तुकाराम महाराजांची आरती, श्री पांडुरंगाची आरती व पसायदान यांनी झाला असल्याने, या पुस्तकाला वैविध्यपूर्ण लालित्याची जोड मिळाली आहे. चित्तवेधक प्रसंग, पात्रांचे स्वभाव चित्रण, व निसर्गाचे आल्हाददायी दर्शन घडविण्यात लेखकाला कमालीचे यश प्राप्त झाले आहे.

# 'साई'

स्व. डॉ. सौ. चारुशीला गुप्ते लिखित व साहित्य प्रसार केंद्र, मुंबई प्रकाशित ९६ पृष्ठे असलेली 'साई' ही कादंबरी साईबाबांच्या अलौकिक जीवनाचे विलोभनीय दर्शन घडविते. या कादंबरीत १ ते ११ प्रकरणे असून संपूर्ण साईसत्चरित्राचा सारांश सोप्या, सरळ व सुबोध भाषेत सांगितला आहे.

पुस्तकाच्या शेवटच्या आठ ते दहा पृष्ठांत श्री. सदानंद चेंदवणकर (कार्यकारी संपादक, श्री साईलीला) यांनी साईबाबांच्या भूपाळी, शेजआरती, काकड आरती व उपदेशपर बोल असे भक्तिपूर्ण लेखन करून कादंबरीचा शेवट गोड केला आहे.

कादंबरीचा अखेर करताना लेखकाने वृक्ष जेव्हा फुलाफळांनी बहरतो तेव्हा नमतो अशी उपमा देऊन; संपत्ती आली तरी देखील मानवाने गर्व करता कामा नये; सदा नम्र असावे असा महान संदेश नमुद केला आहे.

प्रस्तुत कादंबरीच्या लेखिका स्व. डॉ. सौ. चारुशीला गुप्ते ह्यांना फेब्रुवारी १९८६ मध्ये देवाज्ञा झाली. तरी ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो! ही साईचरणी प्रार्थना.

— कु. सुहास सावंत
दादर,
मुंबई - ४०० ०१४.


# हे बंधु बंधू हो

## श्री साईबाबा आणि श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज

— श्री. दिपक नारायण धुरी
जी/१-४, टाटा हाऊसिंग सेन्टर,
लल्लुभाई पार्क रोड,
अंधेरी (प.), मुंबई - ५८.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

श्री साईबाबा, श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज, श्री अक्कलकोट स्वामी, श्री गजानन महाराज असे हे गुरुदत्तात्रयाचे अवतार जगाच्या कल्याणार्थ पृथ्वीतलावर



अवतरले. आजही त्यांची प्रचिती, त्यांचे अनुभव भक्तांना येत आहेत. जगाचे कल्याण, मोह, माया, क्रोध, लोभ या प्रापंचिक जाळ्यातून लोकांची मुक्तता करावी, त्यांना स्वधर्मी लावावे यासाठी अशा अवतारी पुरुषांनी या कलीयुगात जन्म घेतला.

शिरडीचे श्री साईबाबा व श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज हे अवतारी पुरुष एकमेकांचे बंधु होत. याचा उल्लेख आपणास 'श्री साई चरित्रात' आढळतोच.

मानव समाज सुखी करण्यासाठी, त्यांमध्ये परस्पर प्रेम निर्माण होण्यासाठी मानवामानवां-मधील जातीभेद नष्ट करण्यासाठी, परस्पर सहकार्य निर्माण करण्याकरिता श्री साईबाबा ऐन तारुण्यात शिर्डीमध्ये अवतरले. त्यांचे चरित्र आपणा सर्वांस माहीत आहे. तसेच श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील माणगाव या एका छोट्याशा गावी इ.स. १८५४ ला एका ब्राह्मण कुटुंबात झाला. श्री महाराजांचे वडील गणेशपंत टेंबे नित्य देवपूजेतच रमून जात. श्री महाराजांचे नाव त्यांचे आजोबा हरीभट्ट टेंबे यांनी वासुदेव असे ठेवले. श्री महाराजांच्या आईचे नाव रमाबाई असे होते.

श्री महाराजांच्या घरातील आचार विचार अत्यंत पवित्र असे होते. बालपणातच श्री महाराज हे आचार अत्यंत सुचीर्भूतपणाने पाळत असत. त्यामुळे बालपणातच त्यांचे रूप अगदी तेजस्वी दिसू लागले. श्री महाराज सोवळे अगदी कटाक्षाने पाळत असत.

श्री महाराजांनी मौजीबंधनानंतर तात्याभट्ट उकीडवे यांच्याकडून सर्व विद्या शिकून घेतली. एवढेच काय ते त्यांचे अध्ययन! परंतु त्यांनी जे ग्रंथलेखन केले आहे ते खरोखरच आश्चर्य करण्यासारखे आहे.

श्री महाराजांच्या एकविसाव्या वर्षी त्यांच्या इच्छेविरुद्ध विवाह झाला. घरातील गरिबी, जबाबदारी यामुळे महाराजांचे मन अशांत झाले होते. अशा मनःस्थितीवरील उपाय म्हणून श्री महाराज श्री नरसोबावाडी या दत्तक्षेत्री आले. तेथे श्री गोविंदस्वामी सारख्या सत्पुरुषाचा सहवास, श्री गुरुचरित्राची पारायणे यामुळे श्री महाराजांच्या जीवनात बदल घडून आले. चांगले पूर्वसंस्कार, घरातील अत्यंत पवित्र पूर्वआचार, तात्याभट्ट उकीडवे यांच्याकडून घेतलेले अध्ययन व श्री दत्तकृपेमुळे श्री महाराज प्रापंचिक असूनही हळूहळू श्रेष्ठ संत झाले.

श्री महाराजांनी आपल्या माणगावी दत्तमंदिराची स्थापना केली. साक्षात श्री गुरुदत्तात्रयांनी श्री महाराजांच्या माणगाव या गावी येऊन सात वर्षे वास्तव्य केले. श्री महाराजांनी आपले सारे जीवन दुःखीतांच्या सेवेमध्ये अर्पण केले. आपल्या भक्तांना दुःखातून बाहेर काढणे, त्यांना सुखाची वाट दाखवणे, स्वधर्मी लावणे हाच श्री महाराजांचा जीवनमार्ग होता.

साक्षात् श्री गुरुदत्तात्रयाचे अवतार श्री गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज सन १९१३ साली गुजरातमधील नर्मदा नदीच्या तीरावरील श्री गरुडेश्वर या स्थानी विलीन झाले. आजही त्यांचे अनुभव, त्यांचे चमत्कार त्यांच्या भक्तगणांना येत आहेत. तसेच श्री साईबाबांनी अनेक भक्तांना दुःखातून मुक्त केले आहे. अनेकांना रोगमुक्त केले आहे. असे हे गुरुबंधू श्री साईबाबा व श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज जगाच्या कल्याणासाठी या जगात अवतरले.

मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचा उल्लेख 'श्री साई चरित्रात' अध्याय ५१ मध्ये आढळतो. ही कथा मी थोडक्यात येथे देत आहे.

एकदा श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांची स्वारी गोदावरी नदीच्या तीरावरील प्रसिद्ध राजमहेंद्री शहरात आलेली असते. त्यांची किर्ती ऐकून नांदेडचे प्रसिद्ध वकील पुंडलिकराव आपल्या भक्तमंडळींबरोबर राजमहेंद्री शहरात श्री महाराजांच्या दर्शनास आले. ही सर्व नांदेडकर मंडळी पहाटे स्नानार्थ गंगेप्रत निघाली असता, तेथेच श्री महाराजांना पाहून सर्वांनी साष्टांग नमस्कर घातला. सहज कुशल प्रश्न चालत असताना शिर्डीची वार्ता निघाली. कर्णी पडतां साईनाम, श्री महाराजांनी स्वहस्ते नमस्कार केला व म्हणाले, ते आमुचे बंधू आम्हास निस्सीम प्रेम त्यांचे. तेथील एक श्रीफळ घेऊन पुंडलिकरावांजवळ देऊन श्री महाराज म्हणाले, वंदुनी हे बंधुपदकमळ अर्पा हे, शिर्डीस जाल तेव्हा सांगा आमचा नमस्कार, म्हणा असू दे कृपा या दीनावर, पडू न द्यावा याचा विसर, प्रेम निरंतर वाढू दे, पुन्हा केव्हा तुम्ही शिर्डीला जात असाल तेव्हा हे श्रीफळ न विसरता आमच्या बंधुंना अर्पण करावे. ऐकोनी श्री महाराजांचे वचन जशी आज्ञा म्हणून पुंडलिकरावांनी ते श्रीफळ घेऊन श्री महाराजांचा निरोप घेतला.

पुढे पुंडलिकरावांना शिर्डीस श्री साईंच्या दर्शनाचा योग आला. बरोबर चार मित्रांना घेऊन पुंडलिकराव शिर्डीस निघाले. पण वाटेतच चिवड्याचा फराळ करताना चिवडा-तिखट लागल्याने एका मित्राने सुचविले की, चिवड्यात नारळ फोडून मिसळा म्हणजे चिवडा तिखट लागणार नाही. नारळ फोडून तो चिवड्यात मिसळून सर्वांनी खाल्ला पण तो नारळ कोणाचा आहे हे एकाच्याही लक्षात आले नाही. सगळ्यांना त्याचा विसर पडला. पुढे गेल्यावर पुंडलिकरावांच्या मनात नारळाची आठवण झाली. शिर्डी जवळ आली पाहून श्री वासुदेवानंदांचेच श्रीफळ चुकून चिवड्यात मिसळले याच्या आठवणीने पुंडलिकरावांना तळमळ लागली. आता श्री साईबाबांना काय देऊ? कसं समजवू श्री साईबाबांना अर्पण करण्याचे श्रीफळ मी चिवड्यात मिसळले. हा संतांचा अपमान झाला, असे त्यांना वाटू लागले. बाबा नारळ मागतील तेव्हा त्यांना काय देऊ? त्यांना भिती वाटू लागली. ही बातमी मित्रांना समजली. श्री साईबाबा सर्वसाक्षी त्यांना खोटं कसं सांगणार? श्री महाराजांनी पुंडलिकरावांना जेव्हा नारळ दिला, तेव्हा हा बिनतारी संदेश श्री महाराजांनी श्री साईबाबांना पाठवलाच असणार.

पुंडलिकरावांनी श्री साईबाबांचे दर्शन घेतले तेव्हा श्री साईबाबा आपण होऊनच म्हणाले, 'माझ्या बंधुजवळून आणलेली माझी वस्तु आण.'' अत्यंत खिन्न वदनाने पुंडलिकरावांनी सांगितले की, ''चुकून माझ्या हातून श्री महाराजांनी दिलेले श्रीफळ फोडले गेले. वाटेत चिवड्याचा फराळ करताना चिवडा तिखट लागल्याने ते श्रीफळ आम्ही फोडून चिवड्यात मिसळले व त्याचे पाणी प्यायलो. दुसरा नारळ मी आणतो तो आपण स्वीकारा. माझ्या हातातून विश्वासघात घडला आहे. क्षमा करून मला पदरात घ्या.'' हे ऐकताच साईबाबा हसून म्हणाले, 'कशाला नारळ हातात घेतला? माझी वस्तू मला द्याल, असे जाणून माझ्या बंधुंनी तुमच्यावर विश्वास ठेवला आणि त्याचा हा परिणाम!

असच का तुमचं काम. दुसरे कितीही नारळ दिले तरी त्या फळाची योग्यता कशी धरून येईल? घडावयाचे ते घडले. श्री महाराजांनी तुला नारळ दिला तोच केवळ माझा संकल्प. माझ्याच संकल्पे फुटले ते फळ. तुला माझी भेट घडावी असे माझ्या मनात आले. तेव्हाच हा नारळ तुझ्या हातात पडला ही गोष्ट त्रिसत्य आहे. तुम्ही सर्व माझीच मुले आहात. फळ ते तुमच्या मुखी लागले तेच तुम्ही मज अर्पण केले समजा. निश्चित ते मज पावले' असे श्री साईबाबा वदले. अशी समजूत झाल्यावर पुंडलिकराव मनात आनंदी झाले. त्यांच्या मनातील उद्वीग्नता हळूहळू वितळत गेली. अशी ही कथा या ग्रंथात दिली आहे.

थोडक्यात काय तर श्री साईबाबा व श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज हे ऐकमेकांचे बंधू आहेत. साक्षात् गुरु दत्तात्रयाचे अवतार आहेत. संत देहाने जरी भिन्न दिसले तरी ते एकरूपच असतात ह्यावरून हेच सिद्ध होते.

श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांचे पादुकास्थान म्हणजेच 'ओम सद्‌गुरु प्रतिष्ठान' नि.अ. उर्फ राजाभाऊ करंदीकर यांनी मुंबईमधील बोरीवली पूर्व येथे स्थापन केले आहे. ते स्वतः श्री महाराजांना विचारून भक्तांचे प्रश्न सोडवत असतात. आजही येथे दर गुरुवारी व शनिवारी संध्याकाळी सात वाजून पंचवीस मिनिटाच्या आरतीला पुष्कळ भक्तगण जमतात. हजारोंच्या संख्येत आज येथे भक्तगण आहे आणि ही संख्या दररोज वाढत आहे. आजही येथील भक्तगणांना श्री महाराजांचे चमत्कार, त्यांची प्रचिती अनुभवास येत आहे.

अशा साक्षात् श्री गुरुदत्तात्रेयाच्या अवतारी संताच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम.

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

## श्रद्धा

दीड तपाचा कालावधी गेला, आले सतत तुझ्या सान्निध्यात देवा
कधी पुजले नाही सुगंधी फुलाने तुजला
आवेशाने कधीच केली नाही आरती सांजला
फक्त मुखी होते साईनाम, अंतकरणी होती श्रद्धा
परी ठाऊक नव्हती सबुरी, म्हणूनच रागे भरले तुला
श्रद्धा सबुरी दोन्ही दिलीस तू देवा, परी ऐहीक सुखाचा ध्यास का हा
नको अंत पाहू सख्या, राग, लोभ, मत्सर यांचा विसर द्यावा
तुझ्याच संगतीत, तुझ्याच पायी साई मोक्ष हा मिळावा

— **सौ. रेखा भा. माहीमकर**
अमरज्योती को. हौ. सोसायटी,
चार बंगला, जे.पी. रोड, अंधेरी (प.).

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

— साईनंद

सोमवार दिनांक १-१-१९१२

मी आज सकाळी बऱ्याच लवकर उठलो. आणि चावडीवर काकड आरतीसाठी गेलो. प्रथम मी साई महाराजांचे मुखकमल पाहिले. त्यानंतर वाड्यावर परतल्यावर मी उपासनींच्या बंधूला पाहिले. ते धुळीयाहून आले होते. त्यापूर्वी मी त्यांना पुणे व अमरावती येथे पाहिले होते. ते साई महाराजांना पहावयास गेले. आणि लोक जे पटणारी पूर्वायुष्याची कंठलंगोटी आणतात त्यांच्याविषयी त्यांना सांगण्यात आले. त्यांनी पूर्वजन्माविषयीची गोष्ट सांगितली की ज्यात ते बापूसाहेब जोग, दादा केळकर, माधवराव देशपांडे, मी स्वतः आणि दीक्षित एका अरूंद आळीत एकत्र राहत होतो. तेथे त्यांची मर्शद होती. त्यांनी आता आम्हाला पुन्हा एकत्र आणले आहे. मी त्यांना बाहेर जाताना पाहिले आणि नंतर रामायण वाचण्यास बसलो. मी त्यांना पुन्हा दुपारच्या आरतीच्या वेळी पाहिले. त्यांनी माझ्यावर बरीच दया दाखविली. आजचा नैवद्य दीक्षितांनी दिला आणि त्यांच्यासोबत आम्ही सगळ्यांनी जेवण घेतले. वैद्य, नानासाहेब चांदोरकर, डहाणूचे श्री. देव मामलेदार आणि इतरांबरोबर मी बसलो. नंतर मी पुन्हा वाचन करण्यास बसलो आणि साई महाराजांना पाहण्यासाठी मी पुन्हा मशिदीकडे गेलो. त्यांनी प्रथम मला इतरांबरोबर असताना नाकारले. परंतु नंतर आता तुम्ही माघारी परत फिरण्याच्या मनःस्थितीत असल्यामुळे तुम्ही परत या असे त्यांनी मला सांगितले. संध्याकाळी आम्ही त्यांना चावडीसमोर पाहिले. रात्री भीष्मांचे भजन व दीक्षितांचे रामायण झाले. बाळाशिंपी भजनाला आला होता.

**मंगळवार दिनांक २-१-१९१२**

मी आज सकाळी बऱ्याच लवकर उठलो. उपासनींचे बंधू जे काल आले होते ते सूर्यास्तापूर्वी निघून गेले. माझी प्रार्थना संपल्यानंतर काका महाजनी, अत्रे नंतर निघून गेले. आणखी इतर त्यानंतर निघून गेले. सी.व्ही. वैद्य इतर तीन सज्जनांसमवेत दुपारच्या आरतीनंतर निघून गेले. नानासाहेब चांदोरकरांनी धर्नुमास आयोजला होता. आणि सर्वांना आमंत्रित केले होते. जेवण झाल्यावर सी.व्ही. वैद्य निघून गेले. त्यानंतर लगेच मानकर, कोपरगावचे मामलेदार, देव व डहाणूचे मामलेदारही निघून गेले. सूर्यास्त झाल्यानंतर कुटुंबासमवेत नानासाहेब चांदोरकर निघून गेले. त्यामुळे काही दिवसात चैतन्यमय झालेला वाडा सुना-सुना झाला आणि आम्ही चांगल्या सहवासाला मुकलो. फेरफटका मारण्यास साई महाराज जेव्हा बाहेर आले तेव्हा मी त्यांना पाहिले आणि पुन्हा त्यांना मी शेज आरतीला पाहिले. माझा मुलगा बाबा आणि गोपाळराव डोरले मला अमरावतीला घेऊन जाण्यासाठी आज सकाळी आले. मी त्यांना म्हणालो, माझे निघणे सर्वस्वी साई महाराजांच्या परवानगीवर अवलंबून आहे. त्यांनी साई महाराजांना पाहिले आणि म्हणाले, परवानगीविषयी काही कठीण नाही. भीष्मांची तब्बेत आज ठीक नाही. त्यामुळे आज भजन झाले नाही.

राम मारुतींना आज जावेसे वाटत होते. परंतु साईबाबांनी त्यांना नकार दिला. रात्री रामायण आणि भागवताचे वाचन झाले.

**बुधवार दि. ३-१-१९१२**

मी आज सकाळी बऱ्याच लवकर उठलो. आणि काकड आरतीला उपस्थित राहून माझी प्रार्थना संपविली. अमरावतीला परतण्याविषयी माझा मुलगा बाबा आणि गोपाळराव डोरले यांनी साईबाबांकडे जाऊन परवानगी मिळविण्यासाठी विचारणा केली. आपण सर्व परतू शकता, असे साई महाराजांनी उत्तर दिले. त्यामुळे माझा मुलगा आणि गोपाळराव डोरले अगदी आनंदात परतले. त्यांनी मला तसे सांगितल्यामुळे मी माधवराव देशपांडे यांच्याबरोबर साईमहाराजांकडे परवानगीची निश्चितता पडताळून पाहण्यासाठी गेलो. परंतु आम्ही परतत असताना, त्यांनी आम्हाला खिंडीजवळ गाठले आणि आम्हाला उद्या निघण्यास सांगितले. मी त्यांना ते बाहेर जात असताना आणि पुन्हा मशिदीत परत येत असताना पाहिले. माझ्या निघण्यासंबंधीचा विषय माधवरावांनी पुन्हा सुरू केला आणि साई महाराज उत्तरले की, माझे येथे व अमरावतीला घर आहे आणि मला जेथे आवडेल तेथे मी राहू शकतो. कदाचित मी अमरावतीला परतणारही नाही.

ह्यामुळे हा विषय संपला. म्हणून मी माझ्या मुलाला व गोपाळराव डोरले यांना अमरावतीला परतण्यास सांगितले. त्यामुळे ते निघण्यास तयार झाले आणि आमचा निरोप घेतला. आणि साई महाराजांचे आशिर्वाद घेण्यास गेले. त्यांनी त्यांना दुसऱ्या दिवशी निघण्यास सांगितले. दुपारच्या वेळी त्यांनी सांगितले की त्यांनी माझ्या कुटुंबाला दुसऱ्या दिवशी परतण्यासाठी परवानगी दिली. गायत्री-परशुरामाच्या अनुष्ठान समाप्तीमुळे मेघा यांनी आज काही ब्राह्मणांना जेऊ घातले. आम्ही आमचे जेवण त्यांच्याबरोबर घेतले. हे जेवण साठे यांच्या वाड्यावर झाले. दुपारच्या वेळी मशिदीत व नेहमीप्रमाणे फेरफटक्याच्या वेळी मी साई महाराजांना पाहिले. ते फारच उत्साही होते आणि हसत व मनातल्या मनात पुटपुटत होते. रात्री भीष्मांचे भजन झाले आणि दीक्षितांच्या रामायणातील दोन पाठ वाचून झाले. संध्याकाळी तात्या पाटील यांचे वडील वारले.

## लेखक - कवींस निवेदन

**श्री साईलीला मासिकाकडे साहित्य पाठविताना लेखक-कवींना पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

**सुवाच्य अक्षरात कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून लिखाण असावे, ते पाठोपाठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे.**

**हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

**अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरुपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**का.सं.**

# साईलीलाचे ६५ व्या वर्षांत पदार्पण

— सौ. सरोजिनी मुळये
सरस्वती सदन,
६ नाथ मंदिर कॉलनी, इंदूर.

*श्रीसाईलीलाचे पहिले भाग्यवान संपादक, श्री साईनाथांचे लाडके भक्त श्री. काकासाहेब महाजनी यांच्या सुदैवी कन्या सौ. सरोजिनी भास्करराव मुळ्ये, इंदूर यांनी लिहिलेला श्रीसाईलीलाच्या संदर्भातील हा लेख मुद्दाम वाचकांसमोर ठेवीत आहोत — का. संपादक*

साईलीला एप्रिल १९८६ चा अंक वाचण्यासारखा व संग्रही ठेवण्यासारखा आहे. साईलीला मासिक सुरू करण्यामागचा उद्देश व त्याची माहिती माझे वडील कै. लक्ष्मण गणेश महाजनी यांनी १९२३ साली साईलीला मासिक सुरू करून सर्व भक्त मंडळींना साईची लीला कळावी ह्या खास उद्देशाने हे मासिक मुद्दाम सुरू केले. हे मासिक जर सुरू झाले नसते तर लोकांना कसे कळले असते की, असे अंर्तज्ञानी व चमत्कारी संत शिर्डीत आहेत. त्यांनी घडविलेले चमत्कार सर्वांना माहितच आहेत. सटका आपटून विस्तव व पाणी निर्माण करणे, निसर्गावर हुकमत चालवून पाऊस थांबवणे ह्या अलौकिक गोष्टी भक्तांना कळण्यास ही साईलीलाच कारण आहे. माझे वडील साईलीलेचे प्रथम संपादक होते ही भाग्याची गोष्ट आहे.

माझे वडील त्यांचे अगदी निस्सीम भक्त होते. त्यांना साईशिवाय दुसरे दैवत नव्हते. प्रत्येक उत्सवाला न चुकता ते हजर रहात असत. ३७ व्या अध्यायात ७३ व्या ओळीत म्हटले आहे तसे "वदनी साईचे नाम, हृदयी श्री साईचे प्रेम, तथा नित्य आराम, क्षेम रक्षी स्वयमेव साई" हे त्यांच्या बाबतीत खरे होते. एका मित्राचा मुलगा शिरडीस जाण्यास तयार नव्हता, तेव्हा ते म्हणाले, तू मजबरोबर चल तर! त्या प्रमाणे तो बाबांना न मानणारा मुलगा शिर्डीस गेला. तेथे गेल्यानंतर बाबांनी त्याच्या मृत पित्याचा आवाज त्याला काढून दाखविला व क्षणभर तो गोंधळला व येथे काहीतरी शक्ती आहे हे समजून बाबांना शरण गेला. तसेच आम्ही पार्ल्याला कै. काकासाहेब दिक्षीतांच्या आऊटहौस मध्ये रहात होतो. तेथे शेजारीच आगाशे नावाच्या एक बाई रहात होत्या. त्या वडिलांना म्हणाल्या, मला सुद्धा दर्शनाला यावेसे वाटते पण गेल्याबरोबर बाबा पैसे मागतात हे मला आवडत नाही. तेव्हा ते म्हणाले की, ते स्वतःसाठी पैसे मागत नाहीत. गरिबांना वाटतात. तुमच्या जवळ ते मागणार नाहीत. तुमची इच्छा नसली तर देऊ नका. शेवटी एवढे झाल्यावर त्या शिर्डीला गेल्या व बाबा लगेच म्हणाले, आई मला पैसे देऊ नकोस. हे ऐकल्याबरोबर त्या वरमल्या व हे त्यांना कसे कळले? असे म्हणून भक्त बनल्या. ह्या अंकाचे संपादकीयही वाचन व मनन करण्यासारखे आहे. श्री रामचंद्रासंबंधी माहिती फारच छान आहे. रामनामाची पकड बाबा कसे ओळखून होते हे छान लिहिले आहे व रामनवमी उत्सव सुरू करण्यामागील हेतू काय होता हे लक्षात घ्यावे.

हा उत्सव शिरडीस प्रथम सुरू करण्यास माझे वडील व कै. कृ. ज. भीष्म हे कारणीभूत झाले. त्यांनी बाबांची आज्ञा घेऊन पुढाकार घेतला. बाबांनी विचारले, हा उत्सव कोणाच्या हुकुमाने तुम्ही सुरू केलात? तेव्हा वडील म्हणाले, तुमच्याच हुकमाने. हे ऐकून बाबांनी दोन हार आणिले. एक काकांच्या गळ्यात घातला व दुसरा भीष्म यांना दिला. गळ्यात हार असल्याशिवाय कीर्तन कसे होईल असे बाबा म्हणाले. माझे वडिलांना संतदासगणू महाराजांनी रचिलेले जन्मआख्यान पाठ होते. ते म्हणाले, आता तर आपण कीर्तन करू. पुढल्या वर्षी आणखी कोणी पाहू. अशारितीने सुंठवडा वाटून हा उत्सव पार पडला. सुरवातीपासून आजतागायत हा उत्सव नियमित चालू आहे.

महाराष्ट्रात अध्यात्मिक विषयाला वाहिलेले, संत पुरुषाच्या विचारशलाका भाविक वाचकांसमोर ठेवणारे, खुद्द साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव प्रदर्शित करणारे, एकाच विषयाला संपूर्णपणे वाहिलेले, एवढे प्रदीर्घ वाटचाल केलेले अन्य मासिक नाही. ही मोठी अभिमानाची व अगदी खरी गोष्ट आहे. हे मासिक जर चालू नसते तर निरनिराळ्या ठिकाणी असणाऱ्या असंख्य साईभक्तांना हे अनुभव कसे कळले असते? ही साईलीला अगाध आहे. अनुभवांवरून कळते की भक्तगण वाढत आहे. पूर्वीच्या भक्त मंडळीपेक्षा हल्लीच्या नवीन भक्तांत, भक्ती वाढावी म्हणून अनुभव जास्त प्रमाणात देत आहेत असे मला वाटते. अखंड नामस्मरण करण्यास बाबांनीच शिकविले.

पूर्वी जेव्हा शिरडीत साईबाबा प्रगट झाले तेव्हा शिर्डी हल्लीसारखी सुखसोईयुक्त नव्हती. ती कशी होती ह्याचे वर्णन मे १९८६ च्या साईलीलेत श्री. शंकर हरीभाऊ चौबळ यांनी त्या काळचे वर्णन अगदी योग्य केले आहे. ते माझ्याच वयाचे आहेत. तेव्हा त्या वेळची शिरडी माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली कारण ते सर्व मीही पाहिलेले आहे. हे साईलीला मासिकामुळेच भक्तांना कळले. तरी ही साईलीला अखंड चालू रहावी व बाबांचे अनुभव सदैव येत रहावेत एवढेच त्यांच्या चरणी मागणे मागून त्यांना शतशः प्रणाम करते.

★★★

## पाचलेगावकर महाराजांचे निधन

राष्ट्रसंत धर्मभास्कर श्री संत पाचलेगावकर महाराजांचे शनि. ता. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वा. मुंबईतील जे. जे. इस्पितळात दुःखद निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ८० वर्षांचे होते.

श्री. पाचलेगावकर महाराज हे श्रीनृसिंह सरस्वतींच्या दत्त संप्रदायातील एक सिद्द पुरुष समाजसुधारक व बुद्धीवादी हिंदुत्वनिष्ठ असे सत्पुरुष होते. असंख्य मान्यवरांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. श्रमदान यज्ञातून भारतीय समाजाला एक संघ करण्याचे कार्य हे त्यांचे जिवीत कार्य होते. सर्प देवता त्यांना प्रसन्न होती.

श्री महाराजांच्या असंख्य शिष्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

माणूस स्वार्थी आहे. हे त्यांनी पक्के जाणले होते. सत्प्रवृत्ती वाढीस लावण्यासाठी व लोकांत चांगले तत्त्वज्ञान, आचार-विचार रूजविण्यासाठी त्यांना आकर्षित करणे आवश्यक भासल्याने; श्री साईबाबांनी प्राप्त सिद्धीच्या जोरावर चमत्कार केले. लोभापायी लोक जमू लागले. आणि मग साईबाबांच्या सान्निध्यात आल्यावर त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन साहजिकच सद्गुणी झाले. आजही त्याचा प्रत्यय अनेकांना येत आहे. प्रत्येकजण साईबाबांच्या प्रतिमेसमोर किंवा मूर्तीसमोर नतमस्तक होताना; प्रथम स्वार्थ-बुद्धी ठेवतो. परंतु त्यानंतर तो कळत नकळत सश्रद्ध, नम्र, श्रद्धाळू व दयाळू होतो. म्हणूनच हिंदू, पारशी, मुसलमान, ख्रिश्चन, अस्पृश्य, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादी सर्व जाति-धर्माचे लोक शिरडीत एकत्र बसून भोजन, पूजाअर्चा, अभिषेक करतात. असे सर्वधमरपरिषदेचे नित्यनूतन दर्शन शिरडीत घडते.

# हरीला बांधारे प्रेमानी

(चाल - सेतु बांधारे सागरी)

हरीला बांधारे प्रेमानी,
हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
हरीला बांधारे प्रेमानी
हरीला बांधारे भक्तिनी
भावाचा भुकेला, हृदयी गुंतला,
प्रेम धाग्यानी
हरीला बांधारे प्रेमानी
हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
अनंत रूपानी, अनंत वेषानी,
दिसला से लोचनीत
हरीला बांधारे प्रेमानी। हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
थोर थोर संतांनी, ज्ञानोबा तुकयानी,
भक्तिनी आळविले श्रीहरीसी
हरीला बांधारे प्रेमानी। प्रभुला बांधारे भक्तिनी
साईला बांधारे भावानी
बांधारे, बांधारे, बांधारे, प्रभुला बांधारे प्रेमानी
बांधारे भक्तिनी ॥

— **श्रीमती लीला बाबरे**
पो. चर्च, दादर, मुं. - २८.

# संतांची एकात्मतेची शिकवण

**श्री. सुनील द. राणे**
ए/९२, शिवशक्ती,
विष्णू गणेश पिंगळे मार्ग,
चिंचपोकळी, मुंबई-४०० ०१२.

समाजाला विघातक असलेल्या मानव निर्मित दोषांचे निर्मूलन करण्यासाठी; संत महंत अवतार घेत असतात; हा परमेश्वरी संकेत आहे. ज्ञानेश्वर ते रामदास या कालावधीतील बहुतेक सर्व संतांनी मानवी मनाचा विकास घडवून समाजोद्धार करण्यासाठी केलेले आपले विचार, तत्त्वज्ञान चिरंतन राहण्यासाठी ग्रंथ, अभंग, काव्य इत्यादी साहित्य प्रकार हाताळले. परंतु १९ व्या शतकातील उतरार्ध ते २० व्या शतकातील पूर्वाध या खंडातील आधुनिक संतांनी समाजसुधारणेच्या कामी वाङ्मय निर्मिती केल्याचे विशेषत्वाने आढळत नाही. याचा अर्थ मात्र असे नव्हे की, या कालच्छेदातील संतांना लेखन शैलीची जाण नव्हती. श्रीसाईबाबांनी अल्पवयातच खडतर तपश्चर्येने सिद्धि प्राप्त केली होती. त्यांनी कै. अण्णासाहेब दाभोलकर, दासगणू आदी व्यक्तिंना लेखन करण्यास प्रवृत्त केले, हे सर्वश्रुत आहे. श्रीसाईबाबांनी समाज सुधारणेसाठी; दलित-पतित, गरीब-श्रीमंत अशा सर्व थरातील लोकांच्या प्रत्यक्ष सहवासात राहून उपदेश केले. साहित्य हे केवळ सुशिक्षित वर्गापुरते मर्यादित असल्याने व सन्मार्गाची दिशा दर्शविणारे विचार तळागाळा पर्यंत पोहचणे आवश्यक असल्याने; साईनाथांनी दीनदुबळ्या जनतेत राहून समाजोद्धाराचे भरीव कार्य केले.

'ईश्वर भक्ति' हा जरी संतांचा स्थायीभाव असला तरी, सामाजिक सुधारणा हा त्यामागचा प्रमुख हेतू आहे. परस्परांत एकता, बंधुत्व प्रस्थापित करण्यासाठी 'परमेश्वर भक्ति' हा एकमेव मार्ग असल्याने; तो सर्व संतांनी चोखाळल्याचे निदर्शनास येते. 'परमेश्वरासमोर सर्व सारखे' ही उक्ती एकात्मतेच्याच उद्देशाने संतांनी रचली आहे.

ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, चोखामेळा या संतांचा धर्म-जात ज्ञात असल्याने; तत्कालिन समाजातील विशिष्ट वर्गाकडून त्यांची उपेक्षा व अवहेलना करण्यात आली. नंतरच्या काळात संत वाङ्मयाचे परिशीलन झाले असले तरी, ते लोकाभिमुख व्हावयास कारण ठरले, ते त्यांचे चमत्कार! हेच नेमके श्रीसाईबाबांनी हेरले. कोणत्याही जाति-धर्मापुरती आपली मतप्रणाली मर्यादित न राहता; ती सर्वदूर पसरावी म्हणून साईबाबांनी आपला धर्म-जात यांचा मागमूसही लागू दिला नाही. बाबांचा श्रद्धा, सबूरी व मानवतेच्या एकात्मतेला आवाहन करणारा संदेश केवळ देशभरातच नव्हे; तर विश्वात पसरू लागला आहे. यात प्रत्यवाय नाही. वयाच्या चार ते सोळा वर्षापर्यंत (साईसच्चरित अध्याय चौथा, ओवी ११८) साईबाबा कुठे होते याविषयी कुणासही माहिती नाही. या कालच्छेदात बहुदा त्यांनी समाजाविषयीचे चिंतन, मनन केले असावे. तद्नंतर त्यांना समाजातील दुही नष्ट करण्यासाठी जो मार्ग सुचला; तो त्यांनी पुढील आयुष्यात अवलंबिला.

माणूस स्वार्थी आहे. हे त्यांनी पक्के जाणले होते. सत्प्रवृत्ती वाढीस लावण्यासाठी व लोकांत चांगले तत्त्वज्ञान, आचार-विचार रूजविण्यासाठी त्यांना आकर्षित करणे आवश्यक भासल्याने; श्री साईबाबांनी प्राप्त सिद्धिच्या जोरावर चमत्कार केले. लोभापायी लोक जमू लागले. आणि मग साईबाबांच्या सान्निध्यात आल्यावर त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन साहजिकच सद्गुणी झाले. आजही त्याचा प्रत्यय अनेकांना येत आहे. प्रत्येकजण साईबाबांच्या प्रतिमेसमोर किंवा मूर्तीसमोर नतमस्तक होताना; प्रथम स्वार्थ-बुद्धी ठेवतो. परंतु त्यानंतर तो कळत नकळत सश्रद्ध, नम्र, श्रद्धाळू व दयाळू होतो. म्हणूनच हिंदू, पारशी, मुसलमान, ख्रिश्चन, अस्पृश्य, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादी सर्व जाति-धर्माचे लोक शिरडीत एकत्र बसून भोजन, पूजाअर्चा, अभिषेक करतात. असे सर्वधमरपरिषदेचे नित्यनूतन दर्शन शिरडीत घडते.


## हरीला बांधारे प्रेमानी

(चाल - सेतु बांधारे सागरी)

हरीला बांधारे प्रेमानी,
हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
हरीला बांधारे प्रेमानी
हरीला बांधारे भक्तिनी
भावाचा भुकेला, हृदयी गुंतला,
प्रेम धाग्यानी
हरीला बांधारे प्रेमानी
हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
अनंत रूपानी, अनंत वेषानी,
दिसला से लोचनीत
हरीला बांधारे प्रेमानी। हरीला बांधारे भक्तिनी
बांधारे, बांधारे, बांधारे ॥
थोर थोर संतांनी, ज्ञानोबा तुकयानी,
भक्तिनी आळविले श्रीहरीसी
हरीला बांधारे प्रेमानी। प्रभुला बांधारे भक्तिनी
साईला बांधारे भावानी
बांधारे, बांधारे, बांधारे, प्रभुला बांधारे प्रेमानी
बांधारे भक्तिनी ॥

— **श्रीमती लीला बाबरे**
पो. चर्च, दादर, मुं. - २८.

# श्रीगणेश — चतुर्थी



भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून शुद्ध चर्तुदशीपर्यंत महाराष्ट्रात जो सण साजरा केला जातो त्यास गणेशोत्सव असे म्हणतात. भाद्रपद शु. चतुर्थीच्या दिवशी श्रीगणेशाचा जन्म झाला म्हणून या दिवशी घरोघरी मातीच्या गणपतीच्या मूर्तीची विधिपूर्वक स्थापना करून पूजा अर्चा केली जाते. अनंत चर्तुदशीस या मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात.

गणेश या देवतेची योजना बुद्धिस्थानाच्या ठिकाणी झालेली आहे व वाणीच्या ठिकाणी सरस्वतीची प्रतिष्ठा आहे. गणपति संबंधाने वेदामधून, महाभारत व रामायण ग्रंथातून, इतर अष्टादश पुराणातून, स्मृतींतून किंवा सामान्य स्तोत्रातून जे वर्णन येते त्याचा सारांश थोडक्यात असा आहे.

गणपति हा शंकराचा आणि पार्वतीचा मुलगा आहे. षडानन कार्तिकेय नावाचा त्याला एक भाऊ आहे. त्याचे मस्तक हत्तीचे असून त्याचा एक दात तुटलेला आहे. तो विघ्नहर्ता आहे व प्रत्येक मंगल कार्याला त्याच्या स्मरणाने आरंभ केला नाही तर त्यात अनेक विघ्ने येतात असा धर्मशास्त्राचा आदेश आहे. त्याच्या मस्तकावर चंद्र आहे म्हणून त्याला भालचंद्र असेही नाव आहे. चौदा विद्या व चौसष्ट कला या सर्व त्याच्या पत्नी आहेत. मूषक हे त्याचे वाहन आहे. याला मोदक फार आवडतात. पूजासामुग्रीत दूर्वा आणि शमी याला अत्यंत प्रिय आहेत. गणपति ही शीघ्र प्रसन्न होणारी देवता आहे. गुणदृष्टीनेच या देवतेकडे पाहिले असता बुद्धिदान आणि विघ्नहरण हे विशेष गुण या देवतेत आहेत असे दिसून येते.

ऋग्वेद, मैत्रायणी संहिता, तैत्तिरीय आरण्यक, महानारायण, काठक, वरदपूर्वतापनीय, गणपति अथर्वशीर्ष ही उपनिषदे, शिवाय बोधान धर्मसूत्र, याज्ञवल्क्यस्मृति, बृहत्संहिता, महाभारत, स्कंदपुराण, अग्निपुराण, मत्स्यपुराण, वराहपुराण, पद्मपुराण, शिवपुराण, लिंगपुराण इत्यादी पुराणांतून नि धर्मग्रंथातून गजाननाचे कमी जास्त उल्लेख सापडतात. तर गणेशपुराण, मुग्दलपुराण, गणेशभागवत, गणेशप्रताप, गणेशलीलामृत, गणेशविजय या पुराणातून गणेश जन्माच्या विविध कथा देण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रत्येक पुराणात या दैवताच्या निरनिराळ्या कथा आढळतात.

वराहपुराणात गणेश जन्माची अशी कथा आहे :- सन्मार्गाने चालणाऱ्या लोकांच्या जीवनात जी विघ्ने उपस्थित होतात त्यांना आळा कसा घालता येईल याची एकदा देवांना मोठे काळजी पडली. कोणताही उपाय सापडेना. तेव्हा ते सगळे शंकराकडे गेले. शंकराने अनिमिष नेत्रांनी पार्वतीकडे पाहिले. त्याच वेळी त्यांच्या मुखातून ईश्वरी अंशाचा एक तेजस्वी पुत्र प्रकट झाला. त्याचे सौंदर्य इतके अलौकिक होते की, स्वर्गातील देवता देखील त्याच्यावर लुब्ध, मोहित होऊन गेल्या. हे पाहून पार्वतीला अतिशय संताप आला. तिने त्याला शाप दिला, "हे कुमारा, तू गजमुख, लंबोदर आणि सर्पाचे जानवे घालणारा होशील" हा शाप ऐकून शंकराला अतिशय संताप आला. ह्या संतापाच्या भरात त्याने आपला देह घुसळला. तेव्हा त्याच्या रोमारोमातून हत्तीचे शिर असलेले व निळ्या अंजनी रंगाचे अगणित विनायक उत्पन्न झाले आणि त्यामुळे पृथ्वी प्रक्षुब्ध झाली. ब्रह्मदेवाच्या विनंतीमुळे शंकराने आपल्या मुखातून उत्पन्न केलेल्या आपल्या पुत्राला ह्या विनायकांचा सेनापति केले. आणि, "प्रत्येक शुभकार्याच्या प्रसंगी सर्वात प्रथम तुझी पूजा केली जाईल" असा त्याला आशिर्वाद दिला. ज्या दिवशी गणपतीचा जन्म झाला ती तिथी 'गणेशचतुर्थी' या नावाने ओळखली जाऊ लागली.

श्रीमहागणपतीचा घरोघर होत असलेला उत्सव लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिकरीत्या करविण्याची चाल १८९३ साली पाडली. आता हा गणेशोत्सव भारतात सगळीकडे थाटाने सार्वजनिक पद्धतीने साजरा होत असतो. या निमित्ताने संघटना, प्रेम, कला-कौशल्य यांची वाढ होते. त्यामुळे राष्ट्रीय कार्याला आणि संस्कृतीला चालना प्राप्त होते.

भारतभर श्रीगजाननाची मंदिरे व मूर्ति आहेत. त्यांची आराधना विविध प्रकारची आहे. महाराष्ट्रात मोरगावचा श्रीमयूरेश्वर, सिद्धटेकचा श्रीसिद्धिविनायक, पालीचा श्रीबल्लाळेश्वर, महडचा श्रीवरदविनायक, जुन्नरचा श्रीगिरिजात्मक, ओझरचा श्रीविघ्नेश्वर, थेऊरचा श्रीचिंतामणि, रांजणगावचा श्रीगणपति हे अष्टविनायक खूप प्रसिद्ध आहेत.

पुण्याजवळ चिंचवड गाव आहे. तिथे मोरया गोसावी या नावाचे थोर गणेशभक्त होऊन गेले. त्याचप्रमाणे अनेक गणेशभक्त ठिकठिकाणी झाले आहेत. पुण्याचे पेशवे गणेशभक्त होते. आपणही हा गणेशोत्सव थाटाने करतो आणि विसर्जनाचे वेळी आनंदाने प्रार्थना करतो.

**गणपति बाप्पा मोरया। पुढल्या वर्षी लौकर या।**
**मंगलमूर्ती मोरया। पुढल्या वर्षी सत्वर या।**

# श्री गुरुवेनमः

— सौ. मंगला सु. वैद्य
१३ टीचर्स कॉलनी,
झाबुआ (म.प्र.),
४५७ ६६१.

मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा निव्वळ हात पाय हलवू शकणारा मांसाचा गोळा असतो. जसजसा तो मोठा होतो, त्याच्या मनावर अनेक प्रकारचे संस्कार होतात. त्याला अनेक व्यवहार, कला शिकून ज्ञान प्राप्त करावे लागते. प्रत्येक गोष्ट शिकण्याकरता त्याला एका गुरुची आवश्यकता भासते. ह्या जगातील व्यवहाराच्या गोष्टी शिकण्यासाठी त्यास अनेक गुरु भेटतात. पण जेव्हा तो अध्यात्माचा विचार करू लागतो व मोक्ष मिळविण्यासाठी सद्गुरु शोधू लागतो तेव्हा त्याला तसा गुरु सहजा-सहजी भेटत नाही. त्याला त्यासाठी अनेक कष्ट सोसून गुरुची नीट पारख करावी लागते कारण अनेक दांभिक तप्त मुद्रा धारण करून, मंत्र देण्याचे मिश करून स्वतःसाठी द्रव्यार्जन करत असतात व अशा प्रकारे त्याची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात असतात. पण अशा दांभिकापासून सावध असणे आवश्यक आहे. जसे दासगणू महाराज म्हणतात :—

*"दांभिक म्हणूं नये गुरु। ते अवघे पोट भरू*
*पुरामाजी फुटके तारूं। तारण्यासी समर्थ नसे।।"*

पण एकदा जर मनुष्यास योग्य असा सद्गुरु भेटला तर त्याचे भाग्य धन्य-धन्य होऊन जाते. त्यास सद्गुरुचा असा ध्यास लागतो की तो सद्गुरु रूपच होऊन जातो यथा —

*"जैसे कनक आणि कान्ति। जैसे दीप आणि दीप्ति*
*तैसीच हे गुरु शिष्य स्थिति। ऐक्य प्रतीति उभयांसी"*

(— सा.स.च. अ. ५ ओ. १३४)

जसे समुद्राचे खारट पाणी मेघांच्या हाती पडल्यावर गोड होते तसेच गुरु शिष्याचे दुर्गुण दूर करून त्यास सज्जन व योग्य बनवित असतात. साधारणपणे गुरु दोन प्रकारचे असतात. नियत व अनियत! अनियत गुरु सद्विचार देतात व मनुष्यास योग्य मार्ग दाखवतात. पण नियत गुरु त्याला ईश्वराचे दर्शन घडवून साक्षात् मोक्ष मिळवून देतात. म्हणून अशा गुरुस सदैव शरण असावे. त्यांचे सतत चिंतन करावे, कारण चिंतन करणे हा मनुष्य-मनाचा स्वभावच असतो पण प्रापंचिक विषयांचे चिंतन करण्यापेक्षा गुरु चिंतनाची सवय मनास लावल्यास मोक्ष दूर नाही. सद्गुरुच्या एका वचनावर प्राण देण्यास शिष्याने तयार असावे कारण गुरु, माता, पिता एवढेच नव्हे तर ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ आहे. माता-पिता जन्म देतात व ईश्वर सगळ्या ऐहीक सुखासाठी साधने देतो पण गुरु जन्म-मरण व ऐहीक सुखाच्या फेऱ्यांपासून वाचवतो. आणि म्हणूनच राम, कृष्ण सारख्या ईश्वरांनाही वसिष्ठ व सांदिपनी सारख्या गुरुंची आवश्यकता भासली. गुरु सदैव सन्निध आहे असे जाणून कर्म केल्यास दुर्वासना दूर होऊन सद्विचार व

सद्व्यवहार ह्यांना वाव मिळतो. ज्याप्रमाणे थिजलेले किंवा विरघळलेले तुप एकच असते तसे अव्यक्त किंवा व्यक्त गुरु सारखेच असतात. गुरु देहधारीच असणे आवश्यक नाही कारण जर शिष्य स्वतःच्या मनाचा ध्यास घेवून आणि शुद्ध भावनांनी पाठलाग करेल तर अव्यक्त गुरुही त्याच्या श्रद्धेच्या बळावर प्रत्यक्ष प्रकट झाल्याशिवाय राहणार नाही. जसे श्री. दाभोळकरांनी म्हटले आहे —

*सद्‌गुरु शब्दे वृत्ति उठता। साईच प्रथम आठवती चित्ता*
*उभेच ठाकती सन्मुखता। ठेविती माथा निज हस्त।।*

(अध्याय -६ ओवी -२)

अशा सद्‌गुरु साईचे स्मरण करून त्यास अनन्यभावे शरण जाऊन ऐहिक व पारलौकिक सुख प्राप्त करूया. कारण सर्व काम पुरवून भक्तांस निष्काम करणे हे त्याचे ब्रिद आहे. तस्मै श्री गुरुवेनमः

# शोध — श्रीसाई कृष्णाचा!

— **श्री. चकोर आजगांकर** एम.ए.
उपसचिव, अर्थखाते, महाराष्ट्र,
वाय. ११/११७०, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

● श्री साईबाबा हे मूलतः विशुद्ध चैतन्यमय गुरुतत्व होते. जीवाला शिवाकडे नेणारे, जडाला चैतन्याकडे नेणारे, ज्ञाताला अज्ञातातील दिव्यता दाखविणारे, अशाश्वत संसाराला शाश्वत मुक्तीचा प्रांत मिळवून देणारे प्रकाशमय, शिवशक्तीमय असे श्रीगुरु तत्व होते. हे गुरुतत्व आपल्याकडे ऋणानुबंधात येणाऱ्या आर्त, अर्थार्थी व मुमुक्षू भक्तांना त्यांच्या पात्रतेनुसार व अधिकारानुसार कृपेचे दान व मार्गदर्शनाचा प्रकाश देत होते.

● पूर्वावतारी कबीरस्वरुपात बाबांनी म्हटले होते की, हरिनामावाचून सर्व व्यर्थ आहे. मी हरीशी एकरुप बनलो आहे. त्यामुळे मला अंत नाही. मी अनंत आहे. प्रभुनाम हे रंकाचे धन आहे. माझे वैभव हरिनामरूप आहे. माझ्या जिव्हेवर हरि आहे. नयनांत नारायण आहे. माझ्या हृदयांत गोविंद आहे. पण ही वाट मला श्रीगुरुरायांनी दाखविली आहे. जेव्हा जेव्हा माझा मार्ग चुकला तेव्हा गुरुरायांनी मला हाती धरून शिकविले :—

**"न जाणिले मी सेवा साधन, वाजविली नच घांट**
**नाही ठेविली मूर्ति आसनी, ना पूजेचा थाट**
**देहकष्ट ते कधि न फोडिती, हरिहृदयाचा पाट**
**हरी तरी ना राम, प्रिय त्या प्रेमनदीचा घाट"**

● श्री बाबा हे उच्च साधकासाठी शिवशक्तीरूप, परब्रह्म स्वरूप प्रकाशरूप होते, तर साध्या संसारी भक्तासाठी ते लीलामय कृष्णरूप होते. त्यांनी आपली समाधी गोपाळकृष्ण मंदिराच्या गाभाऱ्याच्या जागी नियोजित केली होती ते आपल्या साध्या, भोळ्या, दीन दरिद्री, खेडवळ जानपद भक्तांचे गोपगडी श्रीकृष्ण होते. त्यांनी शिरडीच्या गोकुळात आपल्या गोपाळांसह बाललीला केल्या. तरीही आपल्या दिव्य शिवशक्तीमय स्पर्शाने शिरडीच्या गोकुळाची माती सोन्याची बनविली. हवेला दैवी सुगंध दिला. चमत्काराच्या कृपेला आणि करुणेच्या लाघवाने दु:खिताच्या हृदयाला प्रेमाचा दिलासा दिला. त्यांनी मशिदीला द्वारकावती द्वारा मानले. ते भक्तांसाठी वैकुंठाचे वैकुंठपती असूनही मोरपिसांचा मुकुट धारण करणारे गोपवेषधारी श्यामसुंदर होते.

● राधाकृष्णआईने तर त्यांना मनमोहन कृष्ण म्हणूनच भजले, पूजिले, आराधिले. हा वैकुंठीचा राणा श्रीसाई स्तुतिनिंदा, नावलौकिक यापासून मुक्त असलेल्या भक्ताला भेटतो. वैकुंठ कुठे आहे, असा अनंत वर्षे शोध घेतलात तरी ते सापडणार नाही. कारण शुद्ध हृदयातच वैकुंठ असते व वैकुंठपती साईकृष्ण तिथेच रहातो. कबीर रूपात साई म्हणतात :—

**"वैकुंठाचा महिमा गाती, वैकुंठाची कुठे गती?**
**प्रमाण जाणे कुणि ने तयाचे, मुर्खांची शब्दांत रती!**
**तहान जोवर वैकुंठाची तोवरि हरिपदी नच वसती**
**कबीर बोले संतसमागमी नित्य वसे वैकुंठपती"**

● वैकुंठ पती श्रीसाईहरि सदैव प्रेमाने ओथंबलेल्या हृदयांत नित्य जन्म घेतो.

# श्री. भाऊ धुपकर यांचे निधन

गोरेगावचे प्रसिद्ध वयोवृद्ध साईभक्त व श्री साईलीलाचे एक मान्यवर उत्साही लेखक श्री. पुरुषोत्तम कृष्णाजी उर्फ भाऊसाहेब धुपकर यांचे रविवार, ता. ३ ऑगस्ट ८६ रोजी पहाटे त्यांच्या संतकृपा, २१७/६ जवाहरनगर येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने अचानक देहावसान झाले. त्यांच्या मुखात नेहमी साईराम हा शब्द असे व सर्वांचे स्वागत व निरोप या शब्दानेच ते करीत असत. त्यांनी साईलीलामधून वैचारिक विषयावर भरपूर लेखन केलेले असून अलिकडे 'साई गायत्री मंत्र' रचण्याच्या कार्यात ते गर्क होते. निधन समयी त्यांचे वय ७० वर्षाचे होते. त्यांच्या पाठीमागे पत्नी, पुत्र, कन्या, नातवंडे व असंख्य साईभक्तांचा परिवार आहे. त्यांच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# देवाधिदेव साईदेव यांची थोरवी

— श्री. हुद्दार शिवाजीराव गुंडूराव
(M.Sc.Fin. BEd)
मुख्याध्यापक
गव्हर्न. एम.एच.पी.एम. गर्ल्स स्कुल
हलियाळ, ता. हलियाळ, जि. कारवार,
कर्नाटक राज्य.

श्री साईबाबा या नावात अविट गोडवा आहे. त्यांची यथोचित माहिती नसताना सुद्धा, सर्व थरातील लोक त्यांच्यासमोर नतमस्तक होतात. याचे कारण काय असावे? साईलीला मासिकातील त्यांच्याबद्दल लिहिलेले अनुभवयुक्त लेख वाचले तर त्याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही.

जीवनात नव्या आशाआकांक्षाची मनसोक्त उधळण करण्यासाठी. आपले स्वप्न साकार करण्यासाठी श्रीसाईबाबांवर सबुरी श्रद्धा ठेवली असता, त्यांचे नामस्मरण जप केला असता आपली स्वप्ने साकार झाल्याविना रहात नाहीत याचा प्रत्यय येतो. सर्व माणसे आपला चरितार्थ चालविण्यासाठी राबतात, कमवितात आणि जगतात पण काहीजणांची कमाई ही त्यांच्या बुद्धिला फिरविते. या साडेसातीपासून सोडवणूक करणारे, सुधारू शकणारे श्री देवाधिदेव साईबाबा होत.

विद्या, शक्ति आणि संपत्ती याबद्दल प्रताप दाखविणारे, भान हरपून टाकणारे असे श्री साईबाबा आहेत. त्यांची उपासना, आरती, गायत्रीमंत्र जपणाऱ्यांच्या वाट्याला कधीही त्रासाचा प्रताप भोगावा लागणार नाही. साईलीला मासिकातील साईबाबांच्याबद्दलचा भावार्थ काय आहे हे जाणून घेणे आवश्यक वाटते. जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे, मनाचे प्रदुषण दूर करणारे साईबाबा आहेत.

विज्ञानशास्त्रामधील प्रगती ही उच्च शिखर गाठते आहे. सर्व जीविताचा कणा समजला जाणारे असे हे विज्ञान आहे. एका Nucler Atom Bomb मध्ये Peaceful and unpeaceful अशी प्रचंड शक्ति असलेला बॉंब हा सुद्धा विज्ञानाची चमत्कृती होय. पण या सर्वांना आव्हान देण्यासारखी अगाध शक्ति श्री साईबाबांमध्ये आहे. फार तर विज्ञानामुळे हवेतील, पाण्यातील, अन्नातील आणि वातावरणातील प्रदूषण दूर करता येईल. पण माणसाचे मनाचे, अंतःकरणाचे प्रदूषण हे मात्र विज्ञानाने कमी करता येणार नाही. पण ज्यांची श्री साईबाबांच्यावर सबुरी,श्रद्धा आहे त्यांचे अंतःकरण शुद्ध झाल्याशिवाय रहात नाही.

याबद्दल मला आलेला एक अनुभव देत आहे— माझ्या परिचयाचा एक विद्यार्थी १२ वी इयत्ता पास झालेला, शिक्षण झाल्यामुळे त्याचे शेतीकडे दुर्लक्ष झाले. आणि पुढे शिक्षण घेण्याची वेळ निघून गेली होती. साध्या क्लार्कच्या पोस्टसाठी एम.ए. तसेच पदवीधर झालेल्यांचे अर्ज येतात. अशा बेकारीमध्ये त्या विद्यार्थ्याला नोकरी मिळणे महाकठीण! विचार करून करून मन कमकुवत झाले. त्याचा मानसिक तोल ढासळला, तो

वेड्यासारखा करू लागला. त्याच्या मनात नसते विचार येऊ लागले. अशा परिस्थितीत त्या विद्यार्थ्याला माझ्याकडे आणण्यात आले. कारण जवळपासचे डॉक्टर माझ्या ओळखीचे होते. तसेच मानसशास्त्रज्ञ बेळगावचे मा. नंदकुमार यांची पण मला ओळख होतीच. असो! त्याचे विचार आणि गंभीर परिस्थिती पाहून मला त्या विद्यार्थ्याजवळ जाण्यास मन धजेना. पण धीर धरून मी साईबाबांचा धावा केला, त्यांना साकडे घातले की याचे डोके शुद्धिवर येवो! आणि मी त्या विद्यार्थ्याला उदी लावली व खायला दिली. जसे बटण दाबले की उजेड पडतो तसेच त्या विद्यार्थ्यामध्ये परिवर्तन झाले, तो शुद्धिवर आला, सर्वांशी समाधानकारक बोलू लागला. डॉक्टरकडे जायचा प्रश्नच उरला नाही. त्याने मला नमस्कार केला आणि तो आपल्या घरी गेला. आता तो नोकरीवर सुद्धा आहे. काय हा श्री साईबाबांचा अघटित चमत्कार! यावरून श्री साईबाबा अंतःकरण शुद्ध, पवित्र करतात याचा दाखलाच मिळाला.

म्हणून मला वाटते, श्री साईलीला मासिकावर तसेच श्री साईबाबांच्यावर श्रद्धा मात्र मनापासून हवी. त्यांचे चिंतन हवेच पण श्री साईबाबांचे गुणदर्शन, जीवनात आचरणात अनुभूतीत आणणे किंवा अनुभूती मिळवणे हा एक खरोखरच 'परममंगल' आनंद आहे. परमार्थिक लाभासाठी नव्हे तर भोतिक जीवनातील मनःशांतीसाठी जीवन संघर्षातून निर्माण झालेले दुःखमय जीवन दूर करून सुखमय जीवन श्री साईबाबांच्या शिवाय शक्य नाही.

*जरी हे शरीर गेलो मी टाकून ।।*
*तरी मी धावेन भक्तासाठी*

श्री साईबाबांनी ही जी ग्वाही दिली आहे ती बहुतांश खरी ठरत आहे. खरोखरच विश्वात व्यापलेल्या साईभक्तांनी निष्ठेने स्मरत, आरती व गायत्रीमंत्र जपल्यास त्यांच्यासाठी कोणत्याही परिस्थितीत श्री देवाधिदेव साईदेव धावा करून आल्याविना रहाणार नाहीत.

ता. ३१ मे १९८६ ची रात्र, आकाशात ढग जमलेले, चांदणे चुकून दिसत आहे, रात्रीचे चार वाजले आहेत. वादळी वारा सुटल्यामुळे झाडे इकडे-तिकडे हेलकावे खात आहेत. विजेचा लपंडाव आणि ढगामधील वाद्याचा आवाज, अशा आल्हाददायक वातावरणामध्ये श्री साईबाबांबद्दल लिहायला घेतलेला लेख, लिहावा तेवढा थोडाच. त्यांच्याबद्दल लिहायचे आवरते घेऊन लेख संपवतो.

— जय साईमाऊली —

# प्रखर राष्ट्रनिष्ठेचा आदर्श श्री संत पाचलेगावकर महाराज



प्रचलित समाज व्यवस्थेत चार प्रकारचे लोक कार्यरत असतात. समाजातील शांतता व सुव्यवस्था भंग करणाऱ्या राष्ट्रद्रोह्यांचा एक गट. सामाजिक बांधिलकी न मानता स्वार्थबुद्धीने जगणाऱ्यांचा दुसरा गट, तिसऱ्या गटातील लोक स्वहिता बरोबर समाजहित साधत असतातततर चौथ्या गटातील लोक राष्ट्रनिष्ठा हेच जीवनाचं सार डोळ्यासमोर ठेवून सर्वसंग परित्याग करतात. ह्या शेवटच्या गटातील लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतात. संत पाचलेगावकर महाराज हे त्यातील एक.

संत पाचलेगावकर महाराजांनी वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी राष्ट्रनिष्ठेचे कंकण हाती बांधले ते अखेरच्या श्वासापर्यंत कायम ठेवले. राष्ट्रहित हेच जीवनाचे साध्य अंगिकारलेल्या संत पाचलेगावकरांचा जन्म निझामी राज्यात पाचलेगाव ह्या खेडवळ भागात झाला. ते जास्त शिकलेले नव्हते तरी पदवीधारांनाही लाजवील अशी कुशाग्र बुद्धीमत्ता व दांडगी स्मरणशक्ती त्यांच्या ठायी होती. त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्वामुळे हजारो लोक त्यांच्याकडे आकर्षित होत होते. हे संपूर्ण भारतभर त्यांच्या विखुरलेल्या भक्तगणांवरून दिसून येते.

समाजाच्या, पर्यायाने देशाच्या विकासात अडथळे आणणाऱ्या अनिष्ठ रूढींवर महाराजांनी कडाडून हल्ला चढविला. या महान कार्याकरिता त्यांनी अगदी कोवळ्या वयात सर्वसंग परित्याग करून घर सोडले. ही जणू त्यांना ईश्वरी प्रेरणाच होती. निझामी ऐश्वर्य महाराजांच्या चरणी लोळण घेण्यास तत्पर होते, परंतु जन्मतःच स्वार्थाकडे पाठ फिरवून निरपेक्ष वृत्तीची कास धरणाऱ्या श्री संत पाचलेगावकर महाराजांना संपत्तीची अभिलाषा कशी असणार? समाजोद्धाराचे कार्य करताना त्यांना कित्येकदा प्रदीर्घकाल कारावास, हद्दपारीची शिक्षा, स्थानबद्धता, अज्ञातवास आदी संकटांना तोंड द्यावे लागले, तरीही ते कधी डगमगले नव्हते. धर्मजागृती, न्यायहक्क, आर्थिक-सामाजिक विषमतेवर आघात, अनिष्ठ रूढींना पायबंद, राष्ट्र विघातक प्रवृत्तींचा समूळ नायनाट करण्यासाठी प्रयत्न याकरिता महाराजांनी गावेच्या गावे पालथी घातली. विषारी सर्पांना ते लिलया हाताळीत एवढेच नव्हे तर त्यांचे नित्याचे सोबती देखील तेच असत.

चिंता, क्लेष, दारिद्र्य, दुःख निवारण होण्यासाठी हजारो लोक त्यांच्या सोबत गावोगावी फिरत असत. अन्यायाची त्यांना भयंकर चीड येत असे. अन्यायाविरुद्ध लढताना त्यांनी अनेक संघर्षशील विराट आंदोलने केली. त्याचबरोबर कीर्तन, प्रवचन आणि व्याख्यान आदी माध्यमांतून त्यांनी राष्ट्र व धर्मजागृतीचे कार्य केले. श्रमाशिवाय तरणोपाय नाही, हे त्यांनी जाणले होते. श्रमाचे महत्व आम जनतेला पटवून देण्यासाठी त्यांनी श्रममहोत्सव,

श्रमसप्ताह यांसारखे कार्यक्रम आखून ठिकठिकाणी शाळा, विहीरी, नदीचा प्रवाह बदलणे, तलाव, गरीब शेतकऱ्यांना शेतीसाठी सहकार्य, बांध बांधणे इत्यादी विधायक कामेही केली.

दीनदुबळ्या जनतेकरिता महाराजांनी औषधालये, विनामूल्य धान्य बँक, वसतिगृहे, वाचनालये, रात्रप्रबोधिनी, राष्ट्रीय बलसंवर्धन वर्ग व राष्ट्रधर्म अनाथ युवकाश्रम ह्यांची स्थापना केली.

सहजीवन निष्ठेवर त्यांचा गाढ विश्वास होता. भारतीय समष्टि धर्म मिशनच्या विद्यमाने भगवंताच्या अधिष्ठानाखाली कार्य करता यावे म्हणून समष्टि धर्म उपासना मंडळाचे महाराजांनी सर्वत्र जाळे विणले व त्याच्या प्रचाराकरिता विविध ठिकाणी शाखा स्थापन केल्या. मुलुंड व खामगाव येथे महाराजांनी श्री मुक्तेश्वर आश्रमाची निर्मिती करून लोकांत एकतेची भावना जोपासण्यासाठी सामुदायिक उपासना व आरतीवर अधिक लक्ष केंद्रित केले. युवक वर्गात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटविण्याचे अविरत कार्य त्यांनी केले. आजच्या युवापिढीने राष्ट्रैक्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे; हीच श्री संत पाचलेगावकर महाराजांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे.

# तुच कर्ता आणि तुच करविता

बाबा तुम्हीच महान दाता।
सर्वांचे दुःखही हरता।।
शिर्डी सारखे पवित्र स्थान।
तुम्हां वाचून देऊ कुणा मान।।
ज्याच्या मनी 'श्रद्धा आणि सबुरी'।
त्याच्या घरी होती संकटे दूरी।।
साई तूच माता आणि तूच पिता।
तूच दाता आणि तूच त्राता।।
तुझ्या उदीचा घेता प्रसाद।
येई ऐकू तुझी साद।।
साई तुला जीवन-फुले वाहूनी।
पडते पाया साष्टांग करूनी।।

— **सौ. चेतना चिदानंद मेस्त्री**
सीमा अपार्टमेंट, विंग बी,
प्लॉट नं १६, तळमजला,
ठणगेवाडी, चिकणघर
कल्याण (पश्चिम).

# श्री साईबाबांचे अलौकीक सामर्थ्य

— श्री. नंदू लक्ष्मण पाटील
लोकमान्य नगर, पाडा नं. २,
महेश कृपा चाळ,
ठाणा-४०० ६०६, (प.).

आजच्या विज्ञान व यांत्रिक युगात माणूस जीवन जगत आहे. परंतु तो निराश आहे. अशावेळी त्याला योग्य दिशा दाखविणारे, त्याचे आयुष्य उज्वल करणारे श्री साईबाबा या पृथ्वीवर अवतरले. त्यांनी या पृथ्वीतलावर जणू स्वर्ग निर्माण केला आहे. त्यांनी सांगितलेल्या अध्यात्मिक मार्गाने व श्रद्धेने असंख्य भक्तांची संकटे दूर झाली आहेत. याची अनेक उदाहरणे आपण श्री साईलीला मासिकात वाचत असतो.

श्री साईलीला मासिक हे साईंच्या कृपाप्रसादाने लाभलेले पुष्प आहे. त्याच्या वाचनाने, कोणतेही संकट असो त्याची तीव्रता कमी झाल्याशिवाय रहात नाही, व संसाररूपी नौका संकटरूपी लाटातून सहज सुलभतेने तरुन जाते. हे अनेक साईभक्तांनी अनुभवले आहे. श्री साईबाबा दीन दुबळ्यांचे दुःख दूर करण्यासाठी सदैव झटत असत; आणि अजूनही अनेकांची दुःखे दूर करीत आहेत. ते भक्तांवर अनंत नेत्रांनी लक्ष ठेवून आहेत, आणि म्हणूनच आज शिर्डी क्षेत्राचे नाव जगाच्या कानोकोपऱ्यात पोचले आहे.

साईबाबांची कृपा अतर्क्याने भरलेली आहे. कोणासही त्या लीलेचा थांगपत्ता लागत नाही. मोह, माया, वासना यांच्या आहारी न जाता परमेश्वराचे स्मरण करा असा उपदेश ते सदैव करीत असत. आज त्यांच्या भक्त मंडळीत अनेक धर्मांची, पंथांची भक्त मंडळी आहेत. त्यांच्यावर आलेले संकट त्यांना अंतर्ज्ञानाने समजते, व ते संकट निवारणार्थ सत्वर धावून येत आहेत. "तुम्ही कोठेही असा, अनन्यभावाने मला हाक मारा, मी सदैव तुमच्या पाठीशी उभा आहे" हे त्यांनी दिलेले वचन वेळोवेळी अनुभवास येत आहे. त्यांनी पेटविलेल्या धुनीतील उदीने अनेकांची दुःखे दूर होत आहेत, झाली आहेत.

श्री साईंची भक्ती जो करू लागला, त्याच्या जीवनाचे सार्थक झाल्याशिवाय रहाणार नाही. याचे प्रतिक आपणास ज्या ज्या ठिकाणी साईबाबांची मंदिरे आहेत, त्या त्या ठिकाणी व शिर्डीसारख्या पवित्र ठिकाणी पहावयास मिळते. त्यांच्या भक्त मंडळीत गरीब, दुःखी, धनी इ. सर्व आहेत.

ज्यांना नोकरी नाही अशांना त्यांच्या भक्तीने नोकरी लागलेली आहे. फक्त श्रद्धा आणि सबूरी हवी! त्यांनी आपल्या वचनात म्हटले आहे, "जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस, मागे जे जे ज्यास ते ते लाभे."

सद्गुरू साईबाबांची हिंदू-मुस्लिम बांधवांना एकत्र आणून, राम-रहिम एकच आहेत हे पटवून दिले. परंतु त्यावेळी काही कट्टर मुसलमान हिंदूंचा द्वेष करीत होते. हिंदूंनी बाबांची केलेली सेवा, पूजा त्यांना मान्य नव्हती. त्यांना बाबांनी अगाध लीला दाखवून चकीत केले.

एकदा काही मुसलमान पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मशिदीत नमाज पढण्यासाठी आले. त्यांना मशिदीतील जमीन गाईच्या शेणाने सारवलेली (लिंपलेली) व तीही ओली असलेली आढळली. हे पाहून ते रागाने लाल झाले. "साईबाबा तुम्ही आमच्यावर घोर अन्याय केलात असे ते संतापाने म्हणू लागले. परंतु साईबाबांनीच ही लीला केली होती. ते त्यांना शांतपणे म्हणाले, "अरे बाबांनो तुम्ही निश्चित मनाने नमाज पढा, येथील तिळमात्र घाणही तुमच्या वस्त्राला लागणर नाही!" हे ऐकून त्यांनी नमाज पढण्यास सुरुवात केली. नमाज पूर्ण होईपर्यंत साईबाबा त्यांच्या जवळच बसून होते. नमाज पढून झाल्यावर पहातात तर त्यांच्या वस्त्रावर तिळमात्र घाणही लागलेली नाही. हे पाहून ते आश्चर्यचकीत झाले. त्यांनी बाबांच्या चरणांवर लोळण घेतली. बाबांच्या ठायी असलेल्या ईश्वराचे त्यांना दर्शन झाले. आणि ते धन्य झाले. बाबांनी त्यांचा द्वेष बुद्धीचा अहंकार अशाप्रकारे नाहीसा केला. आजही साईबाबा चराचरी वास करून आहेत.

त्यांची सदैव कृपादृष्टी आम्हा सर्व सांईभक्तांवर राहो अशी प्रार्थना करत आहे.

श्री सद्‌गुरू साईनाथ महाराज की जय!

# कबीर : सद्‌गुरुचा महिमा

— **श्री. य.न. पंडित**
'अर्चना', शरणपूर,
नाशिक ४२२००२.

ज्ञानेशांची ओवी, एकनाथांचे भारूड, तुकारामांचे अभंग, वामन पंडितांचे श्लोक व मोरोपंतांची आर्या मराठी भाषेची अद्‌भुत लेणी होत. हिन्दी भाषेत कबिराचे दोहे अतिशय प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. सर्व संतांनी गुरुचे महात्म्य मोठ्या आवडीने व रसिकतेने वर्णिले आहे.

साधनेच्या मार्गातील अडचणी, अडथळे दूर करण्याचे सामर्थ्य केवळ गुरुमध्येच असते. गुरुच्या सहाय्याने साधनेचा मार्ग सोपा बनतो व आपले ईप्सित जवळच्या मार्गाने अल्प कालावधीत साध्य करता येते. साधनेची सफलता गुरुपदेशावर अवलंबून आहे. गुरुचे अध्यात्मिक बल साधकाला प्रोत्साहन व प्रेरणा देते, त्याची सात्विक वृत्ती विकसित करते.

कबीराने मुक्त कंठाने गुरुची स्तुती केली आहे. गुरु व गोविन्द हे दोन्ही एकच आहेत असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. मायेच्या मोहजालातून केवळ गुरुची कृपाच भक्ताला सोडवू शकते. वैज्ञानिक विकास मनुष्याला केवळ ऐहिक सुख देऊ शकते. पारलौकिक सुखाकरिता परमेश्वराचा प्रसादच आवश्यक आहे. गुरु साधकाला दिव्य दृष्टी देऊन परमेश्वराचे दर्शन घडवून आणण्यास समर्थ करतो. सद्गुरु हाच खरोखरी शूर वीर आहे. उपदेशाच्या शस्त्राने तो भक्ताचा अहंकार पळवून लावतो.

कबीराने गुरुच्या बाबतीत एक धोक्याची सूचना दिली आहे. गुरु हा ज्ञानी पाहिजे, त्याला परमेश्वराचा साक्षात्कार झाला असला पाहिजे. नाही तर, एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला काय मार्ग दाखविणार?

**गुरु गोविन्द तौ एक है, दूजा यहु आकार।**
**आपा मेट जीवत मरै, तौ पावै करतार।।**

गुरु व गोविन्द हे दोन्ही एकच आहेत. केवळ दोघांचे स्वरूप भिन्न आहे. गुरुच्या सेवेत जो आपला अहंभाव टाकून देतो तोच परमेश्वर प्राप्तीचा अधिकारी होतो.

**कबीर माया मोहनी, जैसी मीठी खाँण**
**सतगुर की कृपा भई, नहीं तौ करती भाँड।।**

माया खडीसाखरेप्रमाणे मोहक व गोड आहे. सद्गुरुची कृपा झाली नाही तर, मायेच्या जंजाळात विनाश झालाच, म्हणून समजावे!

**चौंसठि दीवा जोडू करि, चौदह चन्दा माँ हि।**
**तिहि घरि किसकौ चानिणौं, जिहि घरि गोविंद नाँहि ।।**

चौसठ कला व चौदा विद्या असूनही मनुष्याचे मन अंधःकारमयच असते. मनुष्याचे मन प्रकाशित होण्याकरिता तेथे परमेश्वराच्या अस्तित्वाची आवश्यकता आहे.

**सतगुरु की महिमा अनँत, अनँत किया उपगार।**
**लोचन अनँत उघाडियाँ, अनँत दिखावणहार।।**

सद्गुरुचा महिमा अमर्याद आहे. तो साधकावर अनंत उपकार करतो. त्याचे डोळे उघडून त्याला दिव्य दृष्टी देऊन परमेश्वराचे दर्शन घडवितो.

**सतगुरु साँचा सूरिवाँ, सबद जु बाह्या एक।**
**लागत ही भै मिली गया, पडया कलेजै छैक।।**

सद्गुरुच खरोखरी शूर वीर आहे. त्याच्या उपदेशाच्या एका बाणाने भक्त जमिनीवर पडतो व त्याच्या हृदयाला जखम होते. अर्थात् अहंकार गळून पडतो व हृदयात परमेश्वराकरिता स्थान निर्माण होते.

**जाका गुर भी अंधला, चेला खरा निरंध।**
**अंधै अंधा ठेलिया, दून्यूं कूप पडंत।।**

ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला नाही असा गुरु व अत्यंत अज्ञानी असा शिष्य काय कामाचे? दोघेही आंधळे. परस्परांना धक्के देऊन शेवटी विहिरीत मात्र पडणार!

# कलीयुगीन परब्रह्म श्री सन्त साईबाबा

— श्री. कृ.भा. देशमुख
३८३, शुक्रवार पेठ, पालकरवाडा, पुणे २.

"जगाच्या कल्याणा संताच्या विभूति देह झिजविती परोपकारे" ही म्हण काही खोटी नाही. जगाच्या कल्याणा करिताच संत जन्माला येतात आणि दिपस्तंभाप्रमाणे जगाला मार्गदर्शन करितात. गोदातट ही महानपुण्यभूमि अनंत काळापासून ही भक्तिच्या गजराने दुमदुमलेली ही पुण्यभूमि, कितीतरी संतश्रेष्ठ या ठिकाणी होऊन गेले त्यातील एक महान संत श्री साईबाबा. बाबा शिरडीत आले आणि शिरडीचे देव फुलले. हे खेडे महान् तिर्थक्षेत्र बनले. "माझ्या पश्चात हे क्षेत्र फार गाजेल मुंग्याप्रमाणे लोक या क्षेत्राला भेट देतील. हे बाबाचे बोल आज खरे झाले आहेत. १८५४ सालची घटना. बाबा शिरडीत आले, ते एका बाल योग्याच्या वेषात, डोकीला पांढरे फडके, अंगात कफनी व कमरे भोवती लुंगी. नंतर काही काळ ते गुप्त झाले व धुप गावच्या चांद पाटलाच्या वऱ्हाडाबरोबर ते परत शिरडीत आले. त्यांचे वास्तव्य द्वारकामाईत असे. हातात सटका, बाजूला चिलिम, जाते. धुनी, मोराची पिसे व अल्ला मालिक तेरा भला करेगा ही त्यांची बडबड, कुणालाही ते आपली पूजा करू देत नसत. त्यांच्या कपाळी कधीही गंध नसे, त्यांचे कानही टोचलेले नव्हते म्हणून सर्वसाधारण लोक त्यांना मुसलमान अवलिया समजत. त्या वेळेस भारतात दंगलीचे वातावरण होते. भारतातील अनेक पंथांचे ऐक्य करण्याकरिताच त्यांचा अवतार होता. मानवता हा त्यांचा धर्म होता. कलियुगातील परब्रह्म म्हणजेच श्री साईबाबा. बाबा सर्वव्यापी व सर्वरूपी होते. म्हणूनच त्यांनी शिरडीत येणाऱ्या काही भक्तांना त्यांचे आराध्य दैवताचे रूपात दर्शन देऊन थक्क केले तर नास्तिकांनाही निरनिराळे चमत्कार दाखवून त्यांचे हृदयात आपले स्थान अढळ करून त्यांचे कल्याण केले, त्यातील काही उदाहरणे खाली देत आहे.

१) १९०९ सालची घटना. एक रामभक्त डॉक्टर एका साईभक्त मित्राबरोबर शिरडीत आले. मी साईबाबांना नमस्कार करणार नाही. मशिदीत येणार नाही. बाबांचा प्रसाद ग्रहण करणार नाही. या अटीवर, साईभक्त बाबांच्या दर्शनाकरिता द्वारकामाईत गेले. डॉक्टर मात्र हा अवलिया कोण आहे हे बाहेरूनच निरीक्षण करीत होते. आणि काय चमत्कार बाबांच्या रूपात त्यांना रामदर्शन घडले. धावतच येऊन त्यांनी बाबांचे पाय धरले. आणि त्यांचे शिष्यत्व पत्करले.अशा तऱ्हेने डॉक्टरला बाबांच्या रूपात रामदर्शन घडले.

२) नाशिकचे प्रसिद्ध ज्योतिषी श्री. मुळे, घोलप गुरुजींचे शिष्य, बाबांचे दर्शनाकरिता ते शिरडीत आले असताना बाबांनी त्यांना भगवी वस्त्रे धारण केलेल्या घोलप गुरुजींच्या स्वरूपात दर्शन दिल्याने तेही बाबांचे पटशिष्य बनले.

३) पांडुरंग भक्त गौळीबुवा हे बाबांचे जुने भक्त आठ महिने पंढरपुरात तर चार महिने शिरडीत असत. मात्र शिरडीत आल्यावर ते बाबांकडे एकाग्र दृष्टीने पहात. काही वेळातच त्यांची समाधी लागे. समाधी उतरल्या नंतर ते आपल्या शिष्यगणांना सांगत

बाबा हे दीनदयाळू परमेश्वराचे अवतार आहेत. साई रूपातच मला प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घडले. अशा तऱ्हेने बाबांनी गौळी बुवांना पांडुरंगाचे दर्शन घडवून आपले शिष्य बनविले.

४) बाबांसाठी जीवाचे रान करणारी, रोज ते जेथे असतील तेथे त्यांना जेवण नेऊन देणारी बायजा, आज तिच्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस तिची तब्येत बरी नव्हती तरीपण तिने वरण भात, भाज्या, पुऱ्या, बासुंदी, चटणी आदी पदार्थ तयार केले. पाटील व मुलाला तिने जेवू घातले. बाबांनी हे अन्न खावे अशी तिची फार इच्छा म्हणून ती दोन वेळा मशिदीत जाऊन आली. बाबा भेटले नाहीत. निराशेने घरी येऊन ती सतरंजीवर पहुडली इतक्यात "बायजामाय माझ्यासाठी जेवण है का? हे बाबांचे शब्द तिच्या कानी पडले. धावतच उठून तिने बाबांचे पान वाढले. त्यांना पोटभर जेऊ घातले. तिला परमेश्वर जेवल्याचा आनंद झाला. बाबांनीही तिला जेवावयास बसविले. स्वतः वाढणी केली. आग्रहाने तिला भरपूर जेवावयास घातले. बाबा निघाले तेव्हा बायजा व पाटील उभयतांनी बाबांना नमस्कार केला. बाबांनी आशिर्वाद दिला व कफनीतील उदी काढून बायजाच्या कपाळावर लावली आणि काय आश्चर्य! बाबांच्या रूपात बायजाला शिवशंकराचे दर्शन घडले. कितीतरी वेळ ती बाबांकडे पहात होती.

५) एकदा बाबांचे भक्त म्हाळसापति व माधवराव आईने केलेला देवीचा नवस फेडण्याकरिता वणीला (नाशिकला) पोहचले. ती वेळ मध्यान्हाची असल्यामुळे, देवीची मध्यान्हाची आरती चालू होती. देवीचे मोहक ध्यान पाहून दोघेही तल्लीन होऊन पहात होते. इतक्यात देवीच्या जागी त्यांना साई भगवान दिसू लागले. आरती संपली लोक देवीचा जयजयकार करू लागले, सप्तशृंगी माताकी जय. तर आनंदाने बेहोष होऊन माधवराव जय शिरडेश्वर जय साई भगवान असा जयघोष करीत होते. अशा तऱ्हेने बाबांनी माधवरावांना देवीच्या रूपात दर्शन दिले.

६) केळकरांचा नोकर मेघा शिवभक्त कधी कधी केळकरांबरोबर शिरडीत येत असे. पण बाबांना तो मुसलमान अवलिया समजे. त्याची शिवभक्ति पाहून बाबांनी त्याला स्वप्नात त्रिशूळ शोधून काढावयास सांगितले. तसेच एकदा दर्शनाला आला असताना त्याला शिवलींग देऊन पुजा करण्यास सांगितले. पुढे पुढे तो बाबांना शिव समजून दोन मैलावरून गंगा आणून त्यांना स्नान घाली व बिल्व पत्रे डोक्यावर वाही. ह्या त्याच्या प्रामाणिक सेवेमुळे बाबांनी त्याला शिवस्वरूपात दर्शन दिले.

७) बाबा कलावंतांना भरपूर पैसे देतात हे ऐकून दक्षिणेकडील एक कुटुंब (मद्रासी) शिरडीत आले. बाई रामभक्त व सात्विक होती. चिपळ्यांच्या तालावर ती राम रामच गीत गात होती. बाबा शिळेवर बसून तन्मयतेने गीत ऐकत होते. द्वारकामाईतील भक्त तल्लीन झाले होते. इतक्यात बाईच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या कारण तिला रामदर्शन घडले होते. गाणे संपले. बाबांनी तिला आशिर्वाद व दोन रुपये दिले. बाईने आपल्याला रामदर्शन घडल्याचे पतीला सांगितले. पण तो ते मानण्यास तयार नव्हता. कारण बिदागी कमी मिळाली म्हणून तो नाराज होता. रागाने त्याने आपले बिऱ्हाड मारूतीच्या देवळात हलविले. देवळात पहाटे बाबांनी स्वप्नात त्याला विचारले, तुला काय पाहिजे? तो

म्हणाला, रामदासांना मी गुरुस्थानी मानतो मला त्यांचे दर्शन घडवा. बाबांनी त्याला मागे पहावयास सांगितले तो काय बाबांच्या रूपात त्याला प्रत्यक्ष रामदासाचे दर्शन घडले. त्याने आपला शिरडी सोडण्याचा बेत रहित करून मुक्काम वाढविला. अशातऱ्हेने बाबांनी बाईला रामाचे व पतीला रामदासाचे दर्शन घडविले.

अशा तऱ्हेने बाबांनी त्यांच्याकडे येणाऱ्या भक्ताला निरनिराळे चमत्कार दाखवून आपणाकडे खेचून घेतले. नास्तिकाचेही मनातील विचार ते द्वारकामाईत येताच ते बोलून दाखवित व त्यांना आपले शिष्य बनवित. 'शिरडीस ज्याचे लागतील पाय टळती अपाय सर्व त्याचे' हे त्यांचे वचन त्यांनी खरे करून भक्तांची दुःखे नाहिशी करून कल्याण केले. कित्येकांना त्यांनी संतती तर कित्येकांना संपत्ती दिली. आजही जे त्यांना विश्वास व श्रद्धेने भजतात, त्यांना अनुभव मिळतात. हे साईलीलाच्या अंकाच्या प्रसिद्ध होणाऱ्या अनुभवावरून कळून येईल. अशा या जगाचे कल्याण करणाऱ्या अनंत कोटी ब्रह्मांडनायक सद्गुरु साई भगवानांना माझे कोटी कोटी प्रणाम.अशीच कृपा त्यांनी आम्हा भक्तांवर ठेवावी.

# श्री साईनाथ प्रसन्न

जयदेवा जयदेवा जय साईनाथा
चरणी ठेवितो तुझ्या मी माथा ।। धृ० ।।

सकळ भक्तजन तुझे नाम घेती
दुःख हरून संकट मुक्त होती
जयदेवा जयदेवा जय साईनाथा
चरणी ठेवितो तुझ्या मी माथा ।। १ ।।

निशी दिनी भक्तांचा मेळा येतो
साई नाथा तू नवसाला पावतो
जयदेवा जयदेवा जय साई नाथा
चरणी ठेवितो तुझ्या मी माथा ।। २ ।।

भक्तजन सकळ आरती करती
साईनाथा तुज ओवाळून आरती
जयदेवा जयदेवा जय साईनाथा
चरणी ठेवितो तुझ्या मी माथा ।।३ ।।

रूप तुझे सुंदर विमल ज्ञान
भक्तावरी सदोदीत असते ध्यान
जयदेवा जयदेवा जय साईनाथा
चरणी ठेवितो तुझ्या मी माथा ।। ४ ।।

**— श्री. घोरपडे**
वरळी, मुंबई - २५.

# बाबा माझे माता पिता

— सौ. दिपा स. आळवेकर
३/१२४, खेरनगर, वांद्रे(पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

'शिरडी के साईबाबा' हा सिनेमा पाहिल्यापासून बाबांच्या विषयी माझ्या मनात भक्ति उत्पन्न झाली. पण या गोष्टीला बरेच दिवस झाले. १९८४ ते १९८५ सालापासून बाबांची ओढ जास्त लागली ती अशी साईलिलाचा दिवाळी अंक माझ्या पतीने आणून दिला. तो वाचून तर अक्षरशः मी बाबांच्या भक्तीत बुडूनच गेले, पण बाबांचे दर्शन घडणे कठीण वाटायला लागले. कारण बाबांची इच्छा झाल्याशिवाय शिरडीस जाणे होत नाही व जवळ साईबाबांचे देऊळ पण नाही. घरी फोटो फक्त होता. त्याची पूजा करून मनाचे समाधान करीत राहिले. पण काय चमत्कार बाबांची कृपा झाली आणि जवळ साईमंदिर झाले. शिरडीलादेखील जाण्याचा योग आला मग बाबांच्या विषयी मनात खूपच आदर वाटायला लागला. ८५ साली मला बराच त्रास झाला. आजारपणाने तर सीमाच केली. आजारपणात महिना दोन महिना गावी जाणे असे चालले व माझे पती एकटेच असल्याकारणाने गावाकडील व येथील आम्हालाच बघावे लागते. या सर्वांमुळे माझी प्रकृती बरीच खालावली. डॉक्टरकडे जाऊन सर्व तपासणी केली तर, डॉक्टर म्हणतात की, फक्त टॉनिक खा. काही आजार नाही. मग अशा वेळेस फक्त आधार बाबांचा.

अशावेळी मन शांत राहू दे, मनात काही विचार येऊ नयेत म्हणून दोन क्लास सुरू केले. शिवणकला व हस्तकला.

मन उदास बेचैन. काही सूचेना. पण डोळ्यासमोर फक्त बाबा. घराबाहेर पडताना बाबांची उदी लावणे, बाबांची अंगठी घालणे, अंगाला उदी लावणे, नित्यनेमाने बाबांची प्रार्थना करणे, गुरुवारी अभिषेक करणे असा नियम ठेवला आणि काय आश्चर्य बाबांची कृपा झाली. मी शिवणकलेच्या परीक्षेत पहिल्या वर्गामध्ये पास झाले व हस्तकलेमध्ये २ रा नंबर आला.

आता माझा आनंद गगनात मावेनासा झाला. असे आजपर्यंत लहान मोठे अनेक अनुभव आम्हा उभयतांना आले. बाबांचे किती उपकार मानावेत. बाबांचे उपकार आयुष्यात फिटणार नाहीत.


बाबांना एक मागणे मागितले. प्रत्येक वर्षी आपल्या समाधीचे दर्शन घडू दे, हे बाबांनी ऐकले आणि या वर्षीही शिरडीस जाण्याचा योग आला. पण तब्बेतीची कुरबूर चालूच होती. पण बाबांनी माझी कधीच आणि कुठेच निराशा केली नाही. घरी असले तर काम करणे अशक्य होते. पण काम कधीच रहात नाही. बाबांचे नुसते नाव घेतले की बाबा मदतीला धावून येतात.

आता शिरडीला गेले तेव्हाची गोष्ट. बाबांवर सर्व काही सोपवले. बाबा पाठीशी असल्यावर मला कसले भय आणि शिरडीस जाणे नक्की केले. शिरडीस गेलो, बाबांचे

दर्शन घेतले व येताना आमच्या वर्गामधील बायकांनी त्र्यंबकेश्वरला जाण्याचे ठरवले. त्याप्रमाणे सर्वच बायकांनी तेथे पोहचल्यावर शंकराने जेथे जटा आपटली ते ठिकाण पहाण्याचे ठरवले. पण काय गंमत सांगू! ७५० पायऱ्या चढूण हे घडणार होते. पण बाबांची कृपा. बाबांचे नाव घेतले 'बाबा इच्छा आहे पण हे घडणं कठीण आहे, आपण बरोबर असाल तर काहीच अशक्य नाही.' बरोबर ७ वर्षाची मुलगी, मग बाबांचा धावा केला आणि पायऱ्या चढायला सुरुवात केली आणि विशेष म्हणजे सर्व बायकांमध्ये सर्वांच्या आधी आम्ही वरती पोहचलो व दर्शन घेऊन परतलो. सांगा हे सर्व बाबांच्या मुळेच शक्य झालं की नाही? व संध्याकाळी मुंबईस सुखरूप पोहचलो.

असे हे बाबा भक्तांसाठी किती काळजी घेतात यावरून नक्की दिसून येते.

अजून तब्बेतीची थोडी तक्रार चालू आहे पण बाबा मला नक्कीच बरे करणार अशी खात्री आहे. आजपर्यंत बाबांनी माझ्या सर्व इच्छा पूर्ण केल्या आणि इथून पुढेही करणार अशी खात्री आहे. अशा बाबांना माझे व माझ्या कुटुंबियांचे कोटी कोटी प्रणाम. श्रद्धा व सबुरी हवी म्हणजे बाबा नक्कीच भक्तांच्या इच्छा पूर्ण करतात.



## "प्यारे साईबाबा हमें आशिर्वाद दो"

— **श्री. भा.अ. बेलेकर**
७/९९ राजेंद्र नगर
दत्तपाडा. बोरिवली
मुंबई–४०० ०६६

मे महिन्याची बारा तारीख कारखान्याचा वरचा पत्रा भयंकर तापला होता. तव्यावरच्या माशासारखी हालत झाली होती. डोळ्यांसमोर पाण्यावर पसरलेल्या पेट्रोल सारखे रंग भासत होते. अंगावरचे सगळे कपडे उतरवून थंड पाण्याच्या डोहात डुंबाव असं वाटत होतं. परंतु आमच्या ह्या भाईंदर शहरात प्यायच्या पाण्याच्या एका ग्लासाकरिता गाडी पकडून दहिसरला जावं लागतं तेव्हा थंड पाण्याचा डोह फक्त स्वप्नातच उपभोगायचा.

जीवाची अशी तडफड चालू असतानाच उन्हाळ्याच्या भयंकर तापाने कासावीस झालेल्या, आमचा पत्ता शोधण्याकरिता बराच वेळ भटकावं लागल्याकारणाने वैतागलेल्या एका गिऱ्हाईकाने आमच्या कारखान्यात प्रवेश केला. उंची सफारी सूट, हातात व्हि.आय.पी. ट्रॅव्हलाईट, फोम लेदरचा लाईटवेट पॉवर शू. गिऱ्हाईक टोटली रईस वाटत होता.

खोटं खोटं हसत मी स्वागत केलं. गिऱ्हाईकाने बॅगेतून पृथ्वीच्या गोळ्याचं जपानी मॉडेल बाहेर काढलं. माझ्या हातात पृथ्वीचा गोळा ठेवत गिऱ्हाईक वदलं, इसका डाय बनानेका है। कोटेशन क्या होगा?

मॉडेल बघितल्याबरोबर हे काम सोप नाही याची खात्री झाली. अफलातून कोटेशन सांगून गिऱ्हाईकाला उडवून लावावं असा अंदाज करून कोटेशन सांगितलं. तीस हजार रूपया होगा साब!

वाटलं गिऱ्हाईक भडकेल आणि तणतणत निघून जाईल. आश्चर्य! तसं काही घडलच नाही. गिऱ्हाईक थांबलं आणि विचारत होत डाय कितने दिनमें बनाओगे? मी म्हटलं, कुछ नहीं बोल सकता सेठ। जब होगी तब लेके जाना। गिऱ्हाईकाने बॅग उघडली आणि कॅश पंधरा हजार रूपये ॲडव्हान्स टेबलावर ठेवली. माझ्या घशाला कोरड पडली. आता इज्जतचा सवाल होता. आपल्याने हे काम होणार नाही असेही मी सांगू शकत नव्हतो, आणि मी हे काम करिनच असा आत्मविश्वास जोपर्यंत मला वाटत नाही तो पर्यंत ॲडव्हान्सला हात लावून स्वतःची मान कसायाच्या कैचीत घ्यायची माझी तयारी नव्हती. गिऱ्हाईक ॲडव्हान्स फेकून पंधरा दिनके बाद आऊंगा असं बजावून निघून गेलं होतं.

मॉडेल पुढ्यात ठेवुन बराच वेळ काही आयडिया सुचते का ह्याची वाट पहात बसलो. रात्रीचे आठ वाजले ओव्हरटाईमला थांबलेले कामगार गुड नाईट करून एक एक करून निघून गेले. कारखाना बंद करण्याकरिता थांबलेल्या वॉचमनला बाहेरून शटर बंद करायला सांगितलं आणि काम संपल्याशिवाय घरी येणार नाही असा निरोप पाठवला. रात्रीचा एक वाजला तरी कामाची सुरवात कशी करावी याची कांही लिंक लागेना. भयंकर थकवा आला होता. पापण्या जड होऊ लागल्या होत्या, बाबांच्या फोटोकडे पहात हात जोडले आणि म्हटलं, "प्यारे बाबा इज्जतका सवाल है। प्यारे साईबाबा आशीर्वाद दो। बाबा आशीर्वाद दो। बाबा आशीर्वाद दो।" असं पुटपुटत असतानाच निद्रादेवीनं हळूच आपलं पांघरूण माझ्यावर केव्हा पसरलं हे समजलच नाही. स्वप्न पडत होतं. मला अवकाशयानाच्या खिडकीतून दूरवर पृथ्वी दिसत होती आणि माझे प्रेमळ बाबा विषुवृत्तापासून उत्तर ध्रुवाच्या आसापर्यंत तुरू तुरू चालत होते आणि उत्तर ध्रुवाच्या आसापासून विषुवृत्तापर्यंत परत येत होते, मी आनंदाने ओरडलो बाबा! पंचेचाळीस डिग्रीच्या प्लेटवर जर पृथ्वीचा गोळा बसवला तर माझ्या मशिनचे कटिंग टूल गोळ्याच्या विषुवृत्तापासून उत्तर ध्रुवाच्या आसापर्यंत कटिंग करू शकते आणि तसं झाल तर अक्षांश, रेखांश, प्रदेश आणि त्यांची नाव हे सारं आपण कोरू शकतो, पहाटेचे चार वाजले होते. बाबांच्या आशिर्वादाने पुलकीत झालेलं शरीर हवेत तरंगत असल्याचा भास होत होता. सकाळी माझा कारागिर विलास आणि तंत्रज्ञ मुलगा अतुल यांना कामाची योजना समजावून सांगितली. पांच दिवस आणि पांच रात्री सतत काम करून डाय बनवली. जपानी मॉडेलच्या हुबेहुब मॉडेल मोल्ड केला आणि त्याचदिवशी आम्ही तिघांनी शिर्डीच्या बाबांच्या समाधीवर डोकं ठेवण्याकरिता संध्याकाळची गाडी पकडली.

# बाबांनी मुलाला पुनर्जन्म दिला

— श्री. लक्ष्मण देऊ धुरी
सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट
सायन, मुंबई - ४०० ०२२.

**साई साई नित्य म्हणाल**
**सात समुद्र करीन न्याहाल**
**या बोला विश्वास ठेवाल**
**पावाल कल्याण निश्चये**
**घ्या ही बाबांची प्रचिती.**

मी तसा काही श्री साईबाबांचा कोणी मोठा भक्त मुळीच नाही. फक्त वरील लोकांप्रमाणे मात्र सकाळी उठतेवेळी, संध्याकाळी, दुपारी, चालत्यावेळी, खाते वेळी, मात्र बाबांचे नाव घेत राहतो. आलेल्या संकटाच्या वेळी बाबांचा धावा करतो. कित्येक मोठमोठ्या संकटातून बाबांनी मला सावरले आहे. साईबाबांचे एक साईस्तोत्र मात्र मला पाठ आहे. या स्तोत्रावरच मी मोठमोठ्या संकटातून तरत आलो आहे. मला अशाच एका मोठ्या संकटामधून बाबांनी कसे सावरून धरले, बाबांनी माझ्या मुलाला पुनर्जन्म कसा दिला याचा प्रत्यक्ष पुरावा मी आपणा साईभक्तांपुढे ठेवित आहे.

८ वर्षापूर्वी माझा मुलगा भूपेंद्र जन्म ७-४-१९७४ गुरुवार, गुरुपौर्णिमा. हा मुलगा तीन वर्षाचा असताना हगवणीच्या आजाराने आजारी होता. तो नॅशनल हॉस्पिटलला माहीम मध्ये १९ दिवस ॲडमिट होता. त्याची प्रकृती फारच गंभीर होती. डॉ. आणि हॉस्पिटलमधील स्टाफ फारच प्रयत्न करीत होते. परंतु मुलाची प्रकृती फारच खालावत चालली होती. डॉक्टर पण म्हणाले आम्ही फार प्रयत्न करीत आहोत परंतु मुलाची प्रकृती सध्या फारच गंभीर आहे. जर चार दिवसामध्ये मुलाच्या प्रकृतीमध्ये सुधारणा दिसून आली तर घाबरण्याचे कारण नाही. एके दिवशी मुलाची प्रकृती पहिल्यापेक्षा गंभीर झाली. डॉ. बजाज हे नेहमी ३-३० ते ४-०० या टाईमात येत असत परंतु त्या दिवशी मुलाची प्रकृती ज्या वेळी जास्त झाली त्याच वेळी ते १-०० वाजता हॉस्पिटलमध्ये हजर झाले. डॉक्टरांनी पुष्कळ प्रयत्न केले, दुसऱ्या दिवसापर्यंत मुलाची प्रकृती फारच गंभीर होती. संध्याकाळचे ७ वाजले होते, आम्ही सर्वजण मुलाच्या खाटे जवळ उभे होतो. मुलाने एका मोठ्या माणसाप्रमाणे बोलून दाखवायला सुरुवात केली की तुम्ही आता सर्व घरी जा मी माझ्या घरी जातो. मला जेवायला बोलवित आहे. हे त्याचे शब्द मी ऐकताच एक मिनिटाच्या आत काय होणार हे मी समजलो. मला साईबाबांनी स्फूर्ती दिली मी ताबडतोब मुलाचा हात हातात धरला आणि मोठमोठ्याने साई स्तोत्र म्हणायला सुरुवात केली, मी समजलो मुलगा जर वाचला तर याच साईबाबांच्या कृपेने असे म्हणत मी स्तोत्र बोलायला सुरवात केली. माझ्या तोंडून साई

स्तोत्र म्हणून संपले आणि काय चमत्कार मुलगा ताबडतोब खाटेवर उठून बसला. मी जाऊन डॉक्टरना सांगितले, डॉक्टरांचा विश्वास बसेना कारण डॉक्टर मुलाच्या खाटेजवळ येऊन मुलाच्या पोटाचे १०/१० मिनिटांनी मोजमाप घेऊन जात होते. अशा प्रकारे या मुलाची गंभीर स्थिती होती परंतु साईबाबांनी त्याला यमाच्या दाढेतून सोडवून घेतले व त्या मुलाला बरे केले. आज हा मुलगा ६ वी च्या वर्गामध्ये आहे. अवर लेडी ऑफ गुड कौन्सील हायस्कूल सायन येथे शिकत आहे.

तो रोज संध्याकाळी न विसरता इतर मुलांना बरोबर घेऊन व स्वतः पेटी वाजवून साईबाबांची भजने गातो. अशा अनेक मोठमोठ्या संकटातून बाबांनी मला वाचविले आहे व वाचवित आहेत. ओम श्री साईराम साईराम साईराम.

# साई भक्ती

**— सौ. सुधाताई चैतन्य**

१४ राजस्व ग्राम, इंदोर - ४५२ ००२.

आपण बसतो, फिरतो, एकटे असतो तेव्हा सारखे डोक्यात विचार येतात. पण त्यावर उपाय काय? पुन्हा पुन्हा मन आवरायचे आणि शांतपणा स्विकारायचा. प्रत्येकजण सुख मिळविण्यासाठी धडपड करीत असतो. मी जी गोष्ट सांगते आहे, ती अश्या परिस्थितीचे सौम्य रूप आहे.

मी दुपारच्या वेळी शांततेत पडले होते. माझ्या आईचे बोल म्हणजे लहानपणी मला सांगितलेली गोष्ट माझ्या मनात आली, ती म्हणजे प्रल्हादाची. म्हणे, 'सर्व चराचरांत ईश्वर आहे', हे खरे आहे का? आणि नेहमी **म्हणत असलेली** ओवी मला आठवली —

*मनी धरावे ते होते। विघ्न अवघेची नासोनी जाते।*
*कृपा केलीया गुरुनाथें। प्रचिती येते।*

झालं! माझ मन साईबाबांच्या चरित्राकडे वळलं. मानवी जीवनात सर्वदा उपकारक गुरुसारखे दुसरे तत्व नाही. बाबांची आठवण झाल्याबरोबर मनात पुज्य भाव उत्पन्न झाले. हे सर्वश्रेष्ठ आहेत. कलीयुगातला चालता बोलता ईश्वर आहे. व बुद्धि, तप, सिद्धी, वैराग्य, विज्ञान, दयाळूपणा, परोपकारशीलता व ज्ञानपरिपाकनिधी आहे. बाबांना पारसमनी म्हटलं तरी काही वावगे होणार नाही.

मी दाभोलकरकृत साईचरित्र हातात घेतले व वाचू लागले.

*ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी। तयास नमा नित्य तुम्ही।*
*भूत मात्राच्याही अंतर्यामी। तोच तो मी वर्तती।। ७०।। अध्या. १५।।*
*यास्तव तुम्हांस जो जो भेटे। घरी दारी अथवा वाटे।*
*ते ते ठायी मीच रहाटे। मीच निष्ठे त्या माजी।। ७१ ।। अ. १५।।*

मी पुस्तक तसेच खाली ठेवले व प्रार्थना करू लागले. "देवा! तू परम कृपाळू आहेस. भक्तकल्प कामतरू आहेस. पूर्वी मला माझी प्रार्थना प्रचिती दिलीस तेव्हा आता शेष राहिलेले पारीजातकाचे झाड काढण्याचा दोष घेऊ नको. तुझ्या भक्तांस तुझी पूर्ण भक्ती, त्यांना माझ्या मनाचा रोग मी सांगू शकणार नाही. जर सांगितला तरी काही उपयोग होणार नाही. तू जर सर्वांच्या आत्म्यात आहेस तर माझे कोडे ती पूर्णपणे ओळखले असशीलच. अशा पेचप्रसंगी तुला धावून यावयास पाहिजे. भक्तांकरता प्रत्येक क्षणी देवाने भक्ताला आधार दिला आहे. मी एक गरीब भक्त तुला काय देऊ? माझे मन जे सैरावैरा दवडत होते ते मी तुला अर्पण करते.

काय आश्चर्य! दारात उज्जैनचे साखरे यांनी हाक मारली. मी त्यांना ओळखत नव्हते. त्यांनी आपला परिचय दिला. व सांगितले की, तुमची मुलगी आम्हास पसंत आहे. पुढील गोष्टी करण्यासाठी आलो आहोत. 'पण पूर्वी तर मुलीला पत्रिका जमत नाही या प्रश्नावर नाकारली ना?"

'अहो, काल साखरे आले, त्यांनी सांगितले की मी साई मंदीरात उभा असताना एक गृहस्थ आला व त्याने सांगितले की, आत्ताच उज्जैनला भावाला सांगा की आलेली मुलगी नाकारू नका. मला आपल्या मुलीचे स्थळ सांगण्यात आले व मी पक्क करण्या करता आलो आहे."

मी वर टांगलेल्या साई छबीकडे पहातच राहिले. मुलीचे लग्न झाले. तिला आता मुलगी झाली आहे. पत्रिकेत दाखविलेली 'एक नाड' साई कृपेने नष्ट झालेली आहे.

माझे मत ठाम झाले की, संसाराच्या क्षणिक सुखासाठी शरीर भ्रष्टविणे व झीज सोसने व्यर्थ.साईबाबांकडे हात पसरा व पारीजातकाचे झाड फुलांनी लडू द्या। साईचरणी समर्पण .

# श्री विठ्ठल दर्शन

—सौ. निर्मला चं. मालवणकर
साई-स्मृति
व्हिन्सेन्ट स्क्वेअर, दादर.

महाराष्ट्र हा संतांच्या भूमीचाच देश आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम ह्यांच्या सारख्या थोर संतांनी आपणास भक्तीचा मार्ग सोपा व सरळ करून दिला. त्याप्रमाणे हल्ली शेगांवचे गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, गाडगे महाराज असे थोर संत होऊन गेले. संत आपल्या भक्तांचे कोड कौतुकही पुरवितात व त्यांच्या संकटाच्या वेळेस पाठीशी उभे रहातात.

शिर्डीस जेव्हा साईबाबा प्रत्यक्ष होते. तेव्हा त्यांचे भक्त त्यांच्या आज्ञेशिवाय कोणतीच गोष्ट करीत नसत. बाबांना विचारीत व त्यांचा होकार मिळाला म्हणजेच पुढचे पाऊल उचलत.

असेच एकदा बाबांच्या परमभक्त तर्खड आई शिर्डीत असताना त्यांना पंढरपूरास जाण्याची फार इच्छा झाली. त्यांनी बाबां जवळ आपली इच्छा प्रकट केली. तेव्हा बाबांनी त्यांना पंढरपूरास जाण्याची आज्ञा दिली.

नंतर त्या मुंबईत आल्या तेव्हा त्यांच्या घरी एकदा गाडगेमहाराज आले. त्यांना "मी पंढरीस येत आहे." असे आईने सांगितले, ते म्हणाले, "ये बाय, माझी झोपडी तुला उघडी आहे. मी पण तेथेच आहे."

आणि खरोखर एक दिवस आपल्या मुलास घेऊन तर्खड आई गाडगे महाराजांच्या झोपडीत उतरल्या.

गाडगे महाराज तेथेच होते. ते म्हणाले, "बाय आपल्या चार जणांच्या भाकऱ्या भाज. एक पाहुणा रात्रीच्या वस्तीला येणार आहे."

त्या प्रमाणे त्यांनी चौघांचे जेवण केले. खरोखर रात्री एक काळा पाहुणा अंगावर काळी घोंगडी घेऊन आला. तो आत शिरताच फुलांचा व आबीराचा सुगंध दरवळला. पण मुलाने किंवा आईने हा इतका सुंदर वास कसला व हा पाहुणा कोण म्हणून विचारले नाही. रात्री जेवण करून पहाटेच तो निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळीच तर्खड आई स्नान करून विठोबाच्या देवळात पुजेस गेल्या. पुजाऱ्याने गाडगे महाराजांच्या पाहुण्या म्हणून त्यांना विठोबाची पुजा करावयास दिली. (त्या वेळेस आता सारखी गर्दी नसे) त्यांनी अगदी अंतःकरणाने भावपूर्ण पुजा केली. व गळ्यांत फुलांचा हार, घालण्यासाठी हात वर केला तर मूर्ती उंच असल्यामुळे गळ्यात हार घालणे शक्य नव्हते. त्यांनी क्षणभर डोळे बंद करून देवाचा धावा केला. (त्या ठेंगू होत्या) तो काय चमत्कार! ह्या कलियुगातही मूर्तीची मान खाली झाली व आईने गळ्यात व्यवस्थित हार घातला. हा चमत्कार आईच्या मागे उभ्या असलेल्या पुजाऱ्याने पाहिल्यावर दोन मिनिटे तो तोंड उघडे ठेऊन पहातच राहिला. क्षणभर तो आपले भानच विसरला. शुद्धीवर आला तो आईच्या पायावर साष्टांग नमस्कार घातला. मी इतकी वर्षे पूजा करतो पण आज तुमच्या मुळे मला खरे दर्शन झाले मी अगदी धन्य झालो. तुमच्या पुण्याईनेच मी हा चमत्कार प्रत्यक्ष पाहू शकलो."

घरी आल्यावर गाडगे महाराज म्हणाले, "काय बाय दर्शन झाले ना?" काल पासूनच विठोबा इथे येऊन उतरला होता. अग तो रात्रीचा पाहुणा विठ्ठलच होता" तेव्हा त्या दोघा आई लेकांच्या डोक्यात प्रकाश पडला की काल जो फुलांचा व बुक्क्यांचा सुगंध सुटला होता, तो प्रत्यक्ष विठ्ठल आपल्या झोपडीत होते म्हणून.

शिर्डीस गेल्यावर बाबांनी पण "तू दर्शनाने तृप्त झालीस ना?" असे तर्खड आईना विचारले.

भक्तासाठी संत काय काय चमत्कार करतील ते सांगता येत नाही.

भक्ताची भक्ती मात्र कसोटीला उतरावी लागते. बाबांच्या पायी माझे शत कोटी प्रणाम्.



# —: श्री साई साक्षात्कार :—

— श्री. सदानंद लक्ष्मण वाईरकर,
२०/१५३५ श्री गणेश नटेश्वर सोसायटी,
गोराई कॉलनी, बोरीवली (प.),
मुंबई नं. ४०० ०९२.

अढळ श्रद्धा, अतिप्रामाणिकपणा, निस्वार्थीवृत्ती, परोपकारीपणा, सदा हसत व अहंकार न बाळगता श्रीसद्‌गुरू साईबाबांची नित्य सेवा केल्यामुळे महान देवपुत्र श्री साईबाबांनी माझी जीवननौका संसाररूपी अथांग सागरातील गुंतागुंतीच्या भोवऱ्यातून सुप्रगतीच्या दिशेने जाण्यासाठी मला वेळोवेळी स्वप्नात साक्षात्काररूपी दर्शन व शुभ-अशुभ गोष्टींबाबतही मार्गदर्शन केले आहे. तिथपासून माझे जीवनच साईमय व सुगंधमय झालेले आहे. श्रीसाई आपल्या दैवी शक्तीने काय काय चमत्कार दाखवितात याची कल्पना सर्वच साई भक्तांना आहे, परंतु ती इतरांनाही यावी म्हणून मी श्री साईलीलेचे आलेले अनुभव प्रगट करीत आहे.

मी गुरूवार ता. २६ मे १९८३ या शुभदिनापासून श्री साई सच्चरित ग्रंथ वाचण्यास सुरूवात करताच मनात ठरविले की आज कोणी अनोळखी गृहस्थ बाबांच्या रूपाने आमच्या घरी जेवावयास आले तर मला साई भक्तीचे फळ मिळेल व समाधान लाभेल, तोच अवघ्या दीड तासाच्या आत व्यवस्थित कपडे परिधान केलेले, हातात झोळी घेतलेले वयस्कर गृहस्थ (भिकारी नव्हे) आमच्या घरी येताच त्यांना आत बोलावून अतिआग्रहाने श्रीखंड पुरीचे भोजन दिल्याचा आनंद आम्हाला झाला. अशाप्रकारे बाबा कोणाच्याही रूपाने आमच्या घरी पदस्पर्श करून संतुष्ट होऊन गेलेत. घरात कोणाचीही तब्येत बिघडण्यापूर्वीच स्वप्नाद्वारे बाबा मला पूर्व सूचना देतात व त्वरित डॉक्टरी औषधांपूर्वीच व नंतर औषधातूनही ऊदी मिसळून घेता आरामही पडतो. श्री साईबाबांचे लॉकेटही माझ्या गळ्यात नेहमी असावे याबद्दलही त्यांनी मला स्वप्नात एकाच पहाटे परत परत सांगितले आहे. मी ज्या ज्या वेळी श्री क्षेत्र शिर्डीमध्ये माझ्या अतिजवळच्या माणसांचे हार श्रीसाईबाबांना घालतो त्या माणसांच्याही जीवनात सुखसमाधानाची घडी पसरलेली असेल हे स्वप्नाद्वारे श्री साईने मला सूचित केलेले आहे.

तसेच दैनंदिन जीवनातही बारीक सारीक अनुभव मला येतच असतात. श्री साईनाथ महाराज मला स्वप्नात किंवा मुंबईच्या अल्पावधीच्या लोकलगाडीच्या प्रवासातही साक्षात्काररूपी दर्शन देऊन वेळीच शुभ-अशुभ गोष्टींबाबत किंवा योग्य-अयोग्य व्यक्तिबाबत जाणीव करण्याच्या कामी प्रयत्नशील राहून माझ्या पाठीशी सावलीसारखे उभे राहतात याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी आहे आणि असेच श्रीसाईबाबा माझ्या जीवन वेलीवर फुललेल्या कुमार भूषण व साईकिरण या दोन सुमनांच्याही भावी जीवनात सुख समाधानाचा भरभराटीचा सुगंध पसरवून संबंध आयुष्यात त्या दोघांनाही कशाचीही कमतरता भासू देणार नाहीत हे निर्विवाद सत्य आहे. अशा माझ्या अति महान देवपुत्र लाडक्या श्री साईबाबांना कोटी कोटी प्रणाम!

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | —— | —— |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH BYE 26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारका माई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बस्ट) | ३¼ × ४½" | ०-३५ | ३-५० |

श्री. रा. द. बन्ने, संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०००१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे छापून प्रकाशित केले.